नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ९४ * * नागपूर * | बुधवार, दिनांक २ जुलै २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## गेल्या ५ वर्षांत कर संकलन दुप्पट

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. १ :
देशात जीएसटी लागू होऊन ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. १ जुलै २०१७ रोजी देशात जीएसटी लागू करण्यात आला. या काळात कर संकलनाच्या आकडेवारीने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.
२०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण जीएसटी संकलन २२.०८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे, जे ५ वर्षांपूर्वी २०२०-२१ मध्ये फक्त ११.३७ लाख कोटी रुपये होते. म्हणजेच, ५ वर्षांत कर संकलन जवळजवळ दुप्पट झाले आहे. २०२४-२५ मध्ये दरमहा सरासरी जीएसटी संकलन १.८४ लाख कोटी रुपये होते. ५ वर्षांपूर्वी २०२०-२१ मध्ये हे ९५ हजार कोटी रुपये होते.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## कुठे हरवली माझी मराठी

मराठ्यांनी आणि मराठी भाषेने एकेकाळी केलेली देदीप्यमान कामगिरी देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात नोंदली गेलेली आहे. आम्ही गेले दोन दिवस मराठीची महानता, महत्ता, मराठी बाणा आणि मराठी अस्मिता यावर सहृदयतेने लिहिलेले आहे. आता आज माझी मराठी कुठे हरवली आहे. त्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. ज्या ज्या उत्तुंग प्रतिभेच्या महनीय व्यक्तींनी महाराष्ट्राची पताका उंचच उंच नेलेली आहे. त्या सर्वांनी आपले शिक्षण माय मराठीतच केले होते. हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. मग त्यामध्ये चिंतामणराव देशमुख असोत, जयंत नारळीकर असोत किंवा ताज ग्रुपला वेगळा दर्जा मिळवून देणारे केरकर असोत. ही सर्व मंडळी महाराष्ट्रासाठी ललामभूत आहेत. आम्ही मुद्दाम मराठी साहित्यातील दिग्गजांचे नाव घेतलेले नाही. अशा आपल्या मराठीला आणखी कुठे कुठे शोधावे लागेल. हा आमच्या पुढील यक्षप्रश्न आहे. मराठी भाषेत विज्ञानाचे शिक्षण व्हावे, कायद्याचे शिक्षण व्हावे. इंजिनिअरिंगचे शिक्षण व्हावे, वैद्यकीय शिक्षण व्हावे. असा मनोदय पाच-पन्नास वर्षांपूर्वी अनेक दिग्गजांनी व्यक्त केला होता. आजची परिस्थिती पाहिली तर काय नजरेला पडते. आज मराठी भाषेला जणू काय ती परकीय भाषाच आहे. अशा रीतीने अनेक मराठी घरात पाहिले जाते. आपला मुलगा किंवा मुलगी पहिलीपासून इंग्रजी माध्यमातून शिकावेत. हे केवळ मुंबई, पुण्यातील उच्चवर्गीयांचे स्वप्न राहिलेले नाही. तर आता लहानशा खेड्या-पाड्यामधूनही इंग्रजी माध्यमाच्या शाळा भराभर प्रकट होत आहेत. किंबहुना त्या भूछत्राप्रमाणे उगवत आहेत आणि त्याच शाळांचे संचालक या उद्योगाला नफ्याचा उद्योग म्हणत आहेत. मुलांनी मराठीत शिकावे. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील, डॉक्टर पंजाबराव देशमुख, डॉक्टर बापूजी साळुंखे यांच्यासारख्या महानुभवांनी मराठी भाषेच्या शाळा सुरू केल्या. आता बदलत्या ऋतुमानानुसार या शाळांमध्येही परकीय भाषेप्रमाणे मराठीला ब?याच ठिकाणी स्थान नाही. तिथेही इंग्रजीचे आक्रमण झालेले आहे. आम्ही वारंवार हे म्हटले आहे की, आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही. मग ती इंग्रजी असो काय किंवा हिंदी असो काय. आम्ही कोणाच्याही विरोधात नाही आणि त्यांचा द्वेष करण्याचे कारणच नाही. पण तुम्हाला आता माज्या महाराष्ट्रातील शाळांमध्ये मराठीत शिकणारी मुले शोधावी लागत असतील. तर यासारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट कोणतीही नाही. मराठीचे प्राचीन साहित्य, मध्ययुगीन साहित्य आणि अवार्चीन साहित्य याची तुलना केली. तर आपले आजचे मराठी साहित्य आम्हाला आपले म्हणजेच आपल्या मराठीचे साहित्य का वाटत नाही. हा आमच्या समोरील मूळ प्रश्न आहे. इंग्रज आले. त्यांनी राज्य केले आणि इंग्रजांची सत्ता गेली. त्यांनी जेवढा इंग्रजीचा प्रचार-प्रसार केला नाही. तेवढा प्रचार आणि प्रसार आमचे इंग्रजाळलेले मराठीजन करीत आहेत. ही अत्यंत खेदाची गोष्ट नाही काय. महाराष्ट्रातील दुकानांवर मराठी फलक लिहिले पाहिजेत. असा कायदा आहे. त्यामुळे हत्तीसारखी इंग्रजी अक्षरे आणि उंदरासारखी मराठी अक्षरे लिहून आपले दुकानदार कायदा पाळतात. आपल्या हाती जो मोबाईल आला आहे. तो सुरुवातीला महागडा होता. तेव्हा घरात एखादा किंवा दुसरा मोबाईल असायचा. आता मोबाईलवर दरमहा २०० ते ३०० रुपये खर्च की केले की, तुम्हाला वाटेल तेवढे बघता किंवा बोलता येते. मोबाईल प्रेमी जनांमध्ये मराठी भाषाही मोबाईली झाली आहे. आम्हाला आता मराठीचे व्याकरण शिकण्याची गरज वाटत नाही किंवा भासतही नाही. एक शब्द मराठी, दुसरा शब्द इंग्रजी आणि तिसरा हिंदीचा अशी आमची ही नवमराठी निर्माण झालेली आहे. गंमत अशी आहे की, सरकारने सरकारी कामासाठी जो मराठी शब्दकोश निर्माण केलेला आहे. तो वाचल्यावर ती मराठी बहुतेक पुढील शंभर दोनशे वषार्नंतर बोललेली जाईल, असे वाटणे स्वाभाविक आहे. मराठी भाषेचे आकर्षण का निर्माण होत नाही हाही एक चिंतनाचा विषय आहे. मराठी भाषेतील पुस्तके मोठमोठे प्रकाशक काही वर्षांपूर्वी आवृत्ती काढताना हजार प्रती छापीत असत. आता तो आकडा अडीचशे - तीनशेवर आलेला आहे. महाराष्ट्रात आणि मुंबईतही मराठी वाचन साहित्य विकणा?या पुस्तकाची दुकाने बंद झालेली आहेत. आता तुम्हाला मराठी भाषेच्या शोधासाठी सक्रिय होऊन बाहेर पडावे लागेल. तेव्हा शिल्लक असलेली मराठी टिकावी, ती वाढावी. असे वाटत असेल तर, समस्त मराठी जनांनो मराठीला शोधा आणि शोधल्यावर आपल्या मनांत आणि आपल्या आत्मजनांत रुजवा, एवढीच नम्र विनंती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस. भाजप नेते बबनराव लोणीकर तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला.

परंतु, नाना पटोले यांनी असंसदीय शब्दाचा वापर केल्याचे म्हणत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ५ मिनिटांसाठी सभा तहकूब केली. नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी सभागृहात केली होती. नाना पटोले, विजय वडेट्टीवर थेट अध्यक्षाच्या डायसवर चढून राजदंडापुढे जाऊन लोणीकर प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागण्याची केली मागणी. त्यानंतर सभापतींनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई केली.

भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्ह्यात केलेल्या वक्तव्य प्रकरणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सभागृहात मांडला. या प्रकरणात लोणीकर, कृषिमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यासाठी त्यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाजवळ जात राजदंडला देखील स्पर्श केला. त्यामुळे अध्यक्षांनी त्यांनी एका दिवसासाठी निलंबित केले. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रोज निलंबित केले तरी सभागृहात आवाज उचलणार असल्याचे पटोले म्हणाले.

### नाना पटोले दिवसभरासाठी निलंबीत : शेतकऱ्यांच्या प्रश्नाने गाजला दुसरा दिवस



**सरकारची वास्तविकता आज समोर आली - नाना पटोले**
निलंबनानंतर सभागृहाबाहेर आलेले पटोले पत्रकारांशी बोलताना म्हणाले, भाजप महायुतीचे सरकार माज आलेले आहे. या सरकारची वास्तविकता आज समोर आली आहे. यांचे नेते शेतकऱ्यांना भिकारी समजतात. त्यांना कपडे हे घेऊन देतात. २०१४ च्या आधी लोणीकर उघडाच फिरत होता. जो शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलेल त्याला निलंबित करणे आणि जे अपमान करतात त्यांना सन्मानाने बसवायचे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

नाना पटोले यांना निलंबित केले. सगळ्यात धक्कादायक गोष्ट ही आहे की विधानभवनात निलंबन होणे, कदाचित कोणी वेडेवाकडे वागले असेल तर निलंबन झाले असेल. पण, पहिल्यांदा असे होत आहे की शेतकऱ्यांचा आवाज उठवण्यासाठी, शेतकऱ्यांचा आपमान जो झालेला आहे त्याच्याविरोधात आवाज उठवण्यासाठी कोणीतरी निलंबित झाले आहे. हा एक भयानक पायंडा अपन पाडलेला आहे. दुर्दैव या महाराष्ट्राचे की हे सरकार आपल्या डोक्यावर बसले आहे ते सरकार निवडणूक आयोगाच्या आशीर्वादाने बसले आहे शेतकऱ्यांच्या आशीर्वादाने नाही.
**आमदार आदित्य ठाकरे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पटोले यांच्या कृती वरुन काँग्रेसवर निशाणा साधला. सभागृहात आजपर्यंत अनेकदा आपण असे गोंधळ पाहिले आहेत. मात्र, अध्यक्षांचीच चुकी असल्यासारखे पटोले अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. या सभागृहात असे कधीच झाले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नाना पटोले हे फार लांब उभे होते अध्यक्षांपासून आणि ते एकटेच होते. आम्ही तर झुंड गेलेली पहिली आहे. सत्ताधारी प्लॅन करून नानांना बाहेर घालवणार असतील तर हे आम्हाला मान्य नाही. हे लोकशाहीला न शोभणारे होते.
**आमदार जितेंद्र आव्हाड**

## बीड लैंगिक शोषण प्रकरणाची एसआयटी चौकशी

### महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात तपास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
बीड येथील एका कोचिंग क्लासेसमध्ये अल्पवयीन मुलीच्या झालेल्या लैंगिक शोषणाची एसआयटी चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केली.



प्रस्तुत प्रकरणाची संभाव्य व्याप्ती तथा संवेदनशीलता लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याचा निर्णय घेईल. एका वरिष्ठ दर्जाच्या महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात ही समिती कालबद्धपणे आपला तपास करून या गुन्ह्याचा छडा लावेल. या प्रकरणी कुणालाही पाठिशी न घालता पीडित मुलींना न्याय देण्यात येईल, असे ते म्हणालेत.

भाजप सदस्य चेतन तुपे यांनी बीडमधील लैंगिक शोषणाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. गुरू - शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारे कृत्य या महाराष्ट्रात घडले आहे. बीडमधील एका कोचिंग क्लासेसमध्ये एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण झाले आहे. सध्या या प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक झाली आहे. त्यांच्यावर पोस्कोचा गुन्हाही दाखल करण्यात आला. पण या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज आहे. सरकारने या प्रकरणी एसआयटी चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

मुख्यमंत्री विधानसभेत बोलताना म्हणाले की, सभागृहाचे सदस्य चेतन तुपे यांनी बीडमध्ये घडलेल्या एका अतिशय गंभीर घटनेचा मुद्दा उपस्थित केला. सरकारने वरिष्ठ दर्जाच्या आयपीएस महिला अधिकाऱ्याच्या नेतृत्वात एक एसआयटी चौकशी स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, एसआयटीच्या माध्यमातून या गुन्ह्याचा तपास केला जाईल.

## चर्चेत राहण्यासाठी नाना पटोलेंचा प्रयत्न?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
पावसाळी अधिवेशनात मंगळवारी नाना पटोले यांनी थेट अध्यक्षाच्या आसनापर्यंत जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माफीची मागणी केली.



त्यांच्या या कृतीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार टीका करत चर्चेत राहण्यासाठी नाना पटोलेंनी असा प्रयत्न केला का? असा सवाल उपस्थित केला. एकनाथ शिंदे म्हणाले, नाना पटोले हे स्वतः विधानसभेचे अध्यक्ष राहिलेले आहेत. त्यांना सर्व कामकाजाची माहिती आहे. विधानसभेच्या सभागृहाचे पावित्र्य राखले पाहिजे, हे देखील त्यांना माहीत आहे. पण ते आज एवढे हेक्टीक का झाले ते माहीत नाही. त्यांची काँग्रेसमध्ये दिल्लीत चर्चा दिसत नव्हती. आपल्या नावाची चर्चा झाली पाहिजे, पुन्हा प्रकाशझोतात यायला पाहिजे, यासाठी त्यांचा प्रयत्न होता का? असा सवाल शिंदे यांनी उपस्थित केला.

## महाराष्ट्राच्या मुख्य सचिवपदी राजेश मीणा यांची नियुक्ती



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
राजस्थानच्या सवाई माधोपूर येथील रहिवासी असलेले आयएएस अधिकारी राजेश कुमार मीणा यांनी सोमवारी महाराष्ट्राचे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला.

मुख्य सचिव पदवरूप सुजाता सौनिक ३० जून रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर राजेश मीणा यांची वर्णी लागली गेल्या ४० वर्षांपासून महाराष्ट्रात सेवा बजावत असलेल्या राजेश यांना अशा अनेक ठिकाणी पोस्टिंग देण्यात आले. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन आपले स्वप्न पूर्ण केले.

महाराष्ट्र ओबीसी आरक्षणावर तोडगा काढणे, बाल आणि महिला विभागात नवोपक्रम, ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांना बचत गट तयार करून स्वावलंबी बनवणे, दुष्काळग्रस्त भागात पाणी व्यवस्थापन, नवीन पिके, उपकरणे आणि पिकांमध्ये नवोपक्रम वापरण्यास प्रवृत्त करणे ही त्यांची सर्वात महत्त्वाची कामे आहेत. महाराष्ट्रात कोणताही पक्ष सत्तेत असला तरी, ते नेहमीच मुख्यमंत्र्यांचे आवडते अधिकारी राहिले आहेत.

## 'दैनिक महासागर' विधान परिषदेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :
विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज मंगळवारी विधान परिषदेत दैनिक महासागरचा प्रकर्षाने उल्लेख करण्यात आला.

विधान परिषद सदस्य दादाराव केचे यांनी सभागृहात वर्धा जिल्ह्यातील रेतीचे अवैध उत्खनन आणि विक्रीचा मुद्दा उपस्थित केला. दैनिक महासागरने या प्रकरणाला वाचा फोडत २४ मार्च रोजीच्या अंकात अनेक रेती माफियांची नावे प्रकाशित केली. मात्र, या रेती माफियांवर कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. दै. महासागरच्या वृत्ताची दखल घेत सरकारने कोणती कारवाई केली? अशा रेती चोरांवर कोणती कारवाई केली जाणार आहे? असे प्रश्न उपस्थित करीत त्यांनी रेतीचोरीला आळा घालण्याची मागणी केली.



श्री दादाराव केचे, भाजपा

## फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट

### ५ ठार : ४ गंभीर



■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. १ :
तामिळनाडूतील शिवकाशी येथील एका फटाक्याच्या कारखान्यात मंगळवारी मोठा स्फोट झाला, वृत्तसंस्था पीटीआयनुसार, या अपघातात किमान ५ जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात ४ जण गंभीर भाजले आहेत.
आणखी काही लोक अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. बचावकार्य सुरू आहे. जखमींना उपचारासाठी विरुधुनगर सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
विरुधुनगर जिल्ह्याचे एसपी कन्नन यांनी सांगितले की, शिवकाशीजवळील चिन्नकमानपट्टी गावात एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. अपघातानंतर कारखान्यातून सतत धूर निघताना दिसत होता आणि आतून फटाके फुटण्याचे आवाज ऐकू येत होते. घटनेची चौकशी सुरू आहे.






## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अंबादास दानवे आक्रमक



**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या संदर्भात विविध प्रश्न मांडत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारला जाब विचारला. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची मागणी देखील दानवे यांनी केली आहे. राज्य सरकारने पिक विमा योजना बंद केली असून राज्यातील काही जिल्ह्यात पिक विमा योजनेत अनागोंदी झाली म्हणून सर्व शेतकऱ्यांना त्याची शिक्षा देणे योग्य नसल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. या संदर्भात आज त्यांनी विधान परिषदेच्या सभागृहात विविध प्रश्न उपस्थित केले. मे आणि जून महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. त्यांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत का? भरपाई देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे का? असे प्रश्न देखील दानवे यांनी उपस्थित केले. राज्य सरकारने एक रुपयात पीक विमा योजना बंद केली असून पूर्वी पीक विमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देताना ४ ट्रिगर पद्धतीने दिला जात होता. मात्र सरकारने यामध्ये बदल करून ३ ट्रिगर रद्द करण्यात आले असून यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे.

# तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांचे आयुष्य समृद्ध करणार



## कृषीमंत्री माणिक कोकाटे यांची ग्वाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ :**
मानव विरहित शेती, ए आय आधारित हवामानाचे अंदाज व हवामान अनुकूल पीक पद्धती घेणे, काटेकोर सिंचन पद्धती विकसित करणे, जिल्हास्तरावर शेती प्रयोगशाळा उभारणे, शेतीसाठी मोबाईल व्हॅनची सोय करणे, पीक साठवणूक सुविधा वाढवणे, शेतीसाठी कमी खर्चात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून, उत्पादन वाढवून शेतकऱ्याचे आयुष्य समृद्ध करण्यावर शासनाचा भर आहे, असे मत कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण सभागृह येथे दि. १ जुलै २०२५ रोजी स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिनानिमित्ताने 'महाकृषी ए. आय. धोरण या विषयावर' कृषी विभागातर्फे कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंह यावेळी उपस्थित होते.

कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हिताच्या शासन अनेक योजना राबवत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड शेतीला दिली जावी यासाठी महाकृषी ए. आय. धोरण शासन राबवत आहे. काळाची गरज ओळखून शेतीमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. शेतीतील उत्पादन वाढले आहे मात्र शेत मालाची गुणवत्ता कायम राखणे हे मोठे आव्हान आहे. फक्त भरमसाठ खत वापरणे हा जास्त उत्पादन देण्याचा मार्ग नाही. पिकाला जे आवश्यक तीच खत, योग्य पाणी याची मात्रा देणे आवश्यक आहे.

कृषीमध्ये अनेक बदल अपेक्षित आहेत. शेतकऱ्यांना काळानुरुप प्रशिक्षण देणे, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे. शेतकरी केंद्रित योजना, शाश्वत विकासच्या योजना राबवणे यावर शासन भर देत आहे. शेतमालाला योग्य हमी भाव मिळवून देणे हेच शासनाचे धोरण आहे असेही ॲड. कोकाटे म्हणाले. शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासन अनेक महत्वपूर्ण निर्णय घेत आहे. शेतकऱ्यांना शेती नुकसानीसाठी सरसकट मदत देण्यात येत आहे. शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करणे, महाकृषी ए. आय. धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. शेतीमध्ये आज अनेक आव्हाने आहेत शेतमालाला योग्य बाजारभाव आणि बाजारपेठांची योग्य माहिती असणे आवश्यक आहे, असे कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, महाकृषी ए. आय. धोरण या विषयी आज शेतकऱ्यांशी सवांद साधता येईल. शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्राधान्यक्रम ठरवता येईल. मातीची गुणवत्ता तपासणे, खतांचा योग्य वापर, हवामान ते बाजारपेठ पर्यंत अचूक पद्धतीने शेती करणे यावर भर देण्यात येत आहे.

### संदीप क्षीरसागर यांचा धनंजय मुंडेंवर पलटवार
## मी त्यांच्या सारखा पळालो नाही



**बीड :** बीड येथील कोचिंग क्लासेसमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचे लैंगिक शोषण झाल्यामुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. धनंजय मुंडे यांनी या प्रकरणातील एक आरोपी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या जवळचा असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आता संदीप क्षीरसागर यांनी स्वतः पुढे येत स्पष्टीकरण दिले आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपी माझ्या जवळचे असले तरी पीडितेने तक्रार दाखल करतात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मी त्यांच्यासारखा 150 दिवस पळून गेलो नाही, असे ते म्हणालेत. बीड येथील एका खासगी कोचिंग क्लासमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचे लैंगिक शोषण झाले होते. या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीनुसार 2 शिक्षकांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यापैकी विजय पवार हा आरोपी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या जवळचा असल्याचा आरोप आहे.

# घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून
## पाच ब्रास वाळू तहसीलदारार्फत मोफत मिळणार : चंद्रशेखर बावनकुळे



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
राज्य शासनाने राज्यात एक व्यापक वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य सर्वश्री दादाराव केचे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. वर्धा जिल्ह्यातील देऊरवाडा येथे अवैध वाळू साठ्याचा तपास केला होता. त्यानंतर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये नदीतून चोरटी वाळू काढण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी ड्रम, पाईप, चाळण्या, टोपले आदींचा समावेश आहे. या प्रकारावर कारवाई करताना संबंधित व्यक्तींना अटक करण्यात आली असून, शासनाच्या सूचनेनुसार दोषी तलाठी व महसूल निरीक्षकांना निलंबित करण्यात येणार असल्याचेही महसूल मंत्र्यांनी यावेळी सांगितले.

शासनाने वाळू चोरी रोखण्यासाठी आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात एम.सी.आर.डी.ओ. धोरण लागू करून प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होईल आणि वाळूचा तुटवडा कमी करून काळाबाजाराला आळा बसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

स्थानिक ग्रामपंचायती, नगरपंचायती व खासगी बांधकामांसाठी देखील ठराविक दराने वाळू उपलब्ध करून देण्याची योजना असल्याचे सांगून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, या सर्व प्रक्रियेचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले असून, हे पोर्टलमार्फत पारदर्शकपणे राबवले जाणार आहे.

गृह व महसूल खात्यांनी संयुक्त निर्णय घेतला आहे की, वाळू चोरीसंदर्भात महसूल किंवा पोलीस यांपैकी कोणाकडेही गुन्हा दाखल झाला असेल तरी दोन्ही विभाग हे संयुक्त कारवाई करतील, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# वारकऱ्यांवरील हल्ल्याचे विधान परिषदेत पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १ :**
पंढरपूर वारीला निघालेल्या वारकऱ्यांवर कोयता गँगने हल्ला केला. या गंभीर घटनेचे विधान परिषदेत मंगळवारी तीव्र पडसाद उमटले. शिवसेना (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी स्थनग प्रस्ताव मांडून कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले.

सभापती राम शिंदे यांनी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर स्थनग प्रस्ताव पुकारले. परब यांनी यावेळी पंढरपूर वारीवर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा मांडला. ते म्हणाले की, राज्यात कायदा सुवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. अतिशय वाईट परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. आता वारीची परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील वारकऱ्यांवर कोयता गँगकडून हल्ला झाला आहे. या घटनेमुळे वारीला गालबोट लागले आहे. श्रीमंत, बिल्डरांना धमकावणारी गँग सर्वसामान्य वारकऱ्यापर्यंत पोहोचले आहेत. परंतु, अद्याप कोणतेही कारवाई झालेली नाही. महाराष्ट्रातील परंपरेला कालिमा फासला गेला असून परंपरेवर घाला घालण्याचे काम झाले आहे. गुंडाना कायद्याचा धाक राहिलेला नाही. सर्व मोकाट सुटले आहेत. दिवसागणिक गुन्हेगारी वाढत आहेत. वारकरी देखील गुंडांनी सोडलेले नाहीत. परिषदेचे सर्व कामकाज बाजूला ठेवून वारकऱ्यांप्रती कायदा सुव्यवस्थेवर चर्चा घ्यावी, अशी जोरदार मागणी परब यांनी केली. दरम्यान, सभापती राम शिंदे यांनी संबंधित स्थगन प्रस्तावावर निवदेन करण्याच्या सूचना दिल्या.

## जलसंधारण खात्याच्या ८,७६७ रिक्त पदांना मान्यता : संजय राठोड



**मुंबई :** जलसंधारण विभागाला नव्याने ८,७६७ पदांचा आकृतीबंध तयार करून तो वित्त विभागाकडे सादर करण्यात आला होता. या सर्व पदांना आता हाय पॉवर कमिटीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ही भरती प्रक्रिया जलदारित्या राबविली जाईल, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात दिली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तसेच सदस्य डॉ. प्रज्ञा सातव, अभिजित वंजारी, ॲड.अनिल परब यांनी यासंदभार्तील लक्षवेधी उपस्थित केली होती. मंत्री संजय राठोड म्हणाले, की २०१७ साली जलसंधारण विभागाची स्वतंत्र निर्मिती झाली. त्यावेळी १६,४९९ पदांचा आकृतीबंध मंजूर झाला होता. त्यातील ९,९६७ पदे कृषी विभागाकडून आणि ६,५१२ पदे जलसंपदा व ग्रामविकास विभागाकडून वर्ग होणे अपेक्षित होते. मात्र, कृषी विभागाकडून केवळ २,१८१ पदांचीच मंजुरी मिळाली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. आज जर महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम करायचा असेल, तणावमुक्त करायचा असेल, तर जलसंधारण विभागाला बळकटी देणं आवश्यक आहे. त्यासाठी ही पदभरती आवश्यक असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी नमूद केले.

# नैसर्गिक आपत्तीसंदर्भातील पंचनामे पूर्ण होताच शासनाच्या धोरणानुसार मदतीचे वाटप : मकरंद जाधव-पाटील



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
राज्यात मार्च-एप्रिलमध्ये काही जिल्ह्यांत, तर मे महिन्यात उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण विभागात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या असून, पंचनामे पूर्ण होताच शासनाच्या धोरणानुसार मदतीचे वाटप करण्यात येईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधान परिषद सदस्य सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, सतेज पाटील यांनी राज्यात अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि वीज पडण्याच्या घटनांमुळे झालेल्या शेतीपिकांच्या आणि जनजीवनाच्या नुकसानीबाबत मदतीचे वाटप करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

यावर उत्तर देताना मंत्री जाधव-पाटील म्हणाले की, राज्यात वीज पडून 63 जणांचा मृत्यू झाला असून त्यांच्या कुटुंबियांना शासनाने प्रत्येकी 4 लाखांची मदत जाहीर केली आहे. ज्यांना अद्याप मदत मिळाली नाही त्यांना दोन दिवसांत ती देण्यात येणार असल्याचे मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी यावेळी सांगितले.

शेती पिकांच्या नुकसानीबाबत बोलताना मंत्री मकरंद जाधव-पाटीलयांनी सांगितले की, एकूण 75,355 हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून 1,68,750 शेतकरी प्रभावित झाले आहेत. यासाठी सुमारे 213 कोटी रुपयांची नुकसान भरपाई अपेक्षित आहे. ओल्या दुष्काळासंदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, 24 तासांत 65 मिमी पेक्षा अधिक अतिवृष्टी अथवा सलग पाच दिवस 10 मिमी पेक्षा अधिक पावसाच्या घटनांवर शासन निर्णयानुसारच ओला दुष्काळ घोषित केला जातो. सध्या 8 जून 2025 पर्यंतचे पंचनामे सुरू असून, त्यानंतर संबंधित मदतीचा निर्णय घेण्यात येईल. घरांच्या पडझडीच्या मदतीसाठी विभागवार निधी वितरित करण्यात आला असून, कोकण, नाशिक आणि अमरावती विभागांना प्रत्येकी 5 कोटी, पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागांना प्रत्येकी 12 कोटी, तर नागपूरला 10 कोटी रुपये वितरित करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जर कोणतीही मदत प्रलंबित असेल किंवा वितरणात अडचण असेल, तर ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडे देऊन, आवश्यक ती मदत तत्काळ दिली जाईल.

## अपघातात तिघांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १ :**
शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. विश्रांतवाडी, पुणे-सोलापूर रस्ता, तसेच सासवड रस्त्यावर अपघाताच्या घटना घडल्या. विश्रांतवाडी भागात आळंदी रस्त्यावर भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सलीम शेख (वय १९, रा. फुलेनगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सलीम शेख याचा मोठा भाऊ अकबर (वय ४५) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सलीम १८ जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास आळंदी रस्त्याने निघाला होता. त्या वेळी रस्ता ओलांडणा?या सलीम याला भरधाव वाहनाने धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या सलीम याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर पसार झालेल्या वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक शेख तपास करत आहेत.

## महाराष्ट्र, शिवसेना, शिवसेनेचे वाघ अजून जिवंत : संजय राऊत



**मुंबई :** महाराष्ट्र आणि शिवसेना, शिवसेनेचे वाघ अजून जीवंत आहेत, असे म्हणत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपला डिवचले आहे. तसेच 5 तारखेला ठाकरे बंधू एकत्र येतील असेही त्यांनी सांगितले आहे. विजयी दिवसाचा सोहळा शिवतीर्थावर व्हावा, अशी इच्छा असल्याचे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले, महाराष्ट्र आणि शिवसेना, शिवसेनेचे वाघ अजून जीवंत आहेत. बघा नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, अमित शहा हे केंद्रीय गृहमंत्री आहेत आणि देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. या तिघांनी महाराष्ट्र कमजोर करण्याचा प्रयत्न केला. त्यांना सांगितले की आहोत आम्ही अजून, टायगर अभि जिंदा हें. 5 तारखेला मराठी विजय दिवस जो आहे त्याला आम्ही त्यांनाही बोलवणार आहोत. त्यांनी बघावे की मराठी एकजुटीने कसा विजय मिळवला. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, शत्रूला कधीही प्रिय म्हटले पाहिजे.

# कुणाल पाटलांचा कॉंग्रेसला रामराम
## तीन पिढ्यांचा वारसा सोडून भाजपमध्ये प्रवेश



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १ :**
कॉंग्रेसचे कट्टर समर्थक असणारे व माजी आमदार कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशावेळी चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण तसेच गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत कुणाल पाटील यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. विकास कामांना निधी मिळत नसल्याने कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे त्यांनी म्हटले आहे. कुणाल पाटील यांच्या आजोबांपासून वडील व त्यानंतर कुणाल पाटील असे तीन पिढ्या कॉंग्रेसमध्ये होते. परंतु आता कुणाल पाटील यांनी आता भाजपचे कमळ हाती घेतले आहे. विकास करायचा असेल तर भाजपसोबत जायला हवे असे त्यांनी म्हटले होते.

कुणाल पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे उत्तर महाराष्ट्रात भाजपची ताकद आणखी वाढण्यास मदत होणार आहे. कुणाल पाटील यांचे धुळे जिल्ह्यात व परिसरात चांगलेच वर्चस्व असून याचा आगामी महापालिका निवडणुकीत भाजपला चांगला फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. यावेळी बोलताना कुणाल पाटील म्हणाले, तीन पिढ्यांचा वारसा सोडून आज भाजपमध्ये प्रवेश करत आहे.

माझे आजोबा 1962 मध्ये जेव्हा पंडित नेहरू यांची अत्यंत मोठी क्रेझ होती, त्यावेळेला संपूर्ण देशात पंडित नेहरू यांच्यापेक्षा जास्त मते मिळवत माझे आजोबा निवडून आले होते. हा इतिहास आमचे उत्तर महाराष्ट्र विसरू शकत नाही. माझे वडील जेव्हा पहिल्यांदा मंत्री झाले तेव्हा माज्या आजोबांना फियाट गाडी गिफ्ट केली. पण आजोबांनी त्यांची सायकलच वापरली, असा किस्सा देखील त्यांनी सांगितला.

## गोंदणकला मिळणार शैक्षणिक मान्यता

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १ :**
महाराष्ट्रातील पारंपारिक गोंदणकलेला शैक्षणिक दर्जा मिळणार असून, कला अभ्यासक्रमात तिचा समावेश करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आदेश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहेत. आज मंत्रालयात पारंपारिक गोंदणकलाकारांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य उप सचिव महेश वाव्हळ, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव संतोष खारेगडे, कला संचालक किशोर इंगळे तसेच महाराष्ट्र गोंदणकला संस्कृती महामंडळाचे मच्छिंद्रजी भोसले, विश्वास दोर्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावावर धान खरेदी दाखवून रकमेची उचल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**देसाईगंज, दि. १ :**
गडचिरोली जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यातील खरेदी -विक्री संस्था आरमोरी अंतर्गत येत असलेल्या कासवी येथील संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी चक्क भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावावर कोट्यावधीची शासकीय धान खरेदी दाखवून रकमेची उचल केल्याची गंभीर तेवढीच धक्कादायक माहिती समोर येऊ लागली आहे. दरम्यान प्रकरणात कासवी खरेदी-विक्री संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह मार्केटिंग फेडरेशन गडचिरोलीच्या अधिकाऱ्यांची एकुणच भुमिका संशयास्पद असल्याचे दिसून येत असल्याने दोषींवर कायदेशीर कारवाई होणेस्तव समिती गठीत करून प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी येथील तब्बल २५ शेतकऱ्यांनी राज्याच्या मुख्य सचिव, मंत्रालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे केली असल्याने संबंधित विभागात एकच खळबळ माजली आहे. कासविच्या शेतकऱ्यांनी नमुद केलेल्या पत्रात नमूद केले आहे की खरेदी-विक्री संस्था आरमोरी अंतर्गत कासवी येथील शासकीय धान खरेदी केंद्रावर संस्थेतून खरेदी दाखविण्यात आलेल्या धानाच्या खरेदी-विक्रीचे सर्व व्यवहार उपसभापती लक्ष्मण कानतोडे यांनीच नियुक्त केलेले कासवी येथीलच चंद्रशेखर आसाराम प्रधान व अमित जनार्धन पुसाम यांनी शासनाचे चवतजंस (खरेदी पोर्टल) मध्ये छेडछाड करून बोगस व बनावटी सातबारावर धान खरेदी केले असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून दिसून येत आहे. चंद्रशेखर आसाराम प्रधान यांनी त्यांचे वडिलांचे नावे फक्त एक एकर शेती असतांना प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर धान विक्री न करता ५० क्विंटल धान खरेदी दाखवून रकमेची उचल केली आहे. याचप्रकारे तब्बल ५० शेतकऱ्यांचे नावाने बोगस धान खरेदी दाखवून शासनाची फसवणूक केली आली आहे.

कासवी येथील प्रतिभा महादेव गुरनुले व शामलता घनश्याम सयाम,कलावती कल्याणदास कानतोडे व देवेंद्र पठवारी दिघोरे यांसह अनेक शेतकरी हे भूमिहीन शेतकरी असुन यांचे नावाने कासवी व इतरत्र कुठेही शेतजमिनी नसुन सुद्धा संस्थेने त्यांचे नावाने प्रत्येकी 50 क्विंटल धान खरेदी दाखवून रकमेची उचल करून शासनाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे. संस्थेत कार्यरत कर्मचारी अमित जनार्धन पुसाम यांचे वडील जनार्धन पुसाम हे कासवी येथे कोतवाल म्हणून कार्यरत असल्यामुळे त्यांनीच वरील शेतकऱ्यांचे बोगस सातबारा बनविल्याची शक्यता वर्तवण्यात येत असुन संबंधित सर्व शेतकऱ्यांचे बँक खाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी को-ऑपरेटिव्ह बँक शाखा आरमोरी येथे असुन संस्थेचे उपसभापती यांच्या पत्नी ह्या बँकेच्या गडचिरोली येथील मुख्यालयात रोकडे विभागात लिपीक पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे बँकेचे संबंधित खात्यातील आर्थिक व्यवहार सुद्धा बँकेच्या कर्मचाऱ्यांशी संगनमत करून करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची वास्तविकता समोर आणुन शासनाची फसवणूक करणाऱ्या त्या सर्व संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई होणेस्तव चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी कासवी येथील शेतकऱ्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे केली आहे.

# 'विठ्ठलवारी आनंदयात्रा' या कॉफी टेबल बुकाचे प्रकाशन




■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १ :**
आषाढी एकादशी म्हटले की, डोळ्यांसमोर येते ती पंढरपूरची वारी ! पंढरपूरची वारी म्हणजे आनंदाचा सोहळा... वारी म्हणजे वैष्णवांचा महामेळा... वारी म्हणजे विठ्ठलभक्तीचा लळा. वर्षभरातील २४ एकादशांमध्ये या एकादशीचे एक विशेष महत्त्व....या दिवशीच्या व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. आपल्या पु. ल. देशपांडे लिहून ठेवलंय, नुसतं कुणी म्हंटल की पुंडलिक वरदे....की लोक हरी विठ्ठल म्हणणारच. हा आपला जीवनाचा आणि जणू आत्म्याचा अंश आहे. पंढरपूर ही केवळ एक भूमी नाही, तर देशातील हजारो भक्तांच्या विश्वासाची आणि प्रेमाची ओळख आहे. ती एक हाक आहे जी आत्म्याला स्पर्श करते, वारी म्हणजे फक्त पंढरपूरकडे जाणारे पाऊल नाही, तर तो आहे आत्म्याचा परमात्म्याकडे नेणारा एक आध्यात्मिक प्रवास आहे. अठ्ठावीस युगे उभा असलेला महाराष्ट्राचे लोकदैवत परमात्मा पांडुरंगाची भक्ति आणि

१३ व्या शतकापासून आपल्याला मोठा वारसा लाभलेल्या आषाढ महिना, पंढरपूरची पिढ्यानपिढ्या सुरू असलेली वारीची परंपरा याचा समग्र वेध घेणारे आणि कायमस्वरूपी संग्राह्य राहील असे "विठ्ठलवारी आनंदयात्रा" हे "वास्तुरहस्य प्रकाशन"द्वारा प्रकाशित पंढरपूरच्या वारीवरील आधुनिक कॉफी टेबल बुक नुकतेच प्रकाशित झाले आहे. या बुकाची मूळ संकल्पना : बबनराव पाटील तर मुख्य संपादकः डॉ.सुलभा कोरे या आहेत.

मुखपृष्ठः पद्मश्री अच्युत पालव यांनी रेखाटले आहे. उद्धव ठाकरे, महेश लोणकर, राहुल गोडसे यांचे फोटोग्राफी, तर आतील उत्कृष्ट चित्रे पद्मश्री वासुदेव कामत, सुदर्शन बारापात्रे, रुपेश मिस्त्री, निलेश जाधव यांची आहेत. स्वामी गोविंददेव गिरि, गहिनीनाथ महाराज ओसेकर (सहअध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती), केंद्रीयमंत्री श्रनितीन गडकरी आणि भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या आहेत. विशेष आकर्षण म्हणजे पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर यांची "विज्ञान आणि श्रद्धा" या विषयावर दीर्घ मुलाखत आहे.

वारीविषयक नामवंत तज्ज्ञांचे(डॉ.सदानंद मोरे, अभय टिळक, डॉ.भावार्थ देखणे, डॉ.अरुणा ढेरे, डॉ.वरदा संभूस, डॉ.वैशाली लाटकर, प्रवीण दवणे, वामनराव देशपांडे इत्यादी) ३७ लेख आणि त्या लेखांचे भावपूर्ण अभिवाचन दफ कोडच्या रूपात वारीविषयक जवळजवळ २८० अतिशय देखणी पेंटिंग्स आणि फोटोज तसेच वारी संदर्भात समग्र माहिती देणारे तज्ज्ञांचे ६४ व्हिडिओ दफ कोडच्या रूपात आहेत. इम्पोर्टेड आर्ट पेपरवर, संपूर्ण सर्व २८० पाने रंगीत छपाई, मोठे आयताकार (१४ इंच ९.२५ इंच) हार्ड बाउंड पुस्तक, पुस्तकाकरिता सुंदर हार्ड बाउंड बॉक्स एकूण वजन-३ किलो आहे. वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या ग्रंथाच्या माहितीसाठी 9821318552 या मोबाईलवर संपर्क साधावा.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. १ :** महसूल खात्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत शासनाने काही मापदंड (इंडिकेटर) निश्चित केले आहे. या मापदंडासाठी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांकडून शासनाने प्रस्ताव मागवले होते. यामध्ये अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी सादर केलेला प्रस्ताव उत्कृष्ठ ठरल्यामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेत आयोजित महा-स्ट्राईड कार्यशाळेत हा सत्कार करण्यात आला. याच कार्यशाळेत विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी 'महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाकरिता मुख्य कार्यप्रदर्शक निर्देशक निश्चित करणे' या विषयावर अहवाल सादर केला. तो सर्वोत्कृष्ट ठरल्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या अहवालासाठी अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, वाशिमच्या जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनीही काही मुद्दे सुचविले होते. त्यामुळे समिती सदस्य म्हणून या सत्काराप्रसंगी ते उपस्थित होते.महसूल विभागामार्फत विविध प्रशासकीय विभागांच्या माध्यमातून क्षेत्रिय स्तरावरील विद्यमान कार्यपद्धती, योजनांची परिणामकारकता, कामकाजातील कार्यक्षमतेचे मुल्यांकन, माहिती व्यवस्थापन प्रणाली याचा सखोल अभ्यास करुन केला. तसेच उपाययोजना व शिफारशी करण्याकरिता, राज्यातील सहाही विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विषयवार समित्या गठीत करण्यात आल्या होत्या.

त्यापैकी अमरावती विभागाच्या समितीकडे 'विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाकरिता मुख्य कार्यप्रदर्शक निर्देशक निश्चित करणे' हा अत्यंत महत्वपूर्ण विषय देण्यात आला होता. अत्यंत कमी वेळेत केपीआय अहवाल तयार अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. नोंदणी महानिरीक्षक तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख यांच्याशी चर्चा करण्यात आली. या सर्वांमुळे अत्यंत महत्वाचे महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारसरणीला प्रेरक असणारे शासनाच्या अत्यंत महत्वपूर्ण अशा महसूल विभागाचे मुख्य कार्यप्रदर्शक निर्देशके तयार करता आली. यासाठी नेमण्यात आलेल्या उपसमितीतील अध्यक्ष व सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यामुळेच या समितीला अत्यंत कमी वेळात हे कार्य (केपीआय अहवाल) पूर्ण करता आले, असे विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी सत्काराप्रसंगी सांगितले.

# शहरातील अतिक्रमणधारकांना न्याय मिळवून देणार:माजी आमदार दिलीपकुमार सानंदा

## उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



■ महासागर प्रतिनिधी,

**खामगाव, दि. १ :** खामगाव खामगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी हिटलरशाही पध्दतीने अतिक्रमण निर्मुलन मोहिम राबवताना अनेक गोरगरीब अतिक्रमण धारकांना नोटीस न देता त्यांचे अतिक्रमण जेसीबीद्वारे चक्काचूर करुन शहरातील जनतेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या या अमानवीय कृतीमुळे तळहातावर पोट भरणाऱ्या हजारो अतिक्रमण धारकांसमोर रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे.एकीकडे मुख्याधिकारी हे लोकांना कायद्याचे ज्ञान देतात तर दुसरीकडे स्वतः कायद्याचे उल्लंघन करुन रुग्णालयासाठी राखीव असलेल्या जागेमध्ये बेकायदेशीररीत्या स्वतःकरता कोट्यवधी रुपयांचे निवासस्थान बांधुन कायदा पायी तुडवत आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या या मनमानी आणि हिटलरशाही विरोधात आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सर्व संबंधितांना तक्रार केली आहे. १ जुलै रोजी मुख्यमंत्री,उपमुख्यम त्री यांची प्रत्यक्ष भेट घेवुन अमानवीय पध्दतीने अतिक्रमण काढून महायुती सरकारची बदनामी करणारे भ्रष्ट मुख्याधिकारी यांचा पर्दाफाश करुन अतिक्रमण धारकांना न्याय मिळवून देवुन अशी ग्वाही सानंदा यांनी दिली. खामगाव नगर पालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या वतीने २७ व २८ जून रोजी खामगाव शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी माजी आमदार र दिलीपकुमार सानंदा यांनी २८ जून रोजी श्री चंदनशेष चौक मधील अतिक्रमण धारक व नेहरु कॉम्प्लेक्समधील व्यावसायिकांची भेट घेतली व अतिक्रमण निर्मुलन मोहिमे दरम्यान झालेल्या नुकसानीबाबत व्यावसायिकांची आस्थेने विचारपूस करुन माहिती जाणून घेत तुम्हाला निश्चितपणे न्याय मिळवून देईल असा धीर दिला.यावेळी माजी नगराध्यक्षा सरस्वती खासने, मनोज वानखडे, संजय शर्मा, माजी नगरसेवक ओम शर्मा, सुनीलसिंह ठाकूर, मंगेश इंगळे, प्रताप कदम, वैभव वानखडे,अतुल संत,तुषार चंदेल, केशव कापले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी माजी आमदार सानंदा यांनी अतिक्रमण धारक नागरिकांना सोबत घेवून २८ जून रोजी उपविभागीय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी यांना निवेदन दिले. अन्यायाबाबत सविस्तर माहिती दिली. उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांना निवेदन देताना माजी आ. सानंदा'

# जनगणनेच्या नावाखाली लुटणारी टोळी सक्रिय

## चाकूच्या धाकावर महिलेला लुटले



■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. १ :** शहरात जनगणनेच्या नावाखाली लुटणारी टोळी सक्रिय झाली असून चाकूचा धाक दाखवून एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे नेकलेस, अंगठी आणि रोख हिसकावण्यात आली. ही धक्कादायक घटना शहरातील धामणगाव मार्गावर असलेल्या मासोळी गावाजवळील गजानन भाग दोन येथे सोमवार, दि. ३० जूनला दुपारी घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली असून नागरिकांनो सावधान...म्हणण्याची वेळ आली आहे. या टोळीच्या मुसक्या आवळण्याचे आव्हान पोलिसांसमोर येवून ठेपले आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, शहरातील धामणगाव मार्गावर असलेल्या मासोळी गावाजवळील गजानन भाग दोन येथील रहिवाशी प्राची गुल्हाणे वय २८ वर्ष यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनूसार, सोमवारी दुपारच्या सुमारास दोन अनोळखी युवक जनगणना करण्यासाठी आलो असल्याचे सांगत त्यांच्या घरात शिरले. दरम्यान त्यांची विचारपूस करीत अचानक त्यांना चाकूचा धाक दाखवून किचनमध्ये घेऊन गेले, त्यानंतर गळ्यातील सोन्याचा नेकलेस आणि हातातील अंगठी हिसकावून घेतली. दरम्यान बेडरूममधील कपाट उघडण्यास सांगून त्यामधील बारा हजार रुपयाची रोख हिसकावून महिलेला बाथरूनमध्ये बंद करीत पळ काढला. या घटनेची माहिती शहर पोलिसांना मिळताच तातडीने घटनास्थळ गाठून पाहाणी केली. त्यानंतर महिलेने शहर पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दिली.

# भरधाव दुचाकींच्या धडकेत एक ठार, २ गंभीर जखमी



**कळंब:** भरधाव दोन दुचाकींची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून दोन गंभीर जखमी झाले. ही घटना कळंब -राळेगाव मार्गावरील आमला पिंपळगाव फाट्याजवळ रविवारी दि. २९ जूनला रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. गुणवंत संतोषराव मस्कर (वय २९) वर्ष रा. विदर्भ हाऊसिंग सोसायटी, यवतमाळ असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, यवतमाळातील विदर्भ हाऊसींग सोसायटीतील गुणवंत मस्कर हा टीव्हीएस या दुचाकी क्रमांक एमएच-३२-झेड-७३ने राळेगाव येथून यवतमाळ जात होता. अश्यात रविवारी रात्री कळंब सळेगाव मार्गावरील आमला पिंपळगाव फाट्याजवळ अचानक समोरून येणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएच-२९-वाय-२७८३ चालकाने गुणवंत मस्कर याच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत गुणवंत याचा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या दुचाकीवरील पाथ्रड येथील दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना कळंब शासकीय रुग्णालयातून यवतमाळ शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आले. दरम्यान कळंब पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही अपघातग्रस्त वाहाने पोलिस ठाण्यात लावली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये घेतला प्रवेश

## मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या नेतृत्वावर विश्वास




■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. १ :** राळेगाव विधानसभा मतदारसंघातील कळंब शहर व तालुक्यातील शेकडो मान्यवरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वावर व आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या विकासाभिमूख कार्यशैलीवर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. मुंबई येथील भाजपा प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके व जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या प्रवेश कार्यक्रमात कळंब परिसरातील विविध राजकीय, सामाजिक पातळीवर सक्रिय असलेल्या मान्यवरांनी भगव्या पक्षाचा स्वीकार करत नव्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली.

नगरसेवक आशिष धाबे, नगरसेवक रुपेश राऊत, नगरसेवक सागर समुद्रे, निखिल ठाकरे, मिथुन कुठे, देवानंद वरफडे, देवेंद्र वानखडे, देवराव राठोड, आदर्श चिंचारकर, शांतीलाल चव्हाण, लक्ष्मण सुरपाम, अशोक गायकवाड, यांच्यासह अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांनी प्रवेश घेतला.सर्वच कार्यकर्ते भाजपच्या विचारधारेचा प्रसार करत कार्यक्षेत्रात सक्रीय होतील, असा विश्वास पक्षनेत्यांनी व्यक्त केला.

ना. डॉ. अशोक उईके यांच्या नेतृत्वाखाली राळेगाव मतदारसंघात झालेल्या विकासकामांची फलश्रुती म्हणून हे प्रवेशाकडे पाहिले जात आहे. मतदारसंघाच्या प्रत्येक भागात भाजपचे बळ वाढत असल्याचे स्पष्ट संकेत यामुळे मिळत आहेत.

# युवा हिंदू प्रतिष्ठनचे सामूहिक हनुमान चालीसा पठण




■ महासागर प्रतिनिधी,

**खामगाव, दि. १ :** हिंदू संस्कृतीचा जागर, युवा पिढीमध्ये धार्मिक संस्कार आणि समाजात एकता निर्माण करण्याच्या उद्देशाने युवा हिंदू प्रतिष्ठानच्या वतीने विशेष अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत खामगावसह परिसरातील ग्रामीण भागात सामूहिक हनुमान चालीसा पठणाचे आयोजन केले जात आहे. या कार्यक्रमाचे आयोजन हिंदू समाजाचे संघटन व जागरण प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष रोहित पगारिया यांच्या पुढाकारातून करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून खामगाव शहरात शनिवारी रात्री सामूहिक हनुमान चालीचा पठणाचा १०८ वा कार्यक्रम पार पडला. शहरातील विविध भागातून युवक, महिला, नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सामूहिक पठणाच्या माध्यमातून परिसरात एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्वांना मोफत हनुमान चालीचा पुस्तिका वितरित करण्यात आली. यावेळी आयोजकांच्या वतीने युवकांना संबोधित करताना सांगण्यात आले की, हनुमान चालीसा हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून, त्यामध्ये मानवी जीवनाला दिशा देणारे विचार आणि संस्कार दडले आहेत. आजच्या पिढीमध्ये धर्म आणि संस्कृतीविषयी जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. त्यामुळेच युवा हिंदू प्रतिष्ठनने ग्रामीण भागात हे अभियान सुरू केले आहे.

खामगावसह परिसरातील गावागावांमध्ये पुढील काळातही असे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गावांतील युवकांपर्यंत पोहचून हनुमान चालीसाचे महत्व पटवून देण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे. विशेष म्हणजे दर शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमात ५०० ते ६०० जण सहभागी होतात आणि हनुमान चालीचा चे सामूहिकपणे पठण करतात त्यामुळे मंदिराच्या परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झालेले असते हनुमान चालीसाच्या पठणाच्या कार्यक्रमानंतर आरती करून प्रसादाचे वितरण करण्यात येते. सदर कार्यक्रमामुळे युवकांमध्ये धार्मिक जाणिवा जागृत होत असून, एकत्र येण्याची आणि समाजहितासाठी कार्य करण्याची भावना देखील निर्माण होत आहे. आयोजकांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. भजोपर्यंत शेवटच्या घरातील व्यक्ती या सामूहिक हनुमान चालीचा पठण कार्यक्रमात सहभागी होत नाही तोपर्यंत हा कार्यक्रम अविरतपणे सुरू राहणार आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान, गोमातेचे रक्षण यासह हिंदू बांधवांच्या रक्षणासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहे. -रोहित पगारिया, हिंदू समाजाचे संघटन व जागरण प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष

# धरती आबा योजनेद्वारे आदिवासी युवकांना दिल्या रोजगाराच्या संधी



■ महासागर प्रतिनिधी,

**लोणार, दि. १ :** शासनाच्या धरती आबा योजनेद्वारे आदिवासी युवकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतील, असे मत आदिवासी नेते भगवान कोकाटे यांनी व्यक्त केले. धरती आबा योजनेअंतर्गत टिटवी व गोत्रा येथे कार्यशाळा पार पडली. यावेळी टिटवी येथील कार्यशाळेत कोकाटे बोलत होते. या कार्यशाळेस नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे, मंडळ अधिकारी विजय पोफळे, वरिष्ठ सहाय्यक आदिवासी प्रकल्प अधिकारी गोपाळ वानखेडे, निवृत्ती धोत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भगवान कोकाटे यांनी यावेळी आदिवासी बांधवांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. राज्य शासनांच्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचा विकास साधला जाईल.

या माध्यमातून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे ते म्हणाले. या कार्यशाळेद्वारे शासनाच्या योजनांची माहिती थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश साध्य झाला आहे. यामुळे आदिवासी समाजाला शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. लोणार तालुक्यातील टिटवी, गोत्रा, मेहकर तालुक्यातील भोसा, कणका, वाघदेव, द्रुगबोरी, रत्नापूर, नागेशवाडी, टेंभुरखेड, टीमटाला, जमुना या गावांमधील आदिवासी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही कोकाटे यांनी केले. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लाभार्थ्यांना केले विविध प्रमाणपत्रांचे वाटप**

यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी मच्छीमार सहकारी संस्थेच्या सभासद व मत्स्य कास्तकार शेतकऱ्यांसाठी ९० टक्के अनुदानावर दुचाकी, सायकल, आईस बॉक्स,आटोरिक्षा, वातानुकूलित चारचाकी, मालवाहतूक वाहन, तसेच एक हेक्टर क्षेत्रात मत्स्य संगोपन तळे व आईस फॅक्टरी उभारणीस ाठीच्या योजनांची माहिती दिली. वरिष्ठ सहाय्यक आदिवासी प्रकल्प अधिकारी गोपाळ वानखेडे यांनी आदिवासी विकास विभागाच्या काटेरी कुंपण, किराणा स्टॉल, पॉवर ट्रेलर, बिरसा मुंडा कृषी सिंचन विहीर आदी योजनांची माहिती दिली. या कार्यशाळेत आदिवासी बांधवांना शिधापत्रिका, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, आयुष्यमान भारत कार्ड आदी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# आरोग्य विभागाचे कामकाज ठप्प

**यवतमाळ :** राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कर्मचाऱ्यांचे शासकिय सेवेत समायोजन करावे यामागणीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार २०० कर्मचाऱ्यांनी सोमवारी दि. ३० जून रोजी असहकार लक्षवेध आंदोलन केले. या आंदोलनामुळे आरोग्य विभागाचे जिल्हाभरातील कामकाज ठप्प झाले होते. शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास आणखी तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुमारे १४ हजारपेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा लेखा व्यवस्थापक, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, लेखापाल, अधिपरि ारीका, परिचारीका, डाटा एन्ट्री ऑपरेटर यासह इतर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. राज्यभरातील या कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत सामावून घेण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली होती. दिड वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापही समायोजन झाले नाही.

# ३९५ शाळेत सीसीटीव्हीचा प्रस्ताव

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. १ :** द्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व विद्यार्थिनींच्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकाराला आळा बसवण्यासाठी सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सरकारने आदेश दिले आहेत. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २ हजार १०३ शाळा आहेत. यापैकी विद्यार्थीनींची सर्वाधिक पटसंख्या असणाऱ्या ३९५ शाळांमध्ये कॅमेरे लावण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. परंतु, जिल्ह्यात या निर्णयाला दिर्घ कालावधी लोटूनही नवीन शैक्षणिक वर्षात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची प्रतिक्षाच असल्याने शासकीय शाळांनीच हरताळ फासल्याचे दिसत आहे.

बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकार खडबडून जागे झाले होते. शाळांमध्ये कॉर्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर विशाखा व सखी सावित्री समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शाळेत सीसीटीव्ही लावण्याचे निर्देश दिले होते. शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये कॅमेरा बसवण्यासाठी नियोजन समितीतून निधीची तरतूद केली. त्यानुसार ज्या शाळेत विद्यार्थीनींची पटसंख्या सर्वाधिक आहे अशा शाळांमध्ये सर्वांत आधी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याला प्राधान्य दिले. जिल्ह्यात सर्वाधिक पटसंख्या असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या ३९५ शाळा आहे. त्यावेळी प्रत्यक्षात ९ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतू जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवून निधी प्राप्त झाला नाही. प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, शासनाचे हे आदेश कागदावरच राहिले आहे. सावित्री समिती, तक्रार पेट्याही फक्त कागदोपत्रीच बदलापूर दुर्घटनेनंतर शाळांमध्ये सखी सावित्री समिती नियुक्त करण्यासह, तक्रार पेट्या ठेवणे त्यामधील तक्रारींची गांभीर्याने दखल घेण.

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**गती शक्ती मल्टी मोडल कार्गो टर्मिनल (GCT) साठी ई.ओ.आय. सूचना**

**मंडळ:** नागपूर
**विभाग:** वाणिज्य
**ईओआय क्र.:** SECR/NAG/GCT/EOI/KEZ/01 दिनांक: 28.06.2025
**कार्य चा नाव:** पूर्ण रूपाने रेल्वे जमिनीवर किंवा अंशतः रूपाने रेल्वे जमिनीवर आणि और अंशतः रूपाने गैर-रेल्वे जमिनीवर केळझर स्टेशनजवळ गति शक्ति मल्टी मोडल कार्गो टर्मिनल (जीसीटी) ची स्थापना साठी स्वारस्य व्यक्त करणे (EOI).
**ईओआय बंद होण्याची तारीख आणि वेळ:** दिनांक 14.07.2025 ला 15:00 वाजता.
**इतर तपशील:** कोणत्याही प्रश्न/तपशील आणि EOI दस्तऐवज साठी पक्षकार श्री अभय गणवीर, CCI/Frt, नागपूर मंडळ यांच्याशी मोबाईल क्र. 9730078966 / 9730078970 वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधू शकतात.

**मंडळ रेल प्रबंधक (वाणिज्य), दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर**

AIM/12-61

स्वच्छ भारत अभियान
एक कदम स्वच्छता की ओर

**MIRAE ASSET**
Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / seminars, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
|---|---|---|
| July 02, 2025 | 6:00 P.M. | Regenta Central Hotel & Convention Centre, Jagnade Square, Nagpur - 440 009 |

**MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited.** CIN - U65990MH2019PTC324625)
**Registered & Corporate Office:** 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), customercare@miraeasset.com www.miraeassetmf.co.in

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**e-Tender Notice**

Commissioner NMC invites e-tenders for the following work. These E-Tenders can be downloaded by the Registered Contractors of Nagpur Municipal Corporation from the e-tendering Portal **(www.mahatenders.gov.in).** The terms and conditions of e-tenders are available on the e-tendering Portal **(www.mahatenders.gov.in).** The sale and purchase of e-tenders can be done through internet.

| Name of the work | Tender Cost |
|---|---|
| Construction of Shed First Floor at UPHC Bidipeth in P. No. 30 | 1468601 |
| Providing and Fixing of Pandol and Barricading and Pro. and Const. Temporary Ladies and Gents Latrine and P/L Murum, Dust For Temporary Road For Hazrat Baba Tajuddin Urs at Baba Tajbag in P. No. 30 | 1246932 |

**Note :-1)** Tender Submission Start Date : **02.07.2025. 2)** Tender Sales End Date/ Submission End Date : **09.07.2025. 3)** Tender opening Date: **10.07.2025** (If Possible). **4)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document. **5)** Special Tender Condition :- **1.** Completion period of this work is essence of contract as per Indian Contract Act. **2)** Penalty of **Rs.10,000/- per day** for delay of work except in case of unavoidable situation.

**Advt No. 237 PR**
**Date 01.07.2025**

**Executive Engineer, Zone 05**
**N.M.C., Nagpur**

**MAHAGENCO**
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**E-Tender Specification No:-** CE(C)-II/KRD/Tech/T-02/3000057759/2025-26.

**Name of work:** Koradi TPS - Work of providing & installation of furniture in the premises of Sewanand School at Mahadulla near TPS Koradi.

| | |
|---|---|
| **Estimated Cost :** Rs. 1,75,15,006.00 | **Time Limit:** 3 (Three) Months (Including monsoon period) |
| **Issue Period : -** 02.07.2025 to 09.07.2025 upto 17.30 Hrs. | **Last Date of Submission –** 10.07.2025 upto 15.00 Hrs. |
| **Tender Fee:** Rs. 1180.00 Rs. One Thousand One Hundred Eighty only. (By E-Payment) | **E.M.D.-** Rs. 1,75,500.00 (By E-Payment/RTGS/NEFT) |

**Contact Person:** Dy. Chief Engineer (Civil), O/o Chief Engineer (C)-II, M.S.P.G.C.L., Koradi. Mob. No.: 8408889213, **E-mail :** cgmcivil2@mahagenco.in

For further details visit our website : **www.eprocurement.mahagenco.in.**
Agencies are requested to register themselves for future E-Tender.

राजकारणात प्रदीर्घ काळ वावरणारे व मंत्रीपदाला गवसणी घालण्याचा अनुभव पदरी असलेल्या बबनरावांनी सामान्य माणसाला त्याची किंमत दाखवून दिल्याने ते 'बबनराव' नव्हतेच; तर गावातील पारावर बसून चकाट्या मारणारा 'बबन्या' होता हेच आता सिध्द झाले. लोक त्यांना विचारतात की, मोदींनी काय दिलं? फडणवीसांनी काय दिलं? आणि आमदाराने काय दिलं? पण, हे जगावेगळे बबनराव म्हणतात, गावात जे काही मिळालं, ते गेल्या २५ वर्षांत मीच दिलं. इतर कोणत्याही पक्षाच्या नेत्याने तुम्हाला माचिसची डब्बीही आणून दिली नाही. 'तुमच्या आई'चा पगारही मीच सुरू केला, 'तुमच्या बापा'ची पेन्शन मीच सुरू करून दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तुमच्या बापाला बियाण्यासाठी सहा हजार रुपये दिले. लाडकी बहीण योजनेंतर्गत तुमच्या आई, बहीण आणि पत्नीच्या नावावर पैसे दिले. तुमच्या अंगावरचे कपडे, पायातील चप्पल-बूट आणि हातातील मोबाइल हे सर्व आमच्या सरकारच्या कृपेने आहे. तरीही आमच्या विरोधात बोलायची हिंमत करतात? आता या बबनरावांना विचारावेसे वाटते की, २०१४ आधी शेतकरी काय नागडे राहत होते काय? त्यांच्या बोलण्याने भाजपाची मानसिकता काय आहे? ते महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्गीय, गोरगरीब नागरिकांना दाखवून दिली, असेच आता म्हणावे लागेल. सरकार शेतकऱ्याला लाडक्या बहिणींना पैसे देते म्हणजे उपकार करत नाही किंवा हे पैसे सरकार देत असताना कोणीही सरकारकडे मागणी केली नव्हती, मोर्चे काढले नव्हते. आपली सत्ता जाणार म्हणून केलेला तो उद्योग होता. त्या भीतीपोटीच लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये महिना सुरू केला, शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार सुरू केले. याचा अर्थ तुम्ही तुमच्या खिशातून हे पैसे देत नाही. हे पैसे तर सर्वसामान्य जनतेच्या कराच्या रूपाने जमा झालेल्या पैशातून शेतकऱ्यांच्या लाडक्या बहिणींचा खात्यात येतात. बबनराव तुम्ही आज जे सांगताय की, मोदीच्याच पैशाने तुमच्या पायात चप्पल आहे, अंगावर कपडे आहे, तर मोदी पंतप्रधान होण्याच्या आधी या महाराष्ट्रातील शेतकरी हा काय बिना कपड्याचा नागडा राहत होता काय? बिना चपलेचा आपली शेती कसत होता काय? खरंतर बबनराव तुम्हाला सत्तेचा माज चढला आहे आणि हा माज जनता एक ना एक दिवस नक्कीच उतरवेल. हा माज उतरणारच होता, म्हणूनच तुम्ही शेतकऱ्यांसाठी, बहिणींसाठी विविध योजना अमलात आणल्या. बबनराव देश २०१४ च्या पूर्वीही शेतकरी, कष्टकरी, कामगार, देशातील नागरिक यांच्या घामावरच चालत होता. त्यापूर्वी सुद्धा शेतकऱ्याच्या आत्महत्या होत होत्या आणि त्यानंतर सुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. एवढी सत्तेची गुर्मी असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाही बबनराव?



# हे कसले 'बबनराव' हा तर गावचा..?

परतूर तालुक्यातील वाटूर गावात हर घर सोलर योजनेच्या उद्घाटन कार्यक्रमात बबनरावांनी जी मुक्ताफळे उधळली त्याला तोडच नाही. पारावर बसणाऱ्यांना विशेषतः तरुण रिकामचोट आहे म्हणत त्यांनी टीका केली. पण त्यांना 'रिकामचोट' का रहावे लागते, याचा कधी त्यांनी गांभीर्याने विचार केला का?

लोकशाहीत ही भाषा योग्य वाटते का बबनराव? खरं म्हणजे तुमचे कपडे, बूट या जनतेमुळे मिळाले. आमदारकी जनतेमुळे प्राप्त झाली. तुमच्या गाडीतील डिझेल जनतेमुळेच आहे. तुमचे विमानाचे तिकीट जनताच काढते. विधानसभेतील सध्याचे स्थान जनतेमुळेच आहे. पण बबनराव हवेत गेले, ते खाली यायलाच तयार नाही. लोणीकरांचा 'तोल' गेला की त्यांचे 'लोणी' नासले, हे पहावे लागेल.

याआधीही लोणीकरांनी एका सभेत बोलताना ग्रामस्थांना इशारा दिला होता. विधानसभा निवडणुकीत लीड न मिळाल्याने लोणीकरांनी बोरगावात बोलताना म्हटले की, पाच वर्षांमध्ये कमळाचं एक बटन दाबायचं तेही केलं नाही. मी गावाला आठ कोटींचा सिमेंट रोड दिला. मला मत द्या किंवा नका देऊ. मी दोन-तीन वेळेस चव पाहणार, नाहीतर गावावर फुली मारणार. आता परिसराने बबनरावांना द्यायचे काय बाकी राहिले?

बबनराव लोणीकर परतूरमधून १९९९, २००४, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये निवडून आले आहे. देवेंद्र फडणवीसांच्या २०१४ ते २०१९ या सरकारमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री होते. तरीही त्यांच्यावर अन्याय झाला असे त्यांना वाटते.

शेतकरी हिताच्या चळवळीचे मुद्दे त्यांनी विधानसभेत मांडल्याचे कधी कोणी ऐकले नाही. शेतकऱ्यांविषयीची कळवळ दाखविली असती तर त्यांच्या विषयीचा आदर खूप वाढला असता. भ्रष्ट राजकीय वातावरणात शेतकऱ्याची बाजू प्रामाणिकपणे मांडणारा आज तरी कोणीही दिसत नाही.

एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच असताना दुसऱ्या बाजूला मंत्र्यांची प्रॉपर्टी आकाशाला जाऊन पोहोचत आहे. संजय शिरसाठ नावाचे मंत्री शेकडो कोटी रुपयाचे हॉटेल अल्प किमतीत ताब्यात घेत आहे. ते कमी पडले म्हणून नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे जमीन घेत आहे.

संदीपान भुमरेंच्या ड्रायव्हरच्या नावानं दीडशे कोटींची जमीन असल्याचं समोर आलंय. हैदराबादमधील सालार जंग कुटुंबीतील वंशजानं ही जमीन भूमरेंच्या ड्रायव्हरला 'भेट' म्हणून दिलीय. याप्रकरणी खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे आणि त्यांचा चालक जावेद रसूल यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू असली, तरी तो टाईमपास आहे.

संभाजीनगरमधील जालना रोडवरील दाऊदपुरा येथील ही तीन एकर जमीन आहे. ड्रायव्हरला गिफ्ट मिळालेल्या जमिनीची आमचा काही संबंध नाही. असं स्पष्टीकरण शिवसेनेचे आमदार विलास भुमरे यांनी दिलं असलं तरी सामान्य माणसांना असे गिफ्ट का मिळत नाही. सत्तेवर बसलेल्या नेत्यांच्या ड्रायव्हरला दीडशे कोटीची प्रॉपर्टी मिळत? असेल, तर शेतकऱ्यांची पोरंही त्यांच्याच काय बबनरावांच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून यायला तयार आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

### बबनशेठ इकडे पण लक्ष द्या ना!

अतिवृष्टीचा तडाखा, शेतमालाला भाव नाही, सरकारकडूनही पुरेशी मदत नाही या सर्व परिस्थितीत शेतकरी हतबल झालेला दिसून येतोय. त्यात कोरोना काळात त्यांच्या वाट्याला नको ते आलं. अशात मुलांचं शिक्षण, बँका आणि खाजगी कर्ज याच शेतकरी गुरफटून गेला आणि अशात मग अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग निवडला. अडीच वर्षांत राज्यातील सहा हजार ५८९ नी आत्महत्या केल्या आहे. हा आकडा खुप धक्कादायक आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले, पण त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवाराला सरकारच्या सर्व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, अशी सोय करण्याचा निर्णय झाला. पण, पुढे काही झाले नाही. सर्वाधिक शेतकरी आत्महत्या अमरावती विभागात झाल्या आहेत. अडीच वर्षांत त्याठिकाणी दोन हजार ८०१ तर संभाजीनगर विभागातही दोन हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला सरकारकडून दोन-तीन लाखांची मदत मिळते. पण, मदत देण्याआधी आत्महत्येची कारणे, तो शेतकरी होता का, अशा विविध कारणांची पडताळणी केली जाते. अडीच वर्षांत सहा हजार ५८९ शेतकऱ्यांपैकी एक हजार ७०० कुटुंबांना अद्यापही मदत मिळालेली नाही. हतबल बळिराजाकडून खासगी सावकारांनी व्याजाने दिलेल्या रकमेपोटी जमिनी बळकावल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अशावेळी बबनराव तुम्ही त्यांच्यासाठी काय केले ते तरी एकदा सांगा!

### मस्तवाल बबनराव आपली शैक्षणिक पात्रता काय?

बबनराव लोणीकर यांची शैक्षणिक पात्रता निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात वेगवेगळी माहिती नमूद केलेली दिसते. २००४ आणि २००९ च्या उमेदवारी अर्जामध्ये त्यांनी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बीए प्रथम वर्ष केल्याचे म्हटलं होतं. पण, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपण केवळ पाचवी उत्तीर्ण असल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद केलं आहे. याआधीच्या निवडणुकीत पदवीधर असलेले लोणीकर नंतरच्या निवडणुकीत केवळ पाचवी उतीर्ण कसे? देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत शासनाने शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली व खर्चही केला, परंतु हाती काय लागले तर बेरोजगारी, दारिद्रय, गुन्हेगारी व सरतेशेवटी आत्महत्या. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचे झालेले बाजारीकरण होय. याचाच अर्थ आपण या समाजात शिक्षण व्यवस्थित रुजविले नाही, त्यासाठी योग्य अभ्यासक्रम निर्माण करू शकलो नाही. जो अभ्यासक्रम निर्माण केला तोदेखील का, कशासाठी शिकायचा, हेही निश?चित करू शकलो नाही. या शिक्षण व अभ्यासक्रमातून केवळ अंकाची स्पर्धा निर्माण केली. जो परीक्षेत अधिक अंक घेईल तो अधिक गुणवान ठरतो. असे म्हटले जाते की गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच सुसंस्कृत समाजाचा पाया आहे. पण बबनरावांनी गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेतलेच नाही, त्यामुळे आता त्यांच्याकडून शेतकऱ्यांनी व त्यांच्या पोरांनी अपेक्षा तरी काय कराव्यात ?

# वर्षा सहलीचा आनंद लुटा पण...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत.

शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदयार्चे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो.

अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदयार्चा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते.

अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते. मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले. त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे.

या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता.

दोन वर्षापूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली.

पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात.

वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदयार्चा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात. मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात.

लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात. कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत.

खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मयार्देच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते.

अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे.

पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# विदर्भ निद्रिस्त नि तेलंगणा तत्पर!

नुकतीच राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक मंत्रालयात पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले. त्यात शक्तिपीठ महामार्गाला अग्रस्थान देण्यात आले.

समृद्धी महामार्ग आणि इतर महामार्ग अक्षरशः भ्रष्टाचाराने पोखरला गेला. दीडशे कोटीत बांधलेल्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी आता दोनशे कोटी लागत आहे. असं असलं तरीही राज्यातील अठरा तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आल्याने शेतकरी, आंदोलक आक्रमक होतील, हे चित्र स्पष्ट आहे. यातीलच एक निर्णय म्हणजे जलसंपदा विभागातील कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पण...

इचमपल्ली प्रकल्प हा गोदावरी नदीवर प्रस्तावित असलेला एक बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट जलविद्युत उत्पादन, सिंचन आणि पूर नियंत्रण आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र तेलंगणा राज्यात आहे, पण जमीन आणि जंगल महाराष्ट्रातील सिरोंचा तालुक्यात आहे, ज्यामुळे पुनर्वसन एक आवाहन आहे. तसेच या प्रकल्पामुळे सिंचन आणि जलविद्युत निर्मितीमध्ये वाढ होईल, पण त्याचबरोबर पुनर्वसन आणि पर्यावरणावर होणारे परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे.

१९७८ मध्ये गोदावरी खोऱ्यावर नेमलेल्या पाणी वाटप लवादाने विदर्भाच्या वाट्याला दिलेल्या पाण्याचे नियोजन करण्यात महाराष्ट्र शासन अपयशी ठरले. सिरोंचा तालुक्याला लागून १९८०-८५ मध्ये इचमपल्ली प्रकल्प निर्माण करण्याचा प्रयत्न तत्कालीन आंध्रप्रदेश सरकारने केला होता. त्यावेळी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांनी या प्रकल्पाला कठोर विरोध केला. त्यामुळे हा प्रकल्प थंडबस्त्यात टाकण्यात आला होता. मात्र विदर्भाच्याच पाण्यावर इचमपल्ली प्रकल्प पुनर्जीवित करण्याच्सा अर्थात उभारण्याच्या तीव्र हालचाली तेलंगणा शासनाने सुरू केल्या असून हा प्रकल्प त्यांनी क्रमावर घेतला आहे. त्यामुळे विदर्भाच्या हितासाठी विदर्भवाद्यांनी विशेषतः विदभार्तील नेत्यांनी लक्ष देण्याची गरज भासली आहे.

सिरोंचा तालुक्यातील चपराळाजवळ वर्धा आणि वैनगंगा नदीच्या संगमानंतर प्राणहिता नदी उगम पावते. दीडशे किलोमीटरचा प्रवास करून नगरमजवळ गोदावरी नदीत विलीन होते. या पाण्याचा गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने कधीच वापर केला नाही.

दोनशे वर्षापूर्वी निजामाने हे पाणी हैद्राबादपर्यंत नेण्यासाठी इचमपल्ली प्रकल्पाची संकल्पना १८१० मध्ये मांडली होती. दोन पर्वतांच्या आधारे हे प्रकल्प उभारले जाणार होते. निजामाच्या विनंतीनंतर फ्रेंच सरकारने इंजिनिअरची चमू पाठविली.

तद्नंतर भित बांधण्याचे काम सुरू झाले. मात्र १९३० मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीत या फ्रान्सच्या चमूचा मृत्यू झाला आणि प्रकल्प मागे पडला. त्यानंतर आंध्रप्रदेश सरकारने हे प्रकल्प उभारण्यासाठी पुढाकार घेतला. पण त्याला महाराष्ट्रातून प्रखर विरोध झाल्याने माघार घ्यावे लागले. आता पुन्हा तेलंगणा सरकारने इचमपल्लीसाठी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.

तत्पूर्वी एकीकडे विदर्भात अनेक सिंचन प्रकल्प अर्धवट असताना गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध पाण्याच्या नियोजनाकडे शासनाचे कुठलेही लक्ष नाही. तर दुसरीकडे तेलंगणा राज्य सिंचन प्रकल्प उभारणीकडे युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहे.

यवतमाळ जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या चार आंतरराज्यीय बंधाऱ्यामध्ये चनाखा बंधाऱ्याचे काम शासनाने जोरात हाती घेतले आहे. दुसरीकडे आता तेलंगणामधील करीमनगर जिल्ह्यात येणाऱ्या महादेवपूर तालुक्यातील इचमपल्ली प्रकल्पावर तेलंगणाने लक्ष केंद्रित केले आहे.

विशेष म्हणजे छत्तीसगड राज्याचा भूभागही या प्रकल्पाला लागून असल्याने जलऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याच्या हालचाली चालल्या आहे. यासाठी तेलंगणाचे सुपुत्र असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या सत्काराचे आयोजन करून तेलंगणा सरकारने इचमपल्लीसाठी मदत करावी, अशी आग्रही भूमिका त्यांच्यापुढे मांडली.

विशेष म्हणजे या प्रकल्पामुळे हैद्राबादची तहान भागणार असल्याने आंध्रपदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडूंसह वाय. एस. राजशेखर रेड्डी आणि आता तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर रावसुद्धा इचमपल्ली प्रकल्पासाठी प्रचंड आग्रही आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंच्यात मात्र या प्रकल्पाविरोधात स्थानिकांनी उठाव केला होता. अशा स्थितीत राज्य शासनाने विदभार्तील सिंचनाच्या दुरावस्थेवर लक्ष देणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

गोदावरी खोऱ्याचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १५२ लाख हेक्टरचे आहे. त्यापैकी लागवड योग्य क्षेत्र ११२ लाख हेक्टर असून या खोऱ्यातील १५४ अब्ज घनफूट पाणी वापराविना आहे. १९७८ मध्ये नेमलेल्या लवादाने विदर्भाच्या वाट्याला दिलेल्या पाण्याचे नियोजन न झाल्याने आता तेलंगणा विदर्भाच्या पाण्यावर नजर ठेवून आहे.

मुळात गोदावरीचे पाणी विदर्भात रोखल्या गेले असते तर निश्चितच आज विदर्भातील सिंचन स्थिती खूप वेगळी असती यात काही शंका नाही.

---

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
७०५७१८५४७९

# आसमंती झुले

आसमंती कोणी
बांधलेत झुले
आकाशात फुले
इंद्रधनू

आकाशात कुणी
विखूरले रंग
सुंदरता संग
निळाईची

इंद्रधनू कमान
आकाशात झुले
चांदण्यांची मुले
साक्षीदार

इंद्रधनु शोभे
निळ्या अंबरात
लावलीय वात
प्रकाशाची

सुंदर रंगाची
सजली कमान
ताऱ्याच्या समान
चमकती

विस्तीर्ण धरणी
मोकळे आकाश
रवीचा प्रकाश
निसर्गात

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
मूर्तिजापूर, जि. अकोला.



# पंढरीचा मेळा

अमोल तपासे
सीताबर्डी, नागपूर.
९९६०६७३७८९

मेळा आषाढी-कार्तिकीचा,
रंगला विठ्ठल नामाचा.
गजर हरी विठुरायाचा,
मुखी नाम वारकऱ्यांचा.

तुळशीची माळ गळा,
पांडुरंगा तुझ्या चरणी.
वाजे मृदंग अन् टाळ,
रंगली अभंगाची वाणी.

विठ्ठल भक्ती रसाची वृष्टी,
आनंदाने भरले अंबर.
दर्शनाने तृप्त झाली दृष्टी,
विठ्ठल नामाचा गजर.

वैष्णवांचे माहेर पंढरपूर,
चंद्रभागेत अंग अंग न्हाऊ.
विठ्ठल नामाचा महासागर,
सार्थक जन्माचे निरंतर.

## पावसाळ्यात संसर्गाच्या आजारांपासून दूर राहाण्यासाठी
# स्वयंपाकघरातील मसाले ठरतील फायदेशीर



भारताला मसाल्यांची खाण म्हटले जाते. येथे अनेक प्रकारचे मसाले पिकवले जातात. ते केवळ अन्नाची चव वाढवतातच, पण शरीरालाही फायदा करतात. त्यांच्यात अनेक आरोग्यदायी गुणधर्म आहेत, जे रोगांना मुळापासून नष्ट करण्याचे काम करतात.

तुमच्या स्वयंपाकघरात औषधाच्या पेटीपेक्षा जास्त शक्तिशाली औषधे आहेत. आजारांशी लढण्याचा हा पहिला मार्ग आहे, जो आजींच्या काळापासून चालू आहे. पीसीओएसपासून ते बॅक्टेरिया नष्ट करण्यापर्यंत त्यांचे अनेक फायदे आहेत.

**मेथी दाणे :** मधुमेह आणि कोलेस्टेरॉल दोन्ही एकत्रितपणे त्रास निर्माण करतात. कोलेस्टेरॉलमुळे मधुमेहाच्या रुग्णांची प्रकृती बिघडू शकते. यासाठी तज्ञांनी मेथीचे दाणे खाण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे टाइप २ मधुमेहाच्या रुग्णांमध्ये कोलेस्टेरॉल प्रोफाइल सुधारते. जगभरातील लाखो लोक या दोन्ही आजारांनी त्रस्त आहेत.

**दालचिनी :** महिलांमध्ये PCOS आणि PCOD वाढत आहेत. हे त्यांच्या हार्मोन्समधील असंतुलनामुळे आहे. पण तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही कारण दालचिनी यामध्ये फायदेशीर आहे. ती हार्मोन्स संतुलित करण्यास मदत करते.

**लवंग :** लवंग तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. पावसाळ्यात संसगार्चा धोका वाढतो . बॅक्टेरिया, बुरशी आणि विषाणूंमुळे अनेक आजार होऊ शकतात. पण तज्ञांच्या मते, लवंग तेलात हे सर्व सूक्ष्मजंतू मारण्याची शक्ती आहे.

**पचन सुधारते :** मसाल्यांमध्ये पचन सुधारण्याची क्षमता असते. म्हणून, ते अन्नासोबत घेतले जातात जेणेकरून अन्न सहज पचते. जर तुम्हाला पचनाची समस्या असेल तर योग्य मसाल्यांचा वापर करा.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

मसाले खाल्ल्यामुळे तुम्हाला संसर्गाचे आजार होत नाहीत.

मसाल्यांचे सेवन केल्यामुळे तुमची रोगप्रतीकारकशक्ती वाढण्यास मदत होते.

तुम्हाला सर्दी, खोकला किंवा ताप यांच्या सारख्या समस्या होत असतील तर स्वयंपाकघरातील काही मसाल्यांचा वापर केल्यास होतील फायदे. बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये अनियमित पाळीच्या समस्या उद्भवतात त्यांनी मसाल्यांच्या काढ्याचे सेवन करावे.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# विनोदाचे महत्व

धावपळीच्या जीवनात
व्यक्ति होतो संत्रस्त
संवादासाठी विनोदी
शैलीचा कराल वापर
चैतन्य संचारेल सर्वत्र ..

हास्याचे उडता कारंजे
मन होई ताजे ताजे
तनावाला मिळते मुक्ति
जिवनाला मिळते शक्ति

# दत्ता मेघे इंस्टीट्यूट ऑफ हायर एजुकेशन एंड रिसर्चने पदव्युत्तर विद्यार्थ्यांना बेडसाइड अल्ट्रासोनोग्राफी कौशल्याने सक्षम केले

**नागपूर, १ जुलै :** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) (डीयू) च्या स्कूल ऑफ एक्सपिरिएन्शियल लर्निंग आणि सिम्युलेशन सेंटर (एसईएल आणि एससी) ने शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) आणि इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन (आयएससीसीएम) नागपूर शाखेच्या सहकार्याने २५ मे २०२५ रोजी दत्ता मेघे मेडिकल कॉलेज कॅम्पस, वानाडोंगरी, नागपूर येथे बेसिक पॉइंट ऑफ केअर अल्ट्रासोनोग्राफी (पीओसीयूएस ) कार्यशाळेचे आयोजन केले.
ही कार्यशाळा विशेषतः पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आली होती, ज्याचा उद्देश रिअल–टाइममध्ये अल्ट्रासोनोग्राफी वापरून बेडसाइड निदान कौशल्ये वाढवणे आणि क्लिनिकल निर्णय घेण्याची क्षमता सुधारणे हा होता. या कार्यक्रमात दत्ता मेघे मेडिकल कॉलेज, जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज (जेएनएमसी), आणि एनकेपीएसआयएमएस येथील ५० हून अधिक पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
या कार्यशाळेमध्ये अल्ट्रासोनोग्राफीची मूलभूत माहिती, लंग पीओसीयूएस, कार्डिएक पीओसीयूएस, एअरवे अल्ट्रासाऊंड, फास्ट आणि ईफास्ट, सेंट्रल व्हेनस कॅन्युलेशन, डीप वेन थ्रॉम्बोसिस (डीव्हीटी) स्क्रिनिंग आणि ट्रॉमा अल्ट्रासाऊंड प्रोटोकॉल यासारख्या महत्वाच्या घटकांचा समावेश होता. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना लाईव्ह प्रात्यक्षिके, मार्गदर्शक स्कॅनिंग सत्रे आणि संवादात्मक चर्चांद्वारे व्यावहारिक अनुभव देण्यात आला.



या शैक्षणिक सत्रांचे नेतृत्व डॉ. शाहनवाज सिद्दिकी, डॉ. राहुल हीवांज, डॉ. पारस जुनके, डॉ. पल्लवी मेश्राम, डॉ. रश्मी अग्रवाल आणि डॉ. चौकसे या मान्यवर प्राध्यापक पॅनेलने केले. त्यांच्या क्लिनिकल कौशल्यामुळे प्रशिक्षण अधिक समृद्ध झाले. विद्यार्थ्यांना ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त वाटली आणि उपस्थित प्राध्यापकांनी उत्कृष्ट पायाभूत सुविधा, कार्यशाळेचे सुरळीत आयोजन आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यांचे विशेष कौतुक केले.
डॉ. अंजली बोरकर, एचओडी अनेस्थेशिया, यांनी सांगितले की पीओसीयूएस हे अलीकडील वैद्यकीय व्यवस्थेत, विशेषतः अनेस्थेशिया आणि क्रिटिकल केअरमध्ये, एक अविभाज्य भाग बनला आहे. अशा केंद्रित कार्यशाळांचे आयोजन भविष्यातील डॉक्टरांना वेळेवर हस्तक्षेप करण्यासाठी आवश्यक कौशल्य देण्यात महत्त्वपूर्ण ठरते, असे त्यांनी अधोरेखित केले.
या कार्यशाळेला डॉ. अनुप मरार (डायरेक्टर डीएमआयएचईआर ऑफ कॅम्पस), डॉ. उज्वल गजभे (डीन), डॉ. बी. आर. सिंग (व्हाईस डीन), डॉ. वसंत गावंडे (सीएमएस, एसएमएचआरसी), आणि डॉ. प्रतिभा देशमुख (संचालक, ॲनेस्थेशिया) यांचे भक्कम संस्थात्मक पाठबळ लाभले.
या कार्यशाळेचे काटेकोरपणे संयोजन डॉ. नेहा गोयंका आणि डॉ. पारस जुनके (आयएससीसीएम) यांनी केले. ज्यांना डॉ. अदीबा सिद्दिकी, डॉ. रोशनी मनवानी, डॉ. वरुण, श्री. विवेक भारद्वाज, श्री. अभिषेक कुमार, आणि श्री. योगेश मस्के (एसईएल आणि एससी, डीएमआयएचईआर) यांच्या आयोजन समितीने सक्रिय साथ दिली. डॉ. आनंद हटगावकर (विभागप्रमुख, रेडिओलॉजी) आणि डॉ. राजसी सेनगुप्ता (एचओडी ओबीजीवाय) यांनी अल्ट्रासाऊंड मशीन व कार्यक्रम स्थळाची व्यवस्था उपलब्ध करून देत मौल्यवान योगदान दिले.
कु. आलिया यांच्या नेतृत्वाखाली श्री. प्रफुल्ल धाबेकर, श्री. विनोद गजबिये, एमसीएच व्यवस्थापक, सोडेक्सो आणि हाऊसकीपिंग टीम यांनी सुट्टीच्या दिवशीसुद्धा उत्कृष्ट समन्वय ठेवून कार्यशाळेची अंमलबजावणी केली.
हा उपक्रम संस्था सातत्याने वैद्यकीय शिक्षण आणि आंतरशाखीय शिक्षणाला किती महत्त्व देते हे अधोरेखित करतो. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग अशा प्रकारच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यशाळांची पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमात वाढती गरज आणि उपयुक्तता अधोरेखित करतो.

# कलाकार प्लास्टिक पिशव्या–मुक्त जीवनासाठी सांगत आहेत त्यांचे पर्यावरणपूरक उपाय!

**मुंबई, १ जुलै :** इंटरनॅशनल प्लास्टिक बॅग फ्री डे निमित्त कलाकार साध्या पण प्रभावी सवयी स्वीकारून पर्यावरण–जागरूक जीवन जगण्यास प्रेरित करत आहेत. जुन्या कपड्यांना ट्रेंडी शॉपिंग टोट्समध्ये बदलण्यापासून त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत तागाच्या आणि कापडी पिशव्या समाविष्ट करण्यापर्यंत ते सिद्ध करत आहेत की, शाश्वतता सहज आणि स्टायलिश असू शकते. किराणा दुकानात खरेदी करणे असो किंवा विमानतळावर जायचे असो त्यांच्या जाणीवपूर्वक निवड महत्वपूर्ण संदेश देतात की, लहान पुढाकार देखील मोठा प्रभाव निर्माण करू शकतात. एण्ड टीव्हीवरील कलाकार देखील त्यांच्या सर्जनशील प्लास्टिक–मुक्त जीवनशैली उपायांबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, हप्पू की उलटन पलटन) आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाभी, भाबीजी घर पर है'). कटोरी अम्माची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय हिमानी शिवपुरी म्हणाल्या, मी नेहमी वस्तू फेकून देण्याऐवजी त्यांचा पुनर्वापर करते. घरामध्ये मी मैत्रिणीच्या मदतीने माझ्या जुन्या साड्या व दुपट्टापासून आकर्षक व मजबूत शॉपिंग बॅग्ज बनवल्या आहेत. या कापडी पिशव्या टिकाऊ व आकर्षक असण्यासोबत त्यामध्ये भावनिकता सामावलेली आहे, त्यांच्याकडे पाहिल्यानंतर मला गतकाळातील सुखद क्षणांची आठवण येते. मी माझ्या कारमध्ये नेहमी तागाची पिशवी ठेवते, ज्यामुळे मला प्लास्टिक पिशवीचा वापर करावा लागत नाही. सेटवर देखील मी पुन्हा वापर करण्यायोग्य पिशव्या घेऊन येत आदर्श स्थापित करते आणि अनेकदा तरूण कलाकारांसोबत शाश्वत निवडी करण्याबाबत चर्चा करते. यंदा इंटरनॅशनल प्लास्टिक बॅग फ्री डे निमित्त मी सर्वांना आपल्या पारंपारिक पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन करते. आपल्या आई व आजी यासंदर्भात आग्रही होत्या, ज्या ट्रेंड होण्यापूर्वीच कापडी पिशव्यांचा वापर करायच्या. चला, अभिमानाने, सर्जनशीलतेसह आणि जुन्या आठवणींना उजाळा देत तो ट्रेंड पुन्हा आणूया. शाश्वतता फक्त गरज नाही तर जीवनशैली निवड आहे, जी आपल्याला आपल्या संस्कृतीशी जोडते.''

# सॅमसंगने भारतात नेक्स्ट जनरेशन गॅलॅक्सी फोल्डेबल्ससाठी प्री–रिझर्व्हची घोषणा केली

**गुरूग्राम, १ जुलै :** सॅमसंग ९ जुलै रोजी न्यूयॉर्कमध्ये नेक्स्ट जनरेशन फोल्डेबल स्मार्टफोन्स लॉंच करणार आहे. नेक्स्ट जनरेशन फोल्डेबल स्मार्टफोन्समध्ये नवीन एआय–पॉवर्ड इंटरफेस आणि ब्रेकथ्रू हार्डवेअर असेल. ऑफिशियल लॉंचपूर्वी भारतातील ग्राहक २००० रूपये टोकन रक्कम देऊन नेक्स्ट जनरेशन फोल्डेबल स्मार्टफोन्स प्री–रिझर्व्ह करू शकतात. सॅमसंगचे नेक्स्ट जनरेशन फोल्डेबल स्मार्टफोन्स प्री–रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना डिवाईस खरेदी करण्यावर जवळपास ५९९९ रूपयांचे फायदे मिळतील. ते लवकर डिलिव्हरीसाठी देखील पात्र ठरतील. ग्राहक सॅमसंग.कॉम, सॅमसंग एक्सक्लुसिव्ह स्टोअर्स, अमेझॉन.इन, फ्लिपकार्ट.कॉम आणि भारतभरातील आघाडीच्या रिटेल आऊटलेट्सना भेट देत सॅमसंगचे नेक्स्ट जनरेशन फोल्डेबल स्मार्टफोन्स प्री–रिझर्व्ह करू शकतात.
सॅमसंगने व्यक्तींना गरज असलेल्या वैशिष्ट्यांच्या आधारावर नवीन डिवाईसेस डिझाइन केले आहेत, जसे सर्वोत्तम कार्यक्षमता, शार्पर कॅमेरे आणि कनेक्टेड राहण्याच्या स्मार्टर पद्धती. गॅलॅक्सी एआय डिवाईसेसच्या क्षमतांमध्ये अधिक वाढ करते, तसेच व्यक्तींच्या परस्परसंवाद साधण्याच्या पद्धतीमध्ये बदल करते.

# यंदा वर्ल्ड स्किन हेल्थ डे निमित्त कॅलिफोर्निया बदामांच्या पौष्टिकतेसह त्वचेला उत्तम पोषण द्या

**नागपूर, १ जुलै :** यंदा वर्ल्ड स्किन हेल्थ डेची थीम 'नो हेल्थ विदाऊट स्किन हेल्थ' एकूण आरोग्यामध्ये त्वचेच्या भूमिकेवर भर देते. आज त्वचेच्या आरोग्याची काळजी घेताना बाहेरून स्किनकेअरला प्राधान्य देण्यासोबत आतून देखील त्वचेला उत्तम पोषण मिळण्याला प्राधान्य दिले जाते, ज्यासाठी दररोज आरोग्यदायी आहार सेवन करणे आवश्यक आहे. त्वचेसाठी अनुकूल असलेल्या खाद्यपदार्थांचे सेवन केले पाहिजे, जसे कॅलिफोर्निया बदाम, ज्यामध्ये व्हिटॅमिन ई व आरोग्यदायी फॅट्स समृद्ध प्रमाणात असतात. तसेच हे बदाम त्वचेचे आरोग्य उत्तम राखण्यास, त्वचा कोमल व आरोग्यदायी दिसण्यास मदत करतात.
कॅलिफोर्निया बदाम १५ आवश्यक पौष्टिक घटकांचा स्त्रोत आहेत. यापैकी अनेक पौष्टिक घटक त्वचेची घडण व पोत सुधारण्यास मदत करतात. व्हिटॅमिन ई व आरोग्यदायी फॅट्समध्ये ॲण्टी–एजिंग गुणधर्म असतात आणि त्वचेचे आरोग्य उत्तम राखतात. खरेतर, संशोधनामधून निदर्शनास येते की नियमितपणे बदामांचे सेवन केल्याने चेहऱ्यावर सुरकुत्या येणे कमी होऊ शकते, ज्यामुळे बदाम दैनंदिन ब्युटी रूटिनमध्ये गुणकारी भर आहेत.



आधुनिक न्यूट्रिनशल सायन्स व्यतिरिक्त आयुर्वेद, सिद्ध व उनानी यांसारख्या पारंपारिक शास्त्रांनी बदामांचे त्वचेसाठी फायदे फार काळापूर्वी निदर्शनास आणले आहेत. या प्राचीन शास्त्रांमधून बदाम त्वचा चमकदार होण्यास कशाप्रकारे मदत करतात हे निदर्शनास येते, जे आजच्या वेलनेस ध्येयांमध्ये कालातीत ज्ञानाची भर करतात. तसेच, नियमित बदामांचे सेवन केल्याने त्वचेचे सूर्यप्रकाशाच्या अतिनील किरणांपासून संरक्षण होण्यास मदत होऊ शकते, जे भारतातील उन्हाळा ऋतूदरम्यान अत्यंत लाभदायी आहे.
बदामांना सुपरफूड बनवणारी बाब म्हणजे त्यांची वैविध्यता व पौष्टिकता. बदाम कच्चे, भिजवून, भाजून सेवन करता येऊ शकतात किंवा स्मूदीज, सलाड, डिसर्ट व पारंपारिक पाकलांमध्ये भर करता येऊ शकतात. बदामांचे कशाहीप्रकारे सेवन केले तरी बदामांमधील पौष्टिकता कायम राहते, ज्यामुळे चमकदार, आरोग्यदायी त्वचेसाठी ते दैनंदिन आहारामध्ये सहजपणे समाविष्ट करता येतात.
वर्ल्ड स्किन हेल्थ डे आणि त्वचेची काळजी घेण्याच्या महत्त्वाबाबत मत व्यक्त करत स्किन एक्स्पर्ट आणि कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ. गीतिका मित्तल गुप्ता म्हणाल्या, ''मी माझ्या क्लायण्ट्सना नेहमी आठवण करून देते की, त्वचेचे आरोग्य आतून उत्तम राखले पाहिजे. पुरेशी झोप, सक्रिय राहणे आणि संतुलित व पौष्टिक आहाराचे सेवन त्वचेचे आरोग्य उत्तम राखण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. मी दैनंदिन आहारामध्ये मूठभर बदामांचे सेवन करण्याची शिफारस करते, जे स्नॅक म्हणून सेवन करता येऊ शकतात किंवा आहारामध्ये समाविष्ट करता येऊ शकतात. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, प्रोटीन, झिंक व कॉपर असते. हे पौष्टिक घटक त्वचेला पोषण देतात आणि सूर्यप्रकाशाच्या अतिनील किरणांपासून देखील संरक्षण करण्यास मदत करू शकतात. असे लहान, सातत्यपूर्ण बदल त्वचा दीर्घकाळापर्यंत चमकदार व आरोग्यदायी ठेवण्यास मदत करतात.''

# जागतिक चॉकलेट दिन: : सोनी सबवरील कलाकार सांगत आहेत आपल्या चिरंतन चॉकलेट प्रेमाविषयी

**मुंबई, १ जुलै :** चॉकलेटच्या बाबतीत नक्कीच काहीतरी खास असते. चॉकलेट आपल्याला स्वादाचा आनंद देतात, जुन्या आठवणींत घेऊन जातात आणि जीवनातील काही सुंदर क्षण देऊन जातात. अनेकांना चॉकलेट हा मूड सुधारण्याचा रामबाण उपाय वाटतो. जगात सर्वत्र जागतिक चॉकलेट दिन साजरा होत असताना सोनी सबवरील कलाकार, आशी सिंह, करुणा पांडे, सायली साळुंखे, आदित्य रेडिज आणि परिवा प्रणती आपल्या चॉकलेट्सशी निगडीत गोड आठवणी शेअर करत आहेत..
उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करत असलेली आशी सिंह म्हणते, मला वाटते चॉकलेट ही माझी कायमची कमजोरी आहे. लहान असताना खास करून रात्रीच्या वेळी फ्रिज धुंडाळून जे मिळेल ते चॉकलेट मी तोंडात टाकायचे. खरं सांगायचं तर, ती माझी सवय आजही फारशी बदललेली नाही. आजही छोट्या छोट्या चॉकलेटच्या पॅकमधून माझ्या आवडत्या रंगाच्या चॉकलेट निवडून, तोंडात चघळत चघळत त्या जुन्या दिवसांचा आनंद मी घेते.
वीर हनुमान मालिकेत अंजनी मातेची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, मी पहिल्यापासून गोडघाशी आहे. चॉकलेट ब्राऊनी हा तर माझा सगळ्यात जास्त आवडता पदार्थ आहे. लहान असताना माझा परीक्षेत चांगला निकाल आला की आई मला नेहमी चॉकलेट मिल्कशेक देऊन माझे कौतुक करायची. आजही तीच परंपरा चालू आहे. आज मला स्वतःला खुश करायचे असले की मी जेवण झाल्यानंतर मस्त स्वादिष्ट चॉकलेट ब्राऊनी किंवा एक डार्क चॉकलेटचा बार खाते.
पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, माझ्यासाठी चॉकलेट म्हणजे आनंदाचे प्रतीक आहे. मला आठवते, जेव्हा मी लहान होते, तेव्हा माझे वडील चॉकलेट्स घेऊन यायचे आणि सगळे नातेवाईक एकत्र व्हायचे तेव्हा त्या चॉकलेट्सचे रॅपर काढून त्या सगळ्यांमध्ये वाटायला मला फार आवडायचे. आजही जेव्हा मी चॉकलेट खाते, तेव्हा लहानपणीचे क्षण आठवतात.
तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, चॉकलेट मला शाळेतल्या साध्या दिवसांची आठवण करून देते. वर्गात वाढदिवसाच्या चॉकलेट वितरित व्हायच्या, ज्याची आम्ही आतुरतेने वाट बघायचो. ते छोटेसे चॉकलेट आम्ही किती जपून ठेवायचो, आणि त्याचा काय आस्वाद घ्यायचो! आज माझ्या आवडीनिवडी थोड्या बदलल्या आहेत. आता मला डार्क चॉकलेटचा रिचनेस आवडतो. खास करून ज्यात समुद्री मीठ किंवा बदाम असतात, ते डार्क चॉकलेट मला फारच आवडते. चॉकलेट मूस आणि चॉकलेट देखील माझे आवडते पदार्थ आहेत.
वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत वंदना वागलेची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, एक आई म्हणून मला चॉकलेट वेगळ्याच कारणाने आवडतात. केवळ मला खायला आवडते इतकेच नाही, तर छोटे छोटे आनंद आणि एकत्र निर्माण केलेल्या आठवणी यांचे स्मरण देतात चॉकलेट्स! माझा मुलगा खूप लहान आहे आणि तो काय खातो याकडे माझे बारीक लक्ष असते. पण जेव्हा तो एखाद्या बेकरीच्या दुकानावरून जातो किंवा एखाद्या चॉकलेट केकवर त्याची नजर पडते तेव्हा त्याच्या डोळ्यांत जी चमक दिसते ती मी स्वतः नीट ओळखते! अशा वेळी मी देखील माझ्या बालपणात पोहोचते. मला लहानपणी चॉकलेट एकलेयर्स फारच आवडायचे आणि आईने घरी बनवलेला चॉकलेट बिस्किट केकसुद्धा फार आवडायचा. माझ्यासाठी चॉकलेट फक्त स्वादासाठी खायचे नसते, तर चॉकलेट पिढ्यांना जोडते आणि आठवणी जाग्या करते, अगदी आपल्या गोड स्वभावाने!

# टॅफ़े आणि एजीसीओमध्ये ब्रॅन्ड अधिकार

**नागपूर, १ जुलै :** टॅफ़े, जगातील सर्वात मोठा ट्रॅक्टर आणि शेतीय उत्पादनांचे उत्पादन करणारा समूह असून, त्यांनी आज एजीसीओ सह ब्रॅन्ड, जाहिरातीकरण आणि शेअरहोल्डिंग संदर्भातील सगळ्या बाबींवरती व्यापक असा समझोता आणि ठराव झाल्याचे जाहिर केले.
हे सगळे करार एजीसीओ आणि टॅफ़े दरम्यान असलेल्या काही शासकिय पुर्तता आणि एजीसीओ मध्ये टॅफ़ेचा असलेल्या भारता संबंधातील पुन:खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लागू केले जातील.
मल्लिका श्रीनिवासन, अध्यक्ष आणि व्यवस्थापकिय संचालिका– टॅफ़े या वेळी बोलताना म्हणाल्या, टॅफ़ेचा विकास कहाणीचा नव्या परवाकडे वाटचाल करताना, आपण एजीसीओ शी असलेले आपले नाते आणि दर्घकालीन भागीदारी देखील लक्षात घ्यायला हवी, आणि एजीसीओला एक महत्वाचा शेअर होल्डर म्हणून मदत आणि सहाय्य करायला हवे.
त्या हे देखील म्हणाल्या, टॅफ़े आणि मॅसे फ़र्ग्युसन हे भारतीय ग्राहकांचा मनामध्ये गेली ५ वर्षांपासूनचे समान अर्थी शब्द आहेत जणू. आम्ही आमच्या बांधिलकी प्रती पुन्हा कटी बद्ध होऊन भारतीय शेतीमध्ये आमचा कल्पक उत्पादनांमुळे, उपाय योजना आणि भारतीय शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवांमुळे उत्तम असे बदल घडवून आणू. जगातील जमीन उपजावू बनवू (कल्टिवेटिंग द वर्ल्ड) या आमच्या ध्येयाकडे वाटचाल करत असताना आम्ही आमचा अमूल्य अशा स्टेक होल्डर्संना उत्तम गुणवत्ता प्रदान करू अशी आम्हाला खात्री आहे.

**अदानी ग्रीन एनर्जीचा ऐतिहासिक टप्पा**

# १५,५०० मेगावॅट कार्यरत क्षमतेसह भारतातील आघाडीची नवीकरणीय ऊर्जा कंपनी



**अहमदाबाद, १ जुलै :** अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेडने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी करत १५,५३९.९ मेगावॅट कार्यरत क्षमतेचा टप्पा पार केला आहे. भारतातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि वेगात वाढलेली नवीकरणीय ऊर्जा क्षमता असून, कंपनीने १५ महिन्यांत ५,००० मेगावॅट नव्याने जोडली आहे.
अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड ही भारतातील एकमेव कंपनी आहे जी पूर्णतः ग्रीनफिल्ड प्रकल्पांच्या माध्यमातून या टप्प्यावर पोहोचली आहे. कंपनीचे सध्याचे कार्यरत पोर्टफोलिओ सुमारे ११,००५.५ मेगावॅट सौर, १,९७७.८ मेगावॅट वारा, आणि २,५५६.६ मेगावॅट सौर–वाऱ्याचे मिश्रित प्रकल्प असे आहे.
आशिष खन्ना मुख्य कार्यकारी अधिकारी, अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड यांनी यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना म्हणाले, १५,००० मेगावॅट चा टप्पा पार करणे हे आमच्या कार्यसंघाच्या समर्पणाचे आणि आमच्या प्रवर्तकांच्या दूरदृष्टीचे फळ आहे. श्री गौतम अदानी यांच्या जगातील अग्रगण्य नवीकरणीय ऊर्जा उत्पादक होण्याच्या स्वप्नातून प्रेरित होत आम्ही २०३० पर्यंत ५०,००० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे.
७.९ दशलक्ष घरांना ऊर्जा, ईशान्य भारत संपूर्ण उजळणार अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड चे प्रकल्प सुमारे ७.९ दशलक्ष घरांना ऊर्जा पुरवठा करू शकतात. या क्षमतेच्या माध्यमातून कंपनी भारतातील १३ राज्यांत स्वच्छ ऊर्जा पोहोचवू शकते, तसेच संपूर्ण ईशान्य भारत वीजेत उजळवू शकतो.

# बिर्ला ओपस पेंट्स रंगांच्या ताकतीने भारतीय वारसा स्थळांना देतेय उजाळा

**मुंबई, १ जुलै :** आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासीम इंडस्ट्रीज अंतर्गत येणाऱ्या बिर्ला ओपस पेंटने त्यांच्या दुनियेत रंग भरूया या ब्रीदवाक्यावर आधारीत एक नवे ब्रँड कँपेन सुरु केले आहे. भारतातील ऐतिहासिक वारसांना या मोहिमेअंतर्गत पुनर्जीवित करण्यात येईल. गेटवे ऑफ इंडिया या स्थळापासून मोहिमेची सुरुवात होईल. रंगांच्या माध्यमातून अभिमान, सौंदर्य आणि परिवर्तनाची भावना देशभरात कशी जागृत होऊ शकते, हे यातून दिसून येईल.




संस्थेच्या ओपस बॉय या यशस्वी अभियानाच्या धर्तीवर नवी जाहिरात मोहीम सुरु करण्यात आली आहे. दुनियेत रंग भरूया हा याच मालिकेचा पुढील टप्पा आहे. रंगांमध्ये केवळ ठिकाणाचे रुप नव्हे तर विचार आणि दृष्टीकोन बदलण्याची ताकद असते, हेच यातून दाखवण्यात आले आहे.
बिर्ला ओपस पेंट्सचे सीईओ रक्षित हरगावे हे चित्रपटाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना म्हणाले, आमच्या मागील कँपेनला मिळालेल्या दमदार प्रतिसादानंतर आता हे नवे कँपेन सादर करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. भारतातील वारसा स्थळांना विविध रंग आणि सुंदर नक्षीकामाद्वारे बदलण्याची शक्यता यातून अधोरेखित होते. रंगांचा प्रभाव आणि एखादे स्थळ सुंदर बनवण्याच्या आमच्या कटिबद्धतेला या चित्रपटाद्वारे बळ मिळेल. तसेच यातून देशभक्ती आणि देशाभिमानाची भावना बळकट होईल.
बिर्ला ओपस पेंट्सचे मार्केटिंग हेड इंद्रप्रीत सिंग पुढे म्हणाले, दुनियेत रंग भरूया या कँपेनच्या माध्यमातून नेहमीच रंगांच्या सखोल प्रभावावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या नव्या मोहिमेद्वारे आम्ही हा विचार राष्ट्रीय स्तरावर घेऊन जात आहोत. राष्ट्रीय वारसा स्थळे आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांवर आम्ही रंगांची क्षमता दाखवून नवी आशेची कथा लिहिण्याचे उद्दिष्ट आम्ही समोर ठेवले आहे. यामुळे प्रत्येक भारतीयाला त्यांच्या सभोवतालचे सौंदर्य आणि रंगांच्या परिवर्तनात्मक बदलाची आठवण करून दिली जाईल.
लिओ इंडियाचे चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर सचिन कांबळे म्हणाले, यापूर्वीच्या लोकप्रिय ठरलेल्या चित्रपटानंतर बिर्ला ओपसच्या या नव्या चित्रपटाने दुनियेत रंग भरूया या विचाराला अधिक बळकटी मिळाली आहे. याअंतर्गत आम्ही ३डी फिल्म ॲनिमेशनचा वापर करून एक समृद्ध आणि आकर्षक अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील सर्वात प्रतिष्ठित दृश्यांमधून एकाची निवड करत त्या पार्श्वभूमीवर चित्रपटाचा सेट तयार करण्यात आला. ही स्मारके भव्य आणि कालातीत असल्यामुळे रंगांची परिवर्तन ताकद वापरून जगाची पुनर्कल्पना करण्याकरिता प्रेक्षकांना प्रेरणा देता येते. यासाठी ही दृश्ये पार्श्वभूमी म्हणून वापरण्यात आली आहेत.

## आज का अंदाज

**बुधवार २ जुलै २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १२० | १७८ | १२४ | १४५ | २४८ | २३० | १७० | १९९ |
| ३०० | ३५८ | २७८ | ३८९ | ७८९ | ३५७ | ३५० | २८९ |
| २२९ | २७७ | ४६७ | २८० | ६८० | १२२ | २६० | ३७९ |
| ३२ | ६२ | ७१ | ०१ | ४६ | ५६ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७८ | ०८ | ४३ | ५३ | ८२ | ९२ |
| ३५ | ६५ | ७९ | ०९ | ४० | ५० | ८७ | ९७ |

**२ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५७ | ८७ |
| १९ | २९ | ५४ | ८४ |
| १६ | २६ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# 'जमाई नं. १' मध्ये अभिषेक मलिकचा अल्लू अर्जुन प्रेरित लूक ठरणार धडाकेबाज!

**मुंबई, १ जुलै :** झी टीव्हीवरील जमाई नं. १ या लोकप्रिय मालिकेने प्रेक्षकांसाठी एक उत्कंठावर्धक आणि भावनांनी भरलेला ट्विस्ट आणण्याची तयारी केली आहे, कारण नील (अभिषेक मलिक) देवी कालीचे रूप धारण करणार आहे जो पुष्पा २ मधील अल्लू अर्जुनच्या लूकने प्रेरित आहे. हिंदी टेलिव्हिजनवर प्रथमच एक प्रमुख पुरुष पात्र एका दैवी आणि शक्तिशाली अवतारात प्रकट होणार आहे, जो सिनेमॅटिक फ्लेअर आणि भावनिक गहरेपणाचा संगम आहे. रिद्धी (सिमरन कौर) चे अपहरण आणि तिला वाचवण्यासाठी नीलने सुरू केलेले धाडसी मिशन यामुळे कथा अधिक गहन होत जाते, आणि त्यामुळे प्रेक्षकांसमोर एक जबरदस्त नाट्य सादर होणार आहे.
अभिषेक म्हणाला, प्रामाणिकपणे सांगायचं तर जेव्हा मी या ट्रॅकबद्दल ऐकलं तेव्हा मी खूप उत्साहित झालो. मला काली मातेच्या रूपात सादर व्हायचं होतं. माझ्या अंगावर काटा आला. हा लूक पुष्पा २ मधील अल्लू अर्जुनच्या धडकी भरवणाऱ्या, रांगड्या आणि शक्तिशाली रूपासारखा होता. आम्ही लूक टेस्ट केला आणि प्रतिसाद जबरदस्त होता. सेटवर सगळ्यांना तो खूप आवडला. आमच्या निर्मात्यानेही मला फोन करून सांगितलं, हा लूक फक्त तुझ्यासाठीच बनलाय. माझ्यासाठी हे खूप मोठं होतं. हे पूर्णपणे काहीतरी वेगळं आहे असं काहीतरी जे भारतीय टेलिव्हिजनवर कधीच पाहायला मिळालं नाही. हा ट्रॅक खूप जबरदस्त आहे आणि यातला ॲक्शन सीक्वेन्स तर त्याला अजूनच थरारक बनवतो. ते दृश्य भारतीय सिनेमातील भव्य, स्टायलिश ॲक्शन सीनसारखा आहे. हे रूपांतर मुळातच इतकं जोरदार होतं की मला या अवतारात सजायला दररोज जवळपास दोन तास लागायचे बॉडी पेंटपासून ते जड साडी आणि मंदिरातले दागिने घालण्यापर्यंत. सगळं अगदी बारकाईने आणि मेहनतीने केलं गेलं. त्या लूकमध्ये ॲक्शन सीक्वेन्स करताना थकायला नक्कीच झालं, पण अनुभव खूप सशक्त होता.

## राशीभविष्य

**मेष :** एखाद्या कौटुंबिक कामासाठी मित्रांची मदत घेऊ शकता. तुमचे अडकलेले धन देखील मिळू शकते. कुटुंबात आपल्या लोकांचे सहकार्य मिळेल. पत्नीसोबतचे संबंध चांगले राहतील.
**वृषभ :** आज जीवनात काही बदलांचा विचार करतील. कला क्षेत्रातील लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहील. तुम्हाला कामात मदत मिळेल. धनप्राप्तीचा योग संभवतो. एखाद्या खाद्यपदार्थाची आवड वाढू शकते.
**मिथुन :** मोठ्यांच्या सल्ल्याने काम करावे. तुम्ही ऑनलाईन काम सुरु करण्याचा विचार कराल. यात कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य मिळेल. पैशांच्या बाबतीत तुम्हाला तुमच्या जोडीदार मदत करेल.
**कर्क :** ऑफिस मीटिंगमध्ये आपले म्हणणे प्रभावीपणे मांडू शकाल. तुमचे प्रेझेंटेशन सर्वांना आवडेल. तुम्हाला आज अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. मुलांकडून पूर्ण मदत मिळेल.
**सिंह :** अडकलेली कामे आज पूर्ण होतील. यामुळे आर्थिक स्थिती सुधारेल. वकिलांना एखाद्या महत्त्वाच्या खटल्यात यश मिळेल. जमिनीच्या जुन्या व्यवहारातून आज फायदा होईल.
**कन्या :** व्यावसायिक कामांमध्ये निश्चित प्रगती होईल. तुम्ही घरात काही सुधारणा करू शकता. आवश्यक वस्तू खरेदी करु शकता, परंतु आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊनच निर्णय घ्या.
**तुळ :** आज मोठी प्रसिद्धी मिळेल. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा. लवकरच फायदा मिळेल. विद्यार्थी आज एखादे काम पूर्ण करण्यासाठी वडिलांची मदत घेतील, ज्यामुळे त्यांचे काम चांगले होईल.
**वृश्चिक :** आज कामाच्या निमित्ताने दुसजया शहरात प्रवास करावा लागू शकतो. तुमचे विचार दाबण्याचा प्रयत्न होईल, पण मेहनतीचे फळ नक्की मिळेल. महिलांनी आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.
**धनु :** विद्यार्थ्यांना करिअरशी संबंधित काही अडचण येत असेल तर त्यांना मोठ्या भावंडांकडून मदत मिळेल. कुटुंबात एखादे महत्त्वाचे काम पूर्ण झाल्याने मन प्रसन्न राहील. आज घरी स्थळ येऊ शकते.
**मकर :** लांबचे नातेवाईक घरी येऊ शकतात. कुटुंबातील सदस्यांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल.
मॉडेलिंग क्षेत्रातील लोकांना चांगल्या ब्रँडसाठी काम करण्याची संधी मिळू शकते.
**कुंभ :** एखाद्या नातेवाईकाशी असलेले मतभेद आज मिटतील. सोशल मीडियावर नवीन लोकांशी मैत्री होईल. पालक तुमच्या कामात मदत करण्याचा प्रयत्न करतील. मुलांसोबतचे तुमचे संबंध चांगले राहतील.
**मीन :** वैवाहिक जीवन चांगले ठेवण्यासाठी तुम्हाला एक पाऊल पुढे येणे गरजेचे आहे. लहान मुलीच्या पायांना स्पर्श करून आशीर्वाद घ्या, ज्यामुळे सर्व काही चांगले होईल. आर्थिक स्थितीकडे लक्ष द्या.

## शब्दकोडे क्रमांक २१५२




**आडवे शब्द :–**
१) आश्चर्यचकित
३) घराचा मागचा दरवाजा
६) पुष्कळ
९) भरभराट
१२) एक तारवाद्य
१४) प्रहर
१५) धनुष्य बाण
१७) परिचय
१९) बारावी रास
२०) छोटी वस्ती
२१) ललाट
२३) अचानक आलेले संकट
२६) मनाचा ओढा
२८) ताकद
२९) तंबूची कापडी भिंत
३०) परीक्षा, ज्ञान
३१) शरम
३३) अंगरखा
३४) विद्येची देवता
३५) अंदमानला काळ्यापाण्याची शिक्षा भोगणारे स्वातंत्र्यवीर
३७) कमळ
३८) जेव्हा
४०) पद्धत
४२) कौशल्य
४३) खाऱ्या पाण्याचा समुद्र
४६) हेतू अर्थ (हिं)
४८) इतर, बाकीचे
४९) पाणी
५०) खोडण्याचे साधन
५१) आशीर्वाद देणारी
५२) विनाकारण
५४) श्रेष्ठ पुरुष
५७) मुलांच्या बाबतीत अबोला
५८) भेग, चीर
५९) पाऊल गीत
६१) कलाबूत
६३) अतिशय
६४) काठ, बाजू
६५) उत्तराधिकारी
६६) जन्मदात्री
६७) पार्वती, कजाग स्त्री
६९) मालाचे येणे जाणे
७१) अंगावर कपडे नसलेला
७२) दरवाजा
७३) पराग
७५) देव
७६) दुर्गंधी येऊ लागलेले
७७) चार वेदांपैकी एक

**उभे शब्द :–**
१) विसर, विस्मरण
२) ग्रामोफोनची रेकॉर्ड
३) प्रतिष्ठा, अब्रू
४) प्रभात
५) द्रवपदार्थ
६) वजन, बोजा
७) भयंकर
८) दारुचा एक प्रकार
१०) लक्ष्मीचे एक नाव
११) गर्भश्रीमंत मनुष्य
१३) कुस्ती शिकण्याची जागा
१६) कणीदार
१७) रांग
१८) दक्षता
२२) गवताचे पान
२४) लक्ष–एक आंकडा
२५) सरोवर
२७) उत्कर्षाचा काळ
२८) मेंढा
२९) सोवळ्याचे रेशमी धोतर
३०) ओटा, कट्टा
३२) चकचकीत
३३) सूट
३६) सत्वांश
३९) दासांचा दास
४१) काळोख
४४) वरपांगी
४५) चंद्र
४७) त्वरित
४८) पार्थ, एक कुंतीपुत्र
५३) अपशकून
५५) दुलई
५६) नवरदेव
५९) घागरा
६०) हिंदीत दहा
६२) प्रचंड मोठा
६३) अत्तराचा बोळा
६४) छिद्रातून जमिनीवर पडणारे प्रकाशकिरण
६५) संधी, मोकळीक
६६) अफवा
६७) रत, रममाण
६८) मनुष्य
६९) कुंभाराची भट्टी
७०) यज्ञोपवीत
७१) पुरुष
७२) इंग्रजीत कापणे
७४) वजनदार

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# ५ हजार ९६७ ग्राहक घेत नाहीत छापील विद्युत देयक

## महावितरणच्या 'गोग्रीन' योजनेला पर्यावरणप्रेमींचा प्रतिसाद, वार्षिक १२० रुपये होत आहे फायदा



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १ :

विद्युत देयकासाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ईमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत अकोला जिल्ह्यातील ५ हजार ९६७ ग्राहकांचा समावेश आहे. ही आकडेवारी ३० जूनपर्यंतची आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल अ?प व .rहर ळीलो.ळप संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी ''गो-ग्रीन''योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

असे आहे वऱ्हाडातील चित्र : विदर्भातील ६३ हजार ७३१ ग्राहकांमध्ये अकोला परिमंडळातील १५ हजार ५९६ ग्राहक हे पर्यावरणस्नेही असून यामध्ये अकोला जिल्ह्यातील ५ हजार ९६७ , बुलडाणा जिल्ह्यातील ७ हजार ८२ आणि वाशीम जिल्ह्यातील २ हजार ५४७ ग्राहकाचा समावेश आहे. १२ महिन्यांची देयके उपलब्ध : महावितरणच्या .rहर ळीलो.ळप या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे. असा आहे पर्यावरणस्नेही ग्राहकांचा प्रतिसाद गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

यामध्ये (कंसात आर्थिक फायदा ) पश्चिम महाराष्ट्रात २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण-१ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ-६३ हजार ७३१ (७६.४७लाख) मराठवाड्यात ५५ हजार ३५१ ग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा फायदा होत आहे.

**ग्राहकांना होतो वार्षिक १२० रूपयांचा फायदा**

'गो-ग्रीन'योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे.

विशेष म्हणजे गो-ग्रीनयोजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे असहकार:राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीची निदर्शने



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १ :

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करून घ्या, अशी मागणी करत सोमवारी राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीने जिल्हा परिषदेत धाव घेतली. समितीने ३० जून रोजी लक्षवेधी असहकार आंदोलन पुकारत निदर्शने केली. एनएचएमअंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी कोट्यवधी रुपये सरकारकडून खर्च होतात. जिल्हा परिषदेच्या मार्फतही योजना राबवण्यात येतात. जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांमुळे आरोग्य विभागातील सेवा गोरगरिबांसह गाव खेड्यात पोहोचत आहे. मात्र अनेकदा वेतन वेळेवर होत नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. यासह अन्य मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलनही केले होते. दरम्यान ३० जून रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेमध्ये धाव घेतली. यावेळी डॉ. आर. एम. नागे, इम्रान खान , किशोर फाळके, सुदाम भिंगारे, अभिजित मुंदरे, डॉ. महेश इंनानी, डॉ. प्रिती कोगदे, आशिष शिंदे, डॉ. मनीष मेन, डॉ. मोहम्मद जाफर, डॉ. पंकज इंगोले, डॉ. सपना बाटे, डॉ रुपाली वळतकर, संदीप घाटोळ, महेंद्र कोलटक्के, ॲड. शुभांगी ठाकरे, धम्मासेन सिरसाट , कपिल सिरसाट यांच्यासह कंत्राटी अधिकारी कर्मचारी होते.

कृती आराखडयाप्रमाणे आंदोलन : समायोजन, प्रलंबित मागण्या, अडचणी सुटाव्यात, यासाठी आरोग्य मंत्री, सचिव यांना गत सहा महिन्यांपासून निवेदन, पत्रव्यवहार करण्यात येत असल्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीचे म्हणणे आहे. निवेदनाच्या अनुषंगाने बैठकीबाबत कळवण्यात येईल, असेही सांगण्यात आले. मात्र याबाबत पुढे काहीही कार्यवाही होत नसल्याने समितीचे म्हणणे आहे.

शासन निर्णयानुसार समायोजन व इतर मागण्याबाबत कार्यवाही होत नसल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी १४ दिवसीय कृती आराखडयाप्रमाणे आंदोलन करीत असल्याचे समितीने निवेदनात नमूद केले.

# फॉर्ममध्ये छोटीशी चूकही प्रवेशापासून वंचित ठेवू शकते

## नीट, जेईई-एमएचटीसीईटी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा; डॉ. प्रवीण शिनगारे यांनी विद्यार्थ्यांना दिला सल्ला




■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १ :

नीट ही वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची परिक्षा असून, केवळ एमबीबीएसच नव्हे तर बीडीएस, बीएमएमएस, फिजिओथेरपी, बीएससी नर्सिंग, फार्मसी यासारखे अनेक वैद्यकीय प्रवेशही घेता येतात. या अनुषंगाने वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश पूर्वबाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी फॉर्म काळजीपूर्वक भरावा; छोटीशी चूक सुद्धा प्रवेशापासून वंचित ठेवू शकते, असे मार्गदर्शन वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे माजी संचालक डॉ. प्रवीण शिनगारे यांनी याप्रसंगी केले. विद्यार्थ्यांना मोफत व अचूक मार्गदर्शन मिळावे, यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे आयोजक माजी पालकमंत्री डॉ. रणजीत पाटील म्हणाले. नीट, एमएचटीसीईट-जेईई या वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या परिक्षा यामधून केवळ एमबीबीएसच नाही तर बीडीएस, बीएएमएस, फिजिओथेरपी, बीएससी नर्सिंग, फार्मसी, अभियांत्रिकी यासारखे अनेक प्रवेश सुद्धा घेता येतात. प्रवेश प्रक्रिया विद्यार्थी व पालकांनी समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. या अनुषंगाने आरएलटी विज्ञान महाविद्यालयात प्रवेश पूर्व मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थानी ॲड मोतिसिंह मोहता होते. प्रमुख अतिथी माजी आमदार वसंतराव खोटरे, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, डॉ. पवन माहेश्वरी, डॉ. राजेश चंद्रवंशी, डॉ. अपर्णा पाटील, डॉ. नरेश बजाज आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक शिक्षक परिषदेचे प्रकाश चतरकर यांनी केले. डॉ. अशोक ओळंबे, संजय चौधरी, गिरीश गोखले, शशीकांत गायकवाड, देवानंद मोरे, शंकर तायडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन देवेंद्र वाकचवरे यांनी केले. आभार रविकुमार खेतकर यांनी मानले.

फॉर्म भरल्यानंतर इतरांनाही दाखवा डॉ. प्रविण शिनगारे यांनी वैद्यकीय प्रवेशाचा इतिहास उलगडताना एनईईटी परिक्षेबाबत माहिती दिली. देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर ही परिक्षा घेण्यात येते. परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशाकरीता राष्ट्रीय पातळीवर १५ टक्के तर राज्यासाठी ८५ टक्के जागा असतात. परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वैद्यकीय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी जागरुकपणे फॉर्म भरावा. ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवण्यात येत असून, विद्यार्थ्यांनी फॉर्म काळजीपूर्वक भरावा. महाविद्यालयाची निवड करीत असताना त्या महाविद्यालयाचा कोड व्यवस्थित भरा. आरक्षण, किती जागा आहेत, शुल्क किती याची माहिती घ्या. फॉर्म व्यवस्थित वाचून तो भरल्यानंतर इतरांना दाखवा. त्यातील चुकांची दुरुस्ती करुनच फॉर्म सबमिट करावा, असेही डॉ.शिनगारे यांनी सांगितले.

## रूग्णांना दर्जेदार रूग्णसेवा मिळावी : आ. पठाण

# धर्मादाय रुग्णालयातील सुविधांबाबत पारदर्शकतेसाठी महत्त्वपूर्ण बैठक



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला , दि. १ :** राज्यातील गरीब, गरजू रुग्णांना वेळेवर दर्जेदार अशी वैद्यकीय सेवा मिळावी, सोबतच सद्य:स्थितीत असलेली वैद्यकीय व्यवस्था ही आणखीन सुलभ व पारदर्शक व्हावी, अशी सकारात्मक सूचना आमदार साजीदखान पठाण यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी विधानभवनाच्या सातव्या मजल्यावर धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यपद्धतीसंदर्भात पार पाडलेल्या बैठकीत दिल्या.

या बैठकीत राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व गरजू रुग्णांना वेळेवर व दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली.

धर्मादाय रुग्णालयांवर देखरेख ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या संयुक्त समित्यांची कार्यपद्धती, निगराणी प्रक्रिया, पोर्टलवर माहिती अपलोड करणे, निधीचा खर्च आणि न्यायालयीन आदेशांचे पालन यावर सखोल विचारविनिमय झाला. या बैठकीस धर्मादाय समितीचे सदस्य आमदार साजिद खान पठाण विशेष उपस्थित होते. त्यांनी रुग्णसेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक व्हावी यासाठी अनेक सकारात्मक सूचना मांडल्या.

**रुग्णांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी प्रयत्न करू**

धर्मादाय आयुक्तांचाही या बैठकीत सहभाग होता. धर्मादाय रुग्णालयांच्या व्यवस्थापनात उत्तरदायित्व व पारदर्शकता आणण्यासाठी ही बैठक उपयुक्त ठरली आहे.

राज्यातील रुग्णांना गुणवत्तापूर्ण सेवा मिळावी या उद्देशाने शासन प्रयत्नशील असून, ही बैठक धर्मादाय रुग्णालय क्षेत्रात आवश्यक सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. भविष्यात रुग्णांना योग्य ते उपचार मिळतील. तसेच वेळेवर आणि योग्य दरात ही सुविधा उपलब्ध असेल.

# अतिक्रमण निर्मूलन कारवाई विरोधात मोचा

## उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने




■ महासागर प्रतिनिधी,
**खामगाव, दि. २ :** शहरात नगरपालिका प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे बेरोजगार झालेल्या अतिक्रमणधारकांनी आज मुख्याधिकारी यांच्या विरोधात मोर्चा काढून एल्गार पुकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून घोषणाबाजी करत निघालेला हा मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला. अतिक्रमण काढल्याने बेरोजगार झालेल्या शेकडो लोकांनी आता जगायाचे कसे? असा संतप्त सवाल करत अतिक्रमणधारकांनी एसडीओंना निवेदन सादर केले. आम्ही सर्व खामगाव येथील रहिवासी असून बऱ्याच वर्षापासून खामगाव येथे राहतो व अतिशय अल्प प्रमाणातील लघु व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. मात्र दोन दिवसांपूर्वी मुख्याधिकारी यांनी शहरातील अतिक्रमण काढणे या योजनेअंतर्गत अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविली. सदर मोहीम राबविताना मोठ्या प्रमाणात आम्हा सर्वांचे नुकसान करून आम्हाला पोटा पाण्यावरून उठवले व बेरोजगार केले. अन्यथा रोजगारासाठी व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याकरिता आम्हाला पुन्हा त्याच ठिकाणी व्यवसाय सुरु करावा लागेल. त्या वेळेस निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्था प्रश्नास शासन जबाबदार राहील. मुख्याधिकारी यांनी केलेल्या गैर कृत्यामुळे सामान्य जनतेचे जे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD AFFAN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD AFFAN SHEIKH.**
**ADD :** NIRMAL NAGRI B2/3F. NO. 4H, UMRED ROAD, AYODHYA NAGAR, NAGPUR, MAHARASHTRA 440024

MY OLD NAME WAS **MOHAMMED BILAL HADA / MOHD BILAL HADA**. NOW MY NEW NAME IS **BILAL ASIF HADA.**
**ADD :** PLOT NO 1 MIRA PALACE OLD KAMPTEE ROAD DADIMA MASJID MEMON COLONY NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **MOHAMMED ASIF HADA / MOHD ASIF HADA** . NOW MY NEW NAME IS **ASIF HUSSAIN HADA.**
**ADD :** PLT NO 1 MEMON COLONY OLD KAMPTEE ROAD DADIMAA MASJID POCHI NAGAR NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **MANPRITKAUR DADIYALA**. NOW MY NEW NAME IS **MANPREET KAUR.**
**ADD :** 302, BABA BUDDAJI NAGAR DASHMESH PITA MARG NAGPUR

MY OLD NAME WAS **GEETA TANGLE**. NOW MY NEW NAME IS **GEETA SHYAM BHUTE.**
**ADD :** QTR. NO 121/4, SOMWARI QUARTER, TUPKAR CHOWK, NAGPUR 440024. MY OLD PASSPORT NO IS **F0402242**

MY OLD NAME WAS **ABDUL RAUF ABDUL HABIB**. NOW MY NEW NAME IS **ABDUL RAUF ABDUL HABIB MOOSANI.**
**ADD :** H NO 138 MUSANI MANZIL HANSAPURI ROAD NALSAB CHOWK NR SALT FACTORY NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **GAZALA HOORI**. NOW MY NEW NAME IS **GAZALA ABDUL NAYEEM.**
**ADD :** FLAT NO 302 PLOT NO 86A AND 86B DREAM PALACIA KATOL ROAD B/H MAZJHID BORGAON BHUPESH NAGAR NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **MURLIKUMAR KHANCHANDANI**. NOW MY NEW NAME IS **MURLI BAKSHOMAL KHANCHANDANI.**
**ADD :** PLOT NO 233/D, SINDHI COLONY, MECOSABAGH, NAGPUR 440034

MY OLD NAME WAS **BHATI AFREEN MOHD NISAR**. NOW MY NEW NAME IS **AFREEN BANO MOHAMMAD NISAR BHATI.**
**ADD :** PLOT NO. 71, RATAN NAGAR, MANKAPUR , NAGPUR 440030


# बोगस बियाण्यांचा शेतकऱ्यांना फटका

## शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात; तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार?



■ महासागर प्रतिनिधी,
**पातूर, दि. १ :** तालुक्यातील शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. कर्ज काढून विकत घेतलेल्या सोयाबीन बियाण्यांवर आता बोगसपणाचा शिक्का बसला आहे. सारस कंपनीच्या बियाण्यांनी अनेक शेतांमध्ये उगमच न घेतल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. काही ठिकाणी बियाणे सडले, तर काही ठिकाणी पूर्णच निष्फळ ठरले. परिणामी, दुबार पेरणीसारख्या प्रक्रियेचा सामना करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. याच पार्श्वभूमीवर तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांनी ३० जून रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात धाव घेत तक्रारी दाखल केल्या. या प्रकरणी शासनाने कृषी कंपनीवर कारवाई करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी केली आहे.

तालुक्यातील आलेगाव, जांब, पिंपरडोळी, कार्ला, शेकापूर, गावंडगाव, पिंपळखुटा, गोळेगाव, अंबाशी, चरणगाव या गावांमधील शेतकऱ्यांनी संबंधित कृषी सेवा केंद्रांमधून सारस कंपनीचे सोयाबीन बी-बियाणे खरेदी केले होते. मात्र बियाण्यांची पेरणी करून पाच ते सात दिवस उलटूनही बियाणे उगमले नाहीत. काही शेतकऱ्यांच्या शेतात बियाणे उगमण्याऐवजी सडून गेले. बियाणे जमिनीवर निघालेलेही नाही. त्यामुळे बोगस बी-बियाणे विक्रीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पातूर येथे एकत्र येऊन स्वतंत्र तक्रारी दाखल केल्या आहेत. बियाणे विकत घेण्यासाठी त्यांनी एमआरपीपेक्षा अधिक किंमत मोजली आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे खरेदी केली होती. आता तेच बियाणे बोगस निघाल्याने आर्थिक नुकसान होऊन शेतकरी पुन्हा एकदा कर्जाच्या खाईत लोटले गेले आहेत. दुबार पेरणी करावी लागणार असली तरी त्यासाठी लागणारा खर्च करायचा कुठून? हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा ठाकला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, बियाणे कसे आहे, हे पाहण्याचा आमच्याकडे काही मार्ग नाही. आम्ही विक्रेत्यांवर आणि कंपन्यांवर विश्वास ठेवून बी-बियाणे घेतो. मात्र, जेव्हा बियाणेच उगवत नाही, तेव्हा आमच्या मेहनतीवर पाणी फिरते. शेतकऱ्यांनी या वेळी संबंधित कंपनीविरोधात कठोर कारवाई करावी. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे, दुसऱ्या पेरणीसाठी शासकीय मदत द्यावी, बी-बियाणेमोफत उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## रस्त्यावर मोकाट गुरांचा उपद्रव

**अमरावती :** शहरात रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट जनावरांच्या कळपांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यामुळे अपघाताची शक्यताही वाढली आहे. वाहचालकांचे जिव धोक्यात आले आहेत. मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम महापालिकेकडून राबवली जात नसल्याने या जनावरांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. रस्त्यांवरील या जनावरांमुळे सामान्य नागरिक मात्र त्रस्त झाला आहे. मागील अनेक दिवसांपासून पाळीव मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. यामुळे किरकोळ अपघात घडले आहेत. जनावरांनी काही नागरिकांवर हल्ला केला असून दुचाकीस्वारांचेही अपघात घडले आहेत. त्यामुळे या मोकाट जनावरांचा वेळीच बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे. अमरावती, नागपूर, बडनेरा -अकोला, अशा महामार्गांसह काँग्रेसनगर, नवसारी, एमआयडीसी रोड, वडाळी, विद्यापीठ, शेगावनाका अशा मध्यवर्ती तसेच शहरातील रस्त्यांवर ठिकठिकाणी जनावरांचे साम्राज्य असल्यामुळे वाहनचालकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

# पालिकेच्या आढावा बैठकीत विकास कामांना मिळणार गती



**जळगाव जामोद:** येथील पालीका कार्यालयात शुक्रवारी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा आणि सुरू असलेल्या विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरातील वीज व्यवस्था, रस्ते व इतर मूलभूत सुविधा, तसेच स्वच्छता मोहीम याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच शहरात निर्माणाधीन असलेल्या विकास कामांची तपशीलवार माहिती संबधित विभागाकडून देण्यात आली. सध्या सुरू असलेल्या कामांची प्रगती तपासण्यात आली व उशीर होत असलेल्या कामांबाबत कारणे समजून घेत त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश आमदार डॉ. संजय कुटे यांनी दिले. वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी महावितरणसोबत समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. शहराच्या काही भागांत वारंवार वीज खंडित होत असल्याचे निदर्शनास आणून देत यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचे आदेश त्यांनी दिले. स्वच्छतेबाबत विशेष मोहिम राबवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. शहरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठ या ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी नियमित साफसफाई करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. शिवाय शहरातील प्रमुख चौकात नागरिकांना वाहतुकीमुळे व इतर कारणांनी होणारा त्रास टाळण्यासाठी आवश्यक उपाय योजना तात्काळ राबवाव्यात यावा साठी प्रयत्न करावे, असे सांगितले. बैठकीद्वारे प्रशासनाला पुढील वाटचालीसाठी स्पष्ट दिशादर्शन मिळाले असून, शहराच्या विकास कामांना नवे गती मिळणार असल्याची अपेक्षा आमदार डॉ. संजय कुटे यांनी व्यक्त केली. बैठकीला मुख्याधिकारी डॉ. सूरज जाधव, कार्यालय अधीक्षक राजेश गावंडे, कर्मचारी, तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आढावा बैठकीला उपस्थित आ. कुटे व इतर.

## राष्ट्रीय महामार्गालगतचे मातोश्री हॉटेलचे अतिक्रमण केले भूईसपाट

■ महासागर प्रतिनिधी,
**बोरगाव मंजू, दि. १ :**

राष्ट्रीय महामार्गाला लागूनच असलेल्या विजोरा रोडच्याकडेला एक वर्षांपूर्वी गणेश पगारे यांनी मातोश्री हॉटेलचे केलेले अतिक्रमण काढावे, अशी तक्रार संजय कडूसह २६ जणांनी तहसीलदार यांच्या न्यायालयात केली होती. या प्रकरणी साक्ष पुरावे झाल्यानंतर निवासी नायब तहसीलदार महेंद्र कुमार आत्राम याच्या न्यायालयाने १६ जून रोजी एक आदेश पारित केला. त्यानुसार गणेश पगारे यांनी राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेला गट क्रमांक २८३/२ ला शेत रस्त्यावरील टीन पत्र्याचे मातोश्री हॉटेल अतिक्रमण काढून टाकावे, असे आदेश देण्यात आले. या प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे स्टेकरिता अपील दाखल केली, परंतु मालकी हक्काचे कागदपत्रे नसल्याने गणेश पगारे याचा अर्ज फेटाळला. मंडळ अधिकारी हरिहर निमकंडे यांनी ३० जूनला हे अतिक्रमण काढण्याचा आदेश काढला आला. मंडळ अधिकारी हरिहर नीमकंडे यांच्या आदेशाने महसूल अधिकारी प्रवीण चव्हाण, पुरुषोत्तम गायवाडे, संतोष ठाकूर, संघमित्रा सदांशिव, अमोल कुंभारे, पोलिस उपनिरीक्षक लांडे, जमादार आनंद चव्हान, गोपणारायण, सुनील पवार आदींनी अतिक्रमण काढण्याची कारवाई ठाणेदार अनिल गोपाळ यांच्या मार्गदर्शनात केली. पोलिस बंदोबस्ता कारवाई अतिक्रमण करणाऱ्यांना सहकार्य करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# देशात एकच टाहो : रोजी, मजुरी, नोकरी, काम द्या हो!

भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. सन २०२४च्या निवडणूकीनंतर रोजगार उपलब्ध करून दिले जातील अशी युवकांना व जनतेला अपेक्षा होती, मात्र सारे स्वप्न धुळीस मिळाले. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत.

सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अजार्ची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर फेकली, अशी बिकट परिस्थिती. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल?

बेकार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय, बेकारीचा अभ्यास करताना दोन बाबी आधी स्पष्ट झाल्या पाहिजेत, पहिली म्हणजे बेकारीची व्याख्या कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच मर्यादीत ठेवावी लागते, लोकसंख्येतील ० ते १४ वयोगट व ज्येष्ठ नागरिक इ. घटक वजा केल्यावर जी उरते ती कार्यकारी लोकसंख्या होय.

बेकारी म्हणजे अशी स्थिती होय, की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो, परंतु त्याला काम मिळत नसते. बेरोजगारीमुळे देशातील मानवी साधनसंपत्तीचा अपव्यय होतो. बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यांमध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते आणि समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.

**बेकारीची संकल्पना :**

(१) अनैच्छिक बेकारी - या बेकारीला दृश्य किंवा उघड बेकारी असेही म्हणतात. ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही. ही स्थिती श्रमांचा अतिरिक्त पुरवठा व त्या तुलनेत श्रमिकांची कमी मागणी यातून निर्माण होते. यामध्ये माणसांची मनस्थिती नसतानाही असेल ते कामे करावी लागतात तेही विनामोबदला किंवा कमी मोबदला; त्यामुळे त्यांचे हक्कांचे उच्छाटन होत असलेले दिसून येते. तसेच कमी मिळालेल्या मोबदल्याने त्यांच्या परिवारातील आर्थिक अडचणी पूर्ण होत नसल्याने बेकारींचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

(२) ऐच्छिक बेकारी - हा बेकारीचा असा प्रकार आहे की जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते पण तिची काम करण्याची इच्छा नसते. खऱ्या अर्थाने ही बेकारीची स्थिती नसून निष्क्रियतेची स्थिती आहे.

(३) न्यून किंवा अर्धबेकारी- ही एक अशी स्थिती होय, की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही, किंवा तिला कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते. उदा. १. पदव्युत्तर शिक्षित व्यक्तीने पहारेकऱ्याची नोकरी करणे. २.इंजिनिअर व्यक्तीने शिपायाची नोकरी करणे.

(४) पूर्ण बेरोजगारी - व्यक्तीकडे पात्रता, कौशल्य, इच्छाशक्ती, असूनही कोणत्याच ठिकाणी काम प्राप्त होत नाही. याला पूर्ण बेरोजगारी म्हणतात

**बेकारीचे प्रकार :**

१. ग्रामीण बेकारी- ही बेकारी प्रामुख्याने ग्रामीण भागात दिसून येते. ही एक गंभीर स्वरूपाची समस्या आहे. यामध्ये खालील प्रकार येतात.

अ) हंगामी बेकारी- भारतात बहुतेक शेतकरी लागवडी साठी पावसावर अवलंबून असतात. त्यामुळे वषार्तून एकदाच पीक घेता येते. यामुळे ग्रामीण शेतमजुरांना केवळ ४ ते ५ महिनेच काम प्राप्त होते व उर्वरित काळ ते बेकार राहतात. म्हणून या प्रकाराला हंगामी बेकारी म्हणतात. ही बेकारी शहरी भागात सुद्धा आढळते. उदा. पर्यटन क्षेत्रातील मार्गदर्शक, लग्नसमारंभातील वादक इत्यादी.

ब) प्रच्छन्न बेकारी (छुपी): अति लोकसंख्येच्या अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये प्रच्छन्न बेकारी ही एक मूलभूत स्वरूपाची समस्या आहे. या प्रकारच्या बेकारीत ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची गरज आहे, तिथे गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात, तेव्हा अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य राहते. म्हणजेच अतिरिक्त लोक उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही व छुपी बेकारी निर्माण होते.

उदा. एका कारखान्यात उत्पादन प्रकियेसाठी केवळ २० कामगारांची गरज असताना तेथे २५ कामगारांनी काम करणे. येथे अतिरिक्त ५ कामगार हे छुपे बेकार ठरतील व ते उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही. अशा अतिरिक्त कामगारांनी उत्पन्नाचे मूल्य विनाकारण वाढते.

क) शहरी बेकारीः जी बेकारी शहरी भागांमध्ये आढळून येते तिला शहरी बेकारी म्हणतात. याचे खालील प्रकार आहेत. सुशिक्षित बेकारी- ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल, अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी, बारावी पास झालेले, पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते.

नोकरीयोग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते.

शिक्षण घेणारे दिवसेंदिवस वाढत असले तरी त्यांच्या शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देखील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे.

सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवी अनुसार काम मिळाले पाहिजे, नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढची पिढी ही शिक्षणापासून वंचित राहील, असा विचारही दिसून येतो.

तांत्रिक बेकारी - उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने जी बेकारी निर्माण होते, त्या बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. शहरी भागात कारखानदार श्रमिकांऐवजी यंत्रांना जास्त प्राधान्य देतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. उच्च दजार्चे तंत्रज्ञान वापरून उत्पादन करणे, यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. त्यामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते.

घर्षणात्मक बेकारी (संघर्षात्मक बेकारी) - या प्रकारच्या बेकारीमध्ये आर्थिक संघषार्मुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरूपात बेकार व्हावे लागते. यंत्रातील बिघाड, कच्च्या मालाची टंचाई, वीज कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. अशा स्थितीत श्रमिकांना एक काम सोडल्यापासून दुसरे काम स्वीकारेपर्यंत बेकार राहावे लागते, म्हणून त्याला घर्षणात्मक बेकारी म्हणतात. कारण या बेकारीच्या मधल्या काळात त्यांनी परिस्थितीशी संघर्ष केलेला असतो.

ड) चक्रीय बेकारी - तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. हा बेकारीचा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो. मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक क्रिया मंदावतात त्यामुळे उद्योगांचे मालक उत्पादन कमी करतात. परिणामी कामगारांना कामावरून कमी केले जाते. उदा. २००८ च्या मंदीमुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात अशाच प्रकारची चक्रीय बेकारी निर्माण झाली होती.

ई) संरचनात्मक बेकारी- जेव्हा अर्थव्यवस्थेत संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात तेव्हा ही बेकारी निर्माण होते. जेव्हा मागासलेल्या व परंपरागत अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होऊन ती आधुनिक व विकसित होत जाते तेव्हा मागणीमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल होतात. त्यातून संरचनात्मक बेकारी निर्माण होते. ही बेकारी एक दीर्घकालीन घटना होय.

उदा. ऑटो रिक्षांमुळे शहरातील घोडागाडी कालबाह्य झाली म्हणजेच त्यांना संरचनात्मक बेकारी सहन करावी लागली.

**भारतातील बेकारीची परिस्थिती :** भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार राहावे लागते, हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेकार आहेत, त्याचा अंदाज घेणे कठीण आहे. नियोजन मंडळ, जनगणनेचा अहवाल, तसेच मध्यवर्ती सांख्यिकी संस्था यांना या बाबतीत अचूक माहिती नाही. या बाबतीत काही अंदाज पुढीलप्रमाणे देता येतील- शहरी व ग्रामीण भागातील बेरोजगारी-

**बेकारीची कारणे :**

१. लोकसंख्या वाढीची जास्त गती- स्वातंत्र्यानंतर भारताची लोकसंख्या वेगाने वाढू लागली. त्यामुळे श्रमशक्ती वाढत गेली. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे या अतिरिक्त श्रमशक्तीला द्वितीय व तृतीय क्षेत्रात सामावून घेता आले नाही. त्यामुळेच बेकारी वेगाने वाढत गेली.

शेती मशागतीचे मागास स्वरूप- अज्ञान व निरक्षरतेमुळे भारतातील शेतकरी शेतीमध्ये परंपरागत पद्धतीचा वापर करतात. त्यामुळे भूमीची उत्पादकता कमी राहते आणि रोजगार वाढत नाही. सरकारी नोकर भरती बंद- यामुळे सुशिक्षित बेरोजगारी शिगेला गेली. सरकारच्या नोकर कपात मोहिमेद्वारे सुद्धा बेकारीत अवाढव्य वृद्धी होते, परिणामतः बेकारी वाढते.

भारतात सन १९८० ते सन १९९५ या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत.

सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरू आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगालात नेऊन चारण्याचे काम करू लागले आहेत.

सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अजार्ची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.९०० ते १००० एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज १०० रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे.

आज सन २०२४ नंतरही विज्ञानयुगात गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर नासली, अशी बिकट परिस्थिती आवासून आहे.

उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अन्नान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल?

# मायबापाने आपल्याला कुठवर पोसायचे?

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर जि. लातूर.**
**7498715661**

प्रत्येक आईवडील बालवयात मुलांचे सर्व हट्ट पूर्ण करतात. त्यांचे योग्य पालन पोषण करून लहानाचे मोठे करतात. वयात आल्यावर शाळेत नाव घालतात. त्यांना भरपूर पैसा ओतून चांगल्या कोचिंग क्लासेसला शिकायला पाठवतात. दहावी व बारावी पर्यंत त्यांना कोणतीच आर्थिक बाब कमी पडू देत नाहीत.

मुलांच्या सांगण्याप्रमाणे आईवडील त्यांना प्रत्येक वस्तू नेटाने पुरवतात. शाळेत जाण्यासाठी त्यांना भारी किंमतीचे हायफाय कपडे घेऊन देतात. चांगल्या किंमतीचा गणवेश घेऊन देतात. नियमित घालण्यासाठी महागड्या किंमतीचे कपडे विकत घेतात. शाळा लांब असेल तर मुलाला शाळेत जायला सायकल किंवा बाईक घेऊन देतात.

पैसा किती जाईल व किती राहील? याचा अंदाज देखील पालक लावत नाहीत. फक्त आपल्या मुलांनी भरपूर शिकावे आणि शासनाच्या मोठ्या पदावर विराजमान व्हावे असे प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असते आणि ते स्वप्न सत्यात उतरवणे प्रत्येक मुलाचे कर्तव्य असते. ते कर्तव्य पार पाडण्यासाठी मुलांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.

मुलांच्या सगळ्या शैक्षणिक व शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक पालक सक्षम असतात. पालक गरीब असोत किंवा श्रीमंत, ते मुलांच्या शैक्षणिक व शारीरिक गरजा पूर्ण करायला कधीच कमी पडत नाहीत.

त्यांना वाटते की, दहावी व बारावी झाल्यावर आपली मुले स्वतःच्या हिंमतीने कष्ट करून शिक्षणाला पैसा लावतील. शिक्षण घेत घेत काम देखील करतील. म्हणून प्रत्येक आईवडील आपल्या मुलांना दहावी व बारावीपर्यंत त्यांच्या शिक्षणाला मोकळ्या मनाने व सढळ हाताने पैसा लावतात. सावकाराचे कर्ज काढून म्हणा किंवा दागदागिने गहाण ठेवून म्हणा ते आपल्या मुलांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी लागेल तेवढा पैसा लावतात.

काही मुले आपल्या परिस्थितीची जाण ठेवून अहोरात्र जोमाने अभ्यास करतात. नियमित वाचन व लेखन करू लागतात आणि चांगल्या गुणांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात. आता मुले मोठी झाल्यामुळे आई-वडिलांना वाटते की, पुढील उच्च शिक्षण मुलांनी स्वतःच्या हिंमतीवर शिकावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे. कमी भरतीला पैसा पुरवायला तर आम्ही आहोतच. असा मानस गरीब कुटुंबातील प्रत्येक आई-वडिलांचा असतो.

गरीब घरातील होतकरू मुले आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवतात आणि स्वबळावर कष्ट करून शिक्षणाला पैसा लावतात. कारण त्यांना माहीत असते की आपल्याकडे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेच साधन नाही.

मायबापाने लहानाचे मोठे होईपर्यंत म्हणजेच शालेय जीवन पूर्ण होईपर्यंत आपल्याला सांभाळले, मोलमजुरी करून शिक्षणाला पैसा लावला, आता मायबापाला आपण कुठवर कष्ट करू द्यायचे? त्यांना कुठवर पैसा मागायचा? त्यांच्या जीवावर आपण किती दिवस जगायचे? असे प्रश्न माय बापाच्या कष्टांची जाणीव असणाऱ्या होतकरू मुलाला नक्कीच पडतात.

पण खेदाची बाब अशी की, काही घरातील मुलांना आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव नसते, आई-वडिलांचा जीवन संघर्ष कळत नसतो, घरातील आर्थिक परिस्थितीची जाणीव नसते, फक्त आई-वडिलांकडून पैसा घ्यायचा आणि त्या पैशावर मौजमजा करायची. शिक्षणाच्या नावाखाली माय बापाकडून पैसा उकळणे आणि तो पैसा व्यसनावर उधळणे हे आजकालच्या मुलांचे वैशिष्ट्य बनले आहे.

एक अतिशय गरीब कुटुंबात एका बापाला एक मुलगा व एक मुलगी असते. मुलगी समजदार व जाणकार असते. तिला आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव असते. म्हणून ती पैशाचा उडवा कधीच करत नसते, तिचे राहणीमान एकदम साधे असते. पैसा जपून वापरणे आणि मायबापाला घर कामात व शेती कामात मदत करणे हे त्या मुलीचे दैनंदिन काम असते. मुलगा मात्र चंगळवादी जीवनाचा शौकीन असतो. त्याला आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव नसते. त्याला मायबापाचा जीवन संघर्ष माहित नसतो. त्याचे राहणीमान एकदम आलिशान असते.

मित्रांमध्ये राहणे, पार्ट्या खाणे, दारू ढोसणे, मटका लावणे आणि शिक्षणाच्या नावाखाली माय बापाकडून निघेल तेवढा पैसा उकळणे, हे त्याचे रोजचे काम असते. त्या मुलाचा बाप मात्र हमाली किंवा रोजगार करून त्या कुटुंबाचा घर प्रपंच सांभाळायचा, केवळ कष्टाच्या बळावर मुलांना शिक्षण शिकवायचा, त्यांना मागेल तेव्हा पैसा द्यायचा म्हणजे मुलांचे हट्ट पुरवण्यात तो कधीच कमी पडायचा नाही.

एके दिवशी तो बाप एका कंपनीत हमालीचे काम करत होता. तो एका ट्रॅक्टरमधील ज्वारीचे पोते खाली उतरवायचे काम करत असताना त्या बापाचा मुलगा त्याच्याकडे आला आणि त्याने बापाकडे पैसे मागण्याचा तगादा लावला.

आज माझा वाढदिवस आहे, आणि मला माझ्या मित्रांना पार्टी द्यायची आहे, त्यासाठी मला काही पैसे हवे आहेत, तुम्ही मला द्या, तो मुलगा अशी मागणी आपल्या बापाकडे घालतो. तेव्हा बाप म्हणतो की, पोरा माझ्याकडे काही जास्त पैसे नाहीत, फक्त हजार रुपयेच माज्याकडे आहेत, आणि ते पैसे मी घराचा किराया देण्यासाठी ठेवले आहेत.

किरायादार रोज घरी येऊन पैसे मागत आहे. पैसे नसल्यामुळे मी त्याला देण्याचे टाळत आहे. माज्याकडे असलेल्या हजार रुपयातील चारशे रुपये तुला देतो. बाकीचे तू कोणाकडून तरी मागून घे, असे वडील म्हणतात पण तो मुलगा चारशे रुपये घ्यायला तयार नसतो.

तो बापाला शिव्या घालतो, तुम्ही माझ्यासाठी काय केले, असे म्हणतो. तुम्हाला पैसे देता येत नसतील तर तुम्ही मला पैदा का केले? दहा लोकांमध्ये बापाच्या कॉलरला धरून बापाला धक्के देत बोलतो आणि बापाच्या खिशात असलेले हजार रुपये काढून घेतो... काही वेळातच तो किरायादार बापाकडे किराया मागायला येतो आणि त्याला पैसे मागतो, तेव्हा बापाला काय बोलावे हेच कळत नाही, किरायासाठी ठेवलेले पैसे मुलगा हिसकावून घेऊन गेला हो मालक!

म्हणून बाप त्या किरायादाराला सांगतो. किरायादार मात्र काहीच ऐकून घ्यायला तयार नसतो. माझे पैसे आत्ताच्या आत्ताच मला द्या नाहीतर रूम खाली करा असे बजावून सांगतो...बापाला खूप टेन्शन येते मुलाने केलेला अपमान आणि किरायादाराने बोललेले शब्द त्याच्या मनावर आघात करतात. तो एका झाडाखाली बसून ढसाढसा रडतो. आणि त्याला आपण मुलाला जन्म दिल्याचा पश्चाताप वाटतो. आपण मुलाला जन्म देऊन काय गुन्हा केला? मुलाला जन्म देण्याचा मोबदला मुलाने असा द्यायचा का?

त्या किरायादाराची यात तेवढी चुकी नसते, तो किरायादार खूप दिवसांपासून आपला थकीत किराया मागत होता पण वडील पैसे नसल्यामुळे किराया देण्यास टाळटाळ करत होते. पण मुलाची मात्र यात खूप मोठी चूक असते. मुलाने जन्मदात्या बापाला असे अपमानास्पद बोलून व कॉलरला धरून धक्के देणे हे खरंच माणुसकीला अशोभनीय कृत्य आहे. बापाने जन्म दिला म्हणून मरेपर्यंत बापानेच मुलाला पोसायचे का? हे कोणत्या पुस्तकात लिहिले आहे? कोणत्या संताने, महापुरुषाने व तत्त्ववेत्याने सांगितले आहे का?

मुलगा कर्ताधर्ता होईपर्यंत मुलाचा सांभाळ करणे, त्याला दहावीपर्यंत शिक्षणाला पैसा लावणे हे बापाचे कर्तव्य असते. कारण दहावीपर्यंत मुले तेवढे सक्षम झालेले नसतात. पण पुढील उच्च शिक्षण स्वतःच्या जीवावर शिकणे हे मुलाचे कर्तव्य असते. कारण तेव्हा मुले सक्षम होतात आणि कोणतेही मेहनतीचे काम करू शकतात. हे सगळ्या मुलांनी लक्षात घ्यायला हवे.

पण मुलगा लग्नाच्या वयाचा झाला, कोणतेही काम करण्यास सक्षम झाला, त्याला दुनियादारी कळू लागली, त्याला चांगल्या वाईटांची जाणीव होऊ लागली, तरीही मुलाला बापानेच सांभाळायचे असते का?

सांगायचा मुद्दा म्हणजे मुले जसजसे लहानाचे मोठे होत जातात, तसतसे आईवडील शरीराने थकत जातात. तेव्हा मुलांनी आई-वडिलांचा सांभाळ करणे, हे प्रत्येक मुलाचे परम कर्तव्य असते पण हल्ली सगळे उलटेच होऊन बसले आहे. मुलांचे लग्न झाले तरीही आईवडील त्यांना जगवताना दिसत आहेत. आता तुम्हीच सांगा मित्रांनो मायबापाने तुम्हाला कुठवर पोसायचे?

पृथ्वीवर असे कितीतरी मोठी माणसे होऊन गेली त्यांनी स्वतः कष्ट करून शिक्षण घेतले आणि जगाच्या इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यास भाग पाडले. स्वतः कष्ट करून शिक्षण घेणारे व आपल्या आई वडिलांना सांभाळणारे कितीतरी लोक या जगात यशस्वी झाल्याचे दिसून येते.

आपल्याला बिरदेव डोने या मेंढपाळ मुलाचे उदाहरण देता येईल. हा बिरदेव डोने अतिशय गरीब कुटुंबातील मुलगा होता. तो दिवसभर मेंढ्या राखत अभ्यास करायचा.. आज तो बिरदेव डोने आयपीएस अधिकारी झाला आहे...त्याची प्रेरणा घेऊन आपण देखील तशी वाटचाल करावी.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### गुरुपौर्णिमेचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरु .आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरु याचा अर्थ, गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे अंतःकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरु नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरु म्हणजे शिष्याला किंवा भक्ताला मायेच्या मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. गुरु म्हणजे निरपेक्ष प्रेम, भरभरून दोन्ही हाताने शिष्यांना विद्या देणारे. आषाढ पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरु पूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. अध्यात्मात असो किंवा कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रात असो गुरूंशिवाय तरुणोपाय नाही. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरु आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रता ही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याच बळ मात्र गुरूच देतात.

शिष्याची गुरूंवरील श्रद्धा, निष्ठा, भक्ती, शरणागत भाव, आज्ञापालन हे जेवढे जास्त असेल तेवढी त्याची प्रगती जलद होते. आपल्याला असणारी संसारिक आसक्ती ही केवळ साधनेनेच कमी होते. आपले षडरिपु हे फक्त गुरूंच्या मार्गदर्शनातच आपण कमी करू शकतो. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य, गुरूंची 'पाद्य पूजा' करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात.

■ **सौ. माधवी पत्की**
**नागपूर.**

### सत्यस्थितीचे पोटशूळ का?

२९ जून ला दैनिक महासागर मधे 'संविधान समजावून सांगणे म्हणजे देशद्रोह का?' हे लेखन वाचले. तसेच त्यांनी त्यात उल्लेख केलेले लेखनही वाचले होते. त्यांनी उल्लेख केलेल्या लेखनात कुठेही संविधान सांगण्याला विरोध केलेला नाही. केवळ संविधानाच्या आडून श्रद्धेला तडा जाऊ नये यासाठी सावधगिरी बाळगायला सांगितली आहे. संविधानाला लेखिकेचा विरोध दिसून येतो असा आरोप २९ जूनच्या सदर लेखात केला आहे. शिवाय लेखकाने वापरलेली भाषाही असभ्य आहे. ज्या पत्राचा उल्लेख लेखकाने केला त्यात वावगे असे काहीच नाही. त्या पत्रात लेखिकेने सध्याची सत्यस्थिती मांडली आहे. त्याचे पोटशूळ का?

■ **केतकी हरदास, नागपूर.**

# शिक्षण म्हणजे काय रे भाऊ?

देशातील लोकांना अजूनही शिक्षणाचा अर्थ, गांभीर्य आणि उद्देश कळालाच नाही. आजही कोणाला विचारले शिक्षण म्हणजे काय तर तो व्यक्ती बिए, .बिएससी, एम ए,एम एस सी असेच सांगेल आणि सुशिक्षित म्हणजे कोण तर वरील सांगितल्या प्रमाणे शिक्षण घेणारा व्यक्ती म्हणजे सुशिक्षित असेच उत्तर येणार.

हा लेख लिहण्या मागचा उद्देश हा आहे कि एका शिक्षकाने स्वतःच्या मुलीला कमी गुण मिळाले म्हणून मारले आणि त्यात तिचा मृत्यू झाला. सदर घटना ही मनाला चटका देणारी आहेच. घटना घडल्यावर अनेक लोक स्वतः चे मत मांडून घडलेल्या घटनेचा निषेध करून पालकांनी कसे रहावे याचे सल्ले देत आहेत.

शिक्षक पित्याने मुलीची हत्या केल्याने जास्तच प्रकरण तापले गेले. शिक्षकाने जे केले ते चुकिचे आहेच परंतु बाकीचे स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक बरोबर आहेत का हा प्रश्न ऐरणीवर आहे. शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचा उद्देश काय हे अजूनही आपल्याला समजले नाही. आपण थोडक्यात बघितले तर देशात पहिली मुलींची शाळा महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले यांनी सुरू करून महिलांच्या जिवनात क्रांती केली मानसिक, बौद्धिक व शारीरिक गुलामगिरी, अंधविश्वास व विषमतेच्या बेड्या तोडून विज्ञानवादाच्या मार्गाने जाऊन स्वतः मध्ये वैचारिक परिवर्तन होण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या शिक्षणाला कुटील व बुद्धीहीन लोकांनी विरोध केला. तरीही अंगावर शेणमाती घेऊन शिक्षणाची कास सोडली नाही. म्हणून चौथ्या वर्गातील मुक्ता प्रश्न विचारते आमचा धर्म कोणता?

आज महिलांच्या कपाटात साड्या आणि साड्यावर परफ्यूम चा वास येण्यासाठी सावित्रीमाई यांनी शेण, माती आणि खरकटे पाणी अंगवर सहन केले म्हणजे काय असेल शिक्षण? छत्रपती शाहु महाराजांनी स्वतःच्या राज्यात बोर्डींग सुरू करून एक एक आण्यासाठी संघर्ष करावा लागणा?या काळात मुलांना शाळेत पाठवले नाही तर पालकांना एक रूपया दंड आकारणारे शाहु महाराज शिक्षणाला एवढे महत्त्व का देत होते?

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी का म्हटले असेल? गाडगेबाबा म्हणतात भाकरी हातावर घेऊन खा पण मुलांना शाळेत पाठवा असे समाजाला वारंवार का सांगत असतील? त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून काय साध्य करायचे असेल?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाची द्वार खुले करून आपल्याला शिक्षीत करण्यासाठी फुले शाहु आंबेडकर यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या महामानवाचे फोटो शिक्षीत लोकांच्या घरात आहेत का? जर हे महापुरुषांचे फोटो घरात लाऊ शकत नाहीत तर यांना शिक्षीत कसे म्हणावे? जो अन्याया विरोधात गुरगुरत नाही ते शिक्षण आहे का?

आज डोक्यात मेंदू नसलेल्या लोकांनी शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवून पैसे कमवण्याचे माध्यम समजले आहे. परंतु शिक्षण म्हणजे केवळ आर्थिक विकास मुळीच नाही. शिक्षण म्हणजे बौद्धीक व वैचारिक परिवर्तन म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे जास्त मार्क्स घेऊन परिक्षा पास होणे मुळीच नाही. शिक्षण म्हणजे फक्त पैसा मिळण्यासाठी नोकरीच्या मागे धावने मुळीच नाही.



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

शिक्षण माणसाला वैचारिक परिपक्व आणि मानसिक समृद्ध करून मानसामध्ये नैतिकता व प्रामाणिकपणा भरते. शिक्षण माणसाला मानसिक गुलामीतुन मुक्त करते, शिक्षण माणसाला समता व सामाजिक न्याय शिकवते,

शिक्षण माणसाला सर्वांसोबत माणसा सारखी वागणूक द्यायला शिकवते, शिक्षण माणसाला स्वतःचा सामाजिक विकास व आपल्या सोबत समाजाचा सामाजिक विकास करायला शिकवते. वरिल बाबी ज्यांच्या अंगी आहेत तो सुशिक्षित आणि त्याने जे आत्मसात केले ते शिक्षण होय.

आज आपण शाळा महाविद्यालयात जाऊन वाचलेल्या पुस्तकाला शिक्षण समजतो. आणि शाळा महाविद्यालयात जे पुस्तके वाचली जातात ती बहुतांशी फक्त मार्क्स मिळावे यासाठीच असतात. त्याचे गांभीर्य, आशय व कारण लोकांना कळतच नाही. एक दोन उदाहरणाद्वारे समजून घेतले तर लक्षात येईल.

पहिले उदाहरण विज्ञानाचे घेऊ कोणत्याही घडणाऱ्या घटनेला काही ना काही आधार नक्कीच असतो.

कोणतीही गोष्ट विना आधार घडत नाही. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीमागे कारण असते. आपण आग पेटवली तर ऑक्सिजन मिळतो म्हणून आग जळते, जळणासाठी ऑक्सिजन आवश्यक आहे. हे उदाहरण जगात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला लागु होते, वेगवेगळे सरायने एकत्र आले तर तिसरीच काहीतरी तयार होते.

थोडक्यात प्रत्येक गोष्टीच्या निर्मिती मागे कोणाचा ना कोणाचा आधार आहे हे माहित असताना, विज्ञान शिकलेले असताना आजही लोक चमत्कार, पाखंड यावर जर विश्वास ठेवत असतील तर त्याला शिक्षण म्हणायचे का?

दुसरे एक उदाहरण घेऊया राज्य घटनेचे. राज्यशास्त्र किंवा स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना राज्यघटना प्रत्येक जण वाचतो. मार्क्स मिळविण्यासाठी त्याचा वापर करतात. राज्य घटनेने मुलभूत अधिकार बहाल केले, राज्यघटनेने देश चालतो, राज्य घटने मुळे आपण अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवतो, राज्य घटनेने प्रत्येकाला समान हक्क, स्थान व संधी उपलब्ध करून दिली वगैरे वगैरे सगळं काही वाचतो.

स्पर्धा परिक्षा पास होऊन समाजाची सेवा करायची अशी बोलणारे लोक घरात राज्य घटना आणि घटनाकारांचा फोटो लावत नसतील तर त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षण हे स्वतः सह समाजाचा उद्धार करणारे माध्यम आहे. आपण आज जर बघितले तर शिक्षणातून तलाठी, पोलीस, ग्रामसेवक, तहसील कार्यालयातील कर्मचारी, व इतरही कार्यालयातील कर्मचारी यांचा विचार केला तर हे महाविद्यालयात पुस्तक वाचुन नोकरीवर लागलेली लोक आहेत. जे नोकरी वर लागली ते स्वतःला जरा जास्तच बुद्धिमान समजतात. अर्थात सगळेच असे असतात असे नाही पण बहुतांश लोक असेच असतात.

गरिबीत शिकुन मी नोकरी ला लागलो म्हणणारे लोक मग तो तलाठी असेल तर शेतकऱ्यांकडून कसे आणि कोणकोणत्या कामाचे किती पैसे घेतो हे शेतकऱ्यांना माहिती आहे. माहीतीच नाही तलाठ्या कडून काम करून घ्यायचे म्हणजे पैसे द्यावेच लागतात असा अलिखित पण सर्वमान्य नियमच आहे.

ग्रामसेवक असेल तर घरकुल मिळण्यासाठी बेघर गरिब लोकांकडून किती पैसे घेतात आणि ज्यांनी पैसे दिले नाही त्यांचे घरकुल कसे डावलले जाते आणि ज्यांनी पैसे दिले, जो ग्रामसेवक यांच्या जवळचा आहे त्या व्यक्तीला पक्के घर असताना पुन्हा घरकुल मिळते हे सर्वांना माहिती आहे.

पोलिस असतील तर दारू, मटका, प्रवासी वाहने, यांच्या कडून स्वतःच्या खिशात दररोज किती पैसे भरत असतील याची गणती आहे का?

एखादे भांडण झाले, चोरी झाली किंवा इतर गुन्हेगारी प्रवृतीची तडजोड करायला किती खर्च येतो लोकांना माहिती आहे. तहशिल मध्ये राशन कार्ड असेल, कोतवाल नक्कल असेल, एवढेच काय निराधार, विधवा, विकलांग लोकांच्या योजना असो या ठिकाणी सुद्धा निराधार, विधवा, विकलांग लोकांकडून ही पैशाची मागणी केली जाते.

थोडक्यात प्रत्येक कार्यालयात गोरगरिबांचे कामे विनापैसे होत नसतील आणि सरकारी पगार घेऊनही गोरगरीब लोकांकडून ज्यांची खायची सोय नाही, राहायची सोय नाही अशा लोकांकडून पैसे घेऊन स्वतः ची घरे भरणा?या बेईमान लोकांना सुशिक्षित म्हणायचे का? सर्वच सरकारी कर्मचारी भ्रष्ट आहेत असे मुळीच नाही पण आजपर्यंत अनेक उदाहरणे समोर आलेले आहेत तलाठी, पोलीस, ग्रामसेवक व इतरही कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे करोडो रुपये सापडले. जे पकडले गेले ते फक्त उदाहरण आहेत. असे कितीतरी कर्मचारी दररोज बाहेर गोरगरिबांचे खिसे रिकामे करत आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे?

जर कर्मचारी लोकांकडे करोडो रुपये सापडू शकतात तर अधिकारी वर्गांकडे किती चे घबाड असेल? आणि संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे किती पैसा प्रामाणिक कमाईमधील असेल याचा विचार न केलेलाच बरा. पण अशा लोकांना शिक्षीत म्हणायचे का? शाळेतील पुस्तके वाचणारे अनेक लोक अनेक चुकिच्या प्रकरणात गुन्हेगारी क्षेत्रात समोर आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे का?

बलात्कार, अपहरण हे शिकलेल्या लोकांमध्ये जास्त घडून येते त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षक, डॉक्टर, पोलीस, शासकीय, खाजगी कार्यालयात महिला सुरक्षित नाही मग त्यांना सुशिक्षित म्हणायचे का? नाही रे भाऊ ते शिक्षण नाही.

स्वतःच्या ताटातील खास गरजुंना देणे, गोरगरिबांना मदत करणे, स्त्रियांचा सन्मान करणे, देश व देशाचे प्रतिकांचा सन्मान करणे, मेहनतीने पैसे कमावून गरजुंना मोठ्या मनाने मदत करणे, आणि सर्वात महत्वाचे नोकरी कोणतीही असो, पैसा कोणत्याही मार्गाने कमवावी पण ते करतात इमानदारी व नैतिकता हरवली जाणार नाही म्हणजे शिक्षण रे भाऊ...

■ ■ ■



## विधीमंडळ अधिवेशन

# सचिवांना बांधून सभागृहात आणा

## सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभेत मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :



विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज शेतकऱ्यांच्या मुद्यावरून सत्ताधारी व विरोधकांत चांगलीच शाब्दिक चकमक उडाली. त्यात काँग्रेस सदस्य नाना पटोले यांच्यावर एका दिवसाची निलंबनाची कारवाई करण्यात आली.

पण त्यानंतर सभागृहात उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्यांना पकडून सभागृहात आणण्याची मागणी करण्यासंबंधीचा एक वेगळाच प्रसंग घडला. सत्ताधारी पक्षाच्या ज्येष्ठ सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी स्वतः ही मागणी केली. त्यामुळे तालिका अध्यक्षांनाही यासंबंधी शासनाला योग्य ते निर्देश द्यावे लागले.
त्याचे झाले असे की, मंगळवारी दुपारी २ च्या सुमारास विधानसभेत महाराष्ट्र विधिमंडळ नियम २९३ नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्यांवर चचेर्चा प्रस्ताव मांडण्यात आला. सभागृहातील जवळपास ५० सदस्यांनी हा प्रस्ताव मांडला. पण या प्रस्तावावर चर्चा सुरू होण्यापूर्वीच माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या सभागृहातील अनुपस्थितीचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, सभागृहात चर्चा सुरू असताना संबंधित खात्याच्या सचिवांनी उपस्थित राहणे आवश्यक असते. २९३ ची चर्चा राज्याच्या प्रगतीसाठी आवश्यक असते. आपण सुखी, समृद्ध, प्रगत, पुरोगामी व सुधारणावादी महाराष्ट्र घडवण्यासाठी २९३ ची चर्चा प्रस्तावित केली. पण या चचेर्ला विभागाचा एकही सचिव उपस्थित नाही. मंत्री त्यांच्या विभागाच्या कामात व्यग्र असू शकतात. पण विभागाचा एकही सचिव सभागृहात का बसत नाही?
मी १९९५ पासून आमदार आहे. तेव्हा विभागाचे सचिव अशा महत्त्वाच्या चचेर्ला यायचे. तालिका अध्यक्ष म्हणून तुम्हाला (चेतन तुपे) एक संधी मिळाली आहे. या राज्याची शताब्दी साजरी होईल, तेव्हा तुमचे नावही तिथे आदराने घेता यावे यासाठी तुम्ही २९३ च्या चचेर्ला सचिवांनी यायला हवे असे आदेश द्या. त्यानंतरही सचिव बसत नसतील, तर ब्रिटनच्या संसदेत अशा अधिकाऱ्यांना जसे बांधून घेऊन यायचे, तशी काही परवानगी आपल्याला देता येईल का? हे पाहा. यातून तुमचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहून घ्या. पुन्हा ही संधी येणार नाही, असे मुनगंटीवार तालिका अध्यक्षांना उद्देशून म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार यांच्या या मागणीचे सत्ताधारी शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी समर्थन केले. ते म्हणाले, २९३ चा विषय जवळपास ५० ते ६० आमदारांनी दिला आहे. मुंबईसह संपूर्ण राज्याच्या विकासाचे व्हिजन त्यात आहे. आज अशी उदासीनता असेल तर राज्याचे प्रश्न कसे मार्गी लागतील? सुधीर मुनगंटीवार यांनी सचिवांना बांधून आणण्याचा विचार मांडला. तसे काही करता येते का पाहा, असे खोतकर म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार व अर्जुन खोतकर यांचा हा रोष ऐकल्यानंतर तालिका अध्यक्षांनी लगेचच शासनाला योग्य ते निर्देश दिले. ते म्हणाले, सभागृहात ही गॅलरी अदृश्य असली तरी, विषय व सभासदांच्या भावना गांभिर्याने घेऊन शासनाने यासंबंधी योग्य ती कारवाई करावी. अनेकदा हे अधिकारी टीव्हीवर सगळे कामकाज पाहतात. गरज असेल तर त्यांचे टीव्ही बंद करा. त्यामुळे त्यांना सभागृहात येण्याची सवय लागेल, असे ते म्हणाले.

# हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात

## गृहराज्यमंत्र्यांची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :

मुंब्रा येथे अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार आणि तिची निर्घृण हत्या ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मंगळवारी विधानसभेला दिली.

या गुन्ह्याचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडितेला न्याय मिळावा, यासाठी हे प्रकरण गृहराज्यमंत्री योगेश कदम फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यात येईल, असे ते प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना म्हणाले.
याबाबत सदस्य देवयानी फरांदे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर कदम म्हणाले, सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. फॉरेन्सिक तपास अहवाल निश्चित वेळेत प्राप्त व्हावा, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात येणार आहेत.

### निकृष्ट दर्जाचा शालेय पोषण आहार

एकनाथ खडसे म्हणाले, राज्यभरात सर्वत्र भेसळ, झुरळ निघणे, अशा घटना घडत आहेत. शालेय पोषण आहारात असे आढळून येते. तक्रार केल्यानंतर नोंद घेतली जात नाही. तक्रारीची नोंद घेण्यासाठी एखादा क्रमांक असावी. अत्यंत निकृष्ट दजार्चे पोषण आहार हे राज्य सरकारकडून दिले जात आहे. शालेय पोषण आहाराचे जे कोणी ठेकेदार असतील त्यांचे लागेबंधे मोठे असतात, म्हणून कारवाई देखील करायला कोणी धजावत नाही.

### सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा - दानवे

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले, रविंद्र चव्हाण जेव्हा सार्वजनिक बांधकाम मंत्री त्यांचे एक पत्र आहे माझ्याकडे. यात राज्यमार्ग ५५ इंदोरी ते कुंडमळा रस्ता ग्रामीण मार्ग ३१ असे त्यांनी पत्रात लिहिले आहे आणि आताचे मंत्री म्हणतात ते आमचे नाही.

राज्यमार्ग ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येतो का? इथे खबरदारी घेतली गेली नाही. अधिकाऱ्यांना का पाठीशी घालताट? तुम्ही जबाबदारी नाकारत आहात. यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, जीव काय स्वस्त आहे का? जो दोषी असेल त्याच्यावर कारवाई करा, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली.

### राजकीय हत्या - अहिर

शिवसेना ठाकरे गटाचे सचिन अहिर यांनी कुंडमळा घटनेवरून सरकारवर गंभीर आरोप केलेत. ते म्हणाले, माझ्याकडे मंत्र्यांचे ११ जुलै २०२४ चे पत्र आहे. त्यात या ब्रिजसाठी ८० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मग का नाही या ब्रिजचे काम सुरू झाले? पण तुम्ही आता सांगत आहात की आम्ही बोर्ड लावले. हे मृत्यू नाही, ही हत्या आहे.

# बनावट शालार्थ आयडी घोटाळ्याची एसआयटी चौकशी

## शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची घोषणा; आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :
नागपूरसह संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या बनावट शालार्थ आयडी घोटाळ्याची या विषयाची समज आणि ज्ञान असणा ?्या वरिष्ठ आयएएस तसेच आयपीएस अधिका ?्यांची एसआयटी स्थापन करून चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

शिक्षण देणे हे पुण्याचे काम आहे. परंतु दुर्दैवाने शिक्षण विभागातच सर्वात जास्त भ्रष्टाचार होतो, असा घणाघाती आरोप भाजप आमदार प्रवीण दटके यांनी विधानसभेत शिक्षणमंत्री दादा भुसे यांना धारेवर धरताना केला. त्याला उत्तर देताना दादा भुसे यांनी नागपूर विभागात बनावट शालार्थ आयडीचा वापर करून काही चुकीचे प्रकार झाले आहे, हे मान्य केले.

ते म्हणाले, या संदर्भात चौकशीसाठी पोलिस विभागाची एसआयटी स्थापन केली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या माध्यमातून समांतर तपास सुरू आहे. आतापर्यंत १९ जणांवर फौजदारी कारवाई झालेली आहे. शालेय शिक्षण विभागातील संचालक (योजना) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्या सर्वांवर कायद्या प्रमाणे कारवाई निश्चितपणे केली जाईल, असे भुसे यांनी सांगितले.

नागपूरमध्ये शिक्षक भरती घोटाळा गाजत आहे. दिवंगत शिक्षणाधिकारी सोमेश्वर नेताम यांच्या बोगस सह्या घेऊन २०१२ ते २०१९ दरम्यान काही शिक्षकांची भरती करण्यात आली. कोरोना नंतर या शिक्षकांना स्थायी दाखवण्यात येऊन त्यांचे त्या वर्षाचे एरीयर्स व पगार काढण्यात आले. शिक्षण विभागातील सर्वांनीच हे पैसे वाटून घेतल्याचे दटके म्हणाले.



या प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे काय? यात नेमण्यात आलेल्या सगळ्यांची तपासणी करणार आहात काय? बोगस शिक्षकांचे देण्यात आलेले पगार वसूल करणार आहात काय? शासनाने नेमलेल्या समितीचे अध्यक्ष तीन वेळा बदलले. कारण तीघांवरही गुन्हे दाखल झाले. तर त्यातील दोघांना अटक झाली. त्यामुळे समितीवर या विषयाची समज असणारे योग्य अधिकारी नेमणार काय? असा प्रश्नांचा भडीमार दटके यांनी केला.

राज्यात बनावट शालार्थ आयडीचे प्रस्ताव मान्य करीत २७०० शिक्षक नेमले आहेत. यावर आरोप निश्चित केले आहे काय? याच्या चौकशीसाठी नेमलेल्या एसआयटीत या विषयाची समज असणारे अधिकारी आहेत का? नुसता नागपूर विभागच नव्हे तर महाराष्ट्रातील इतरही विभागांमध्ये झालेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी करणार आहात काय? असे अनेक सवाल आमदार दटके यांनी केले.

या प्रकरणाचा छडा लागत नाही तोपर्यंत नागपूर विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याची उपसंचालक म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये. नागपूर विभागातील प्राथमिकसह माध्यमिक शिक्षण विभागातील कर्मचारी बदलले नाहीतर हा घोटाळा थांबणार नाही असे दटके म्हणाले. आज नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालय, वेतन पथकातील एकही अधिकारी भीतीपोटी काम करायलाच तयार नाही. अनेकांनी बहुतांश जणांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केले आहेत, काहींना मिळाले आहे. मिळाले नाही ते फरार आहेत, याकडे दटके यांनी लक्ष वेधले.

## मालवाहतूक आणि शालेय बस संघटनांचा

# ई-चलन कारवाईविरोधात संप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
राज्यातील ई-चलन कार्यप्रणालीच्या माध्यमातून सुरू असलेल्या अन्यायकारक दंडात्मक कारवाई विरोधात मालवाहतूक आणि शालेय बस संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभर चक्का जाम आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.

मालवाहतूक संघटनांनी मंगळवार, १ जुलैपासून संपाला सुरुवात केली असून राज्यातील सर्व जिल्ह्यांतून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर बुधवार, २ जुलै रोजी शालेय बस संघटनांनी संप पुकारला आहे. या संपात अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनधारकांसह दररोज विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या बसचालकांचा मोठा सहभाग राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, ई-चलन प्रणालीतून होणारी सीसीटीव्ही, वेबरेडर आणि जीपीएस आधारित कारवाई ही अनेक वेळा चुकीची असते आणि त्याचा परिणाम वाहनचालकांवर आर्थिक व मानसिक तणावाच्या स्वरूपात होतो. शालेय बस चालवणाऱ्या वाहनधारकांवर शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ विद्यार्थ्यांना सोडताना किंवा घेऊन जाताना देखील दंडात्मक कारवाई केली जात असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

वाहतूक पोलिसांकडून होणारी अकारण कारवाई, अवास्तव दंड, तसेच तांत्रिक अडचणींमुळे चुकीच्या नोटीस मिळणे हे प्रकार वाढले असून याबाबत ठोस उपाययोजना होण्याची मागणी संघटनांनी केली आहे. या संपामुळे वस्तू पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## अनियंत्रित कार झाडाला धडकली

# दोघांचा जागीच मृत्यू

## दोघे गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १ :

जिल्ह्यात देवरी तालुक्यातील चिचगडकडून भरधाव वेगात येणाऱ्या अनियंत्रित कारने रस्त्यालगत असलेल्या बीजाच्या झाडाला जोरात धडक दिली. त्यामुळे कारमधील दोन जण जागीच ठार झाले, तर एक जण गंभीर जखमी झाला.

मंगळवार १ जुलै रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास देवरी तालुक्यातील परसटोला शिवारात ही घटना घडली. अपघात इतका भीषण होता की, गॅस वेल्डिंगने कटिंग करून मृतास व जखमीस कारच्या बाहेर काढावे लागले. राजा भारती (वय ३५), सोहेल शेख (वय ३२) असे या अपघातातील मृताचे नाव आहे. तर सलमान शेख (वय २५) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातात कारची धडक इतकी जबर होती की, कार पूर्ण चक्काचूर झाली. पहाटेची घटना असल्यामुळे तीन तासानंतर मदत मिळाली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार देवरी शहरातील तीन तरुण कारने (सी. जी. ०८ आर ६२५५) देवरी चिचगड मार्गावरून देवरीकडे येत होते. चालकाचे परसटोला शिवारातील वन विभागाच्या



नाक्याजवळ स्टेरिंगवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार रस्त्यालगत असलेल्या बीजाच्या झाडाला जाऊन धडकली.

या अपघातात कार चालक व चालकाच्या शेजारच्या सिटवर बसलेला तरुण जागीच ठार झाले. मागच्या सिटवर बसलेला तरुण समोरच्या व मागच्या सिटमध्ये अडकला. मृत व जखमी देवरीचेच रहिवाशी आहेत.

अपघातात सलमान शेख या तरुणाचे पायाचे हाड मोडले. देवरी शहरालगत अपघात झाल्याने पोलीस तसेच नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी गोळा झालेल्या नागरिकांनी कारमधील लोकांना बाहेर काढण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. मात्र, त्यांना बाहेर काढता येत नव्हते. त्यामुळे गॅस वेल्डिंगने कटिंग करून, मृतास व जखमीस पोलीस कर्मचारी व नागरिकांनी बाहेर काढले. जखमींना १०८ रुग्णवाहिकेने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## बाळासाहेबांच्या स्मारकाचा मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
मुंबईच्या दादर येथील महापौर बंगल्यातील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. स्मारकाच्या निर्णयाला २०१७ साली विविध याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. परंतु, या याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या असून स्मारकाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने या याचिका फेटाळल्या आहेत. मागील ८ वर्षांपासून आव्हान देणाऱ्या याचिका प्रलंबित होत्या. माहिती अधिकार कार्यकर्ते भगवानजी रयानी, जनमुक्ती मोर्चा संस्थेचे अध्यक्ष मानव जोशी तसेच पंकज राजमाची यांनी स्वतंत्र याचिकेद्वारे बाळासाहेबांच्या स्मारकाला आव्हान दिले होते.

## गुलाल उधळत या

■ मुंबई, दि. १ :
मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एका संयुक्त पत्रकाद्वारे मराठी जनतेला ५ जुलैच्या विजयी मेळाव्याला वाजत - गाजत येण्याचे आवाहन केले आहे.

त्यामुळे हे दोन्ही भाऊ या मेळाव्याच्या निमित्ताने एका व्यासपीठावर येणार हे स्पष्ट झाले आहे.

## विदर्भातील नऊ जिल्ह्यांत पावसाची मोठी तूट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :
राज्यातील बहुतांश भागात दमदार पावसाने हजेरी लावली असली तरी विदर्भातील अनेक जिल्ह्यात अद्यापही दमदार पावसाने पाठ फिरवली असल्याचे चित्र आहे.

नागपूर प्रादेशिक विभागाने दिलेल्या माहितीनुसार गेल्या १ जून ते ३० जून या कालावधीत विदभार्तील ९ जिल्ह्यांमध्ये जून महिन्याच्या सरासरी पावसापेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यात फक्त बुलढाणा आणि वाशिम या दोनच जिल्ह्यात जून महिन्याची सरासरी ओलांडली गेली आहे.

१ ते ३० जून या कालावधीत विदर्भात एकूण १७५ मिलिमीटर पावसाची नोंद होते. मात्र यंदा केवळ १५५ मिलिमीटर पावसाचीच नोंद झाली आहे. त्यातल्या त्यात सर्वात कमी पाऊस नागपूर जिल्ह्यात झाला असून सरासरी १७३ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त ९८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच पावसाची तूट ४४% इतकी आहे.

भंडारा जिल्ह्यात १८७ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त १११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच ही पावसाची तूट ४०% इतकी आहे. अमरावती जिल्ह्यात १५० मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त १०० मिलिमीटर पाऊस झाला आहे. म्हणजे पावसाची तूट झाली आहे ३३% गोंदिया जिल्ह्यात १९६ मिलिमीटर सरासरी पावसाच्या तुलनेत फक्त १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. इथे पावसाची तूट ३०% आहे.

वर्धा जिल्ह्यात १७० मिलिमीटर पावसाच्या तुलनेत १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि अकोला या चार जिल्ह्यात पाऊस समाधानकारक झाला असून बुलढाणा आणि वाशिम या दोन जिल्ह्यात जून महिन्याची पावसाची सरासरी ओलांडली गेली.

# महसूल राज्यमंत्री योगेश कदम वाळू चोर

## विधान परिषदेच्या पटलावर अनिल परब यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
राज्याचे गृह तथा महसूल राज्यमंत्री योगेश कदम हे वाळू चोर असल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी मंगळवारी विधान परिषदेत बोलताना केला.

या प्रकरणी त्यांनी योगेश कदम यांच्या चोरीचे ठोस पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा केल्यामुळे या प्रकरणाचे गांभिर्य वाढले आहे. दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या प्रकरणी कदम यांच्यावर कारवाई करणार का? असा सवालही त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. या आरोपावरून खडाजंगी सुद्धा उडाली.

# आमदार आणि मंत्र्यात निधीवाटपावरून वाद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :



भाजपचे आमदार विनोद अग्रवाल आणि शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांच्यात निधीवाटपावरून विधान भवन परिसरात वाद झाल्याचे समोर आले आहे. अग्रवाल यांनी आमच्या मतदारसंघात निधी मिळवून देत नसल्याचे भरत गोगावले यांना सांगितले तेव्हा थोडा वाद निर्माण झाला होता. विशेष म्हणजे शिंदे गटाकडूनच निधी मिळत नसल्याचा आरोप केला जातो, परंतु इथे भाजपकडूनच शिंदे गटाच्या मंत्र्यांवर निधी मिळत नसल्याची तक्रार केली आहे.

# नारायण राणे हा एहसान फरामोश माणूस..

## भास्कर जाधव यांचा घणाघात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी भाजप खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे तथा त्यांचे सुपुत्र नीतेश राणे यांच्यावर तिखट हल्ला चढवला आहे.

नारायण राणे हा एहसान फहामोश अर्थात कृतघ्न असा माणूस आहे. मनसे नेते प्रकाश महाजन यांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. राणे कुटुंबाची चोच नेहमीच नरकात बुडालेली असते, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी नीतेश राणे यांच्यावरही नेपाळी वॉचमन म्हणत निशाणा साधला.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याचे वादग्रस्त त्रिभाषा धोरण रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर राज व उद्धव ठाकरे यांनी 5 जुलै रोजी मुंबईत विजयी मेळावा घेण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर भास्कर जाधव यांनी राणे यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे.




## औषध व्यावसायिकाची ६ लाखांनी फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

औषध विक्री व्यावसायिकाच्या घरून कर्मचाऱ्याने स्वाक्षरी केलेले धनादेश चोरले. बँकेतून 6 लाख रुपये काढून फसवणूक केली. ही घटना पाचपावली ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी विनित विनायक वरघने (35) रा. नवा नकाशा, कमाल चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. जगदीश समर्थ दहीवले (50) रा. वैशालीनगर असे आरोपीचे नाव आहे.

विनित यांचा होलसेल औषध विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे जगदीश 2023 पासून काम करीत होता. लहान दुकानात औषधे पोहोचविण्याची जबाबदारी जगदीशवर होती. तो बँकेचे व्यवहारही करायचा. त्याच्यावर विनित यांचा विश्वास होता. जगदीशचे त्यांच्या घरीही येणे-जाणे होते. दरम्यान 27 नोव्हेंबर 2024 मध्ये जगदीशचा अपघात झाला. त्यामुळे तो घरीच होता. त्याला पैशांची गरज होती. त्याने वेळोवेळी विनित यांना पैसे मागितले. विनित यांनी हिशेब तपासला असता जगदीशकडे 50 हजार रुपये असल्याचे लक्षात आले. विनितने जगदीशला ते पैसे परत मागितले. तेव्हा जगदीशने स्पष्ट नकार दिला. एवढी रक्कम माझ्यावर होऊच शकत नाही, असे त्याने स्पष्ट सांगितले. त्यामुळे विनित यांनी त्याला कामावरून काढले. मे महिन्यात विनित बँकेत पैसे काढण्यासाठी गेले असता जगदीशने त्यांच्या खात्यातून 6 लाख रुपये काढल्याची माहिती मिळाली. विनित यांनी व्यवसायिक कामासाठी आपल्या घरी काही स्वाक्षरी केलेले धनादेश ठेवले होते. कामावरून काढण्याच्या काही दिवसांपूर्वी जगदीश विनितच्या घरी गेला होता. ते धनादेश परस्पर बँकेत वटवून 6 लाख रुपये काढत विनित यांची फसवणूक केली.

# स्त्रियांनी शेतीकडे वळून कुटुंबाचे रक्षण करावे : सौ. कांचन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

माता आणि माती या दोनच गोष्टी नवनिर्मिती करू शकतात. चांगले बियाणे मातीत रुजवल्यास त्याचे फळही चांगले, सुसंस्कारीत आणि विषमुक्त मिळते. त्यामुळे कुटुंबाचा महत्वाचा घटक असलेल्या स्त्रियांनी कुटुंब सांभाळताना शेतीकडे वळावे व परसबागेत तयार झालेल्या विषमुक्त भाजांच्या माध्यमातून कुटुंबाचे रक्षण करावे, असे आवाहन प्रयोगशील शेती करणा-या सामाजिक कार्यकत्या कांचनताई गडकरी यांनी समस्त महिलांना केले.




वसंतराव नाईक प्रतिष्ठान आणि वनराई फाउंडेशनच्या संयुक्त वतीने मंगळवारी कांचन गडकरी यांना ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. सी. डी. मायी यांच्या हस्ते प्रयोगशील शेती पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला. 30 हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. एनरीको हाइट्स कन्व्हेन्शन हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते तर मंचावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरदराव गडाख, माजी आमदार व वसंतराव नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. निलय नाईक, सचिव प्रगती पाटील, पर्यावरणतज्ज्ञ डॉ. अजय पाटील यांची प्रमुख उपस्थित होती.

### नितीनजींकडून मिळते मार्गदर्शन

धापेवाडा येथील शेतीमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात विविध प्रयोग करण्याची संधी मिळत असल्याचे कांचनताई गडकरी म्हणाल्या. आईकडून शेतीचा वारसा, सासूकडून मिळालेली कुटुंबाची साथ, सहका-यांचे सहकार्य यासोबतच पाणी, मृदा आणि वेळेचे योग्य व्यवस्थापन यामुळे विविध प्रयोग करता आले व त्यात यश मिळाले, असे त्यांनी सांगितले. शेतकरी बांधवांना शेतीमधे विविध प्रयोग करण्याची प्रेरणा मिळावी, त्यांचे उत्पन्न वाढावे या उद्देशाने हा पुरस्कार स्वीकारल्याचे सांगत त्यांनी धापेवाडा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान पुरस्काराची राशी प्रदान करण्यात येणार असल्याचे घोषणा केली.

शेतकऱ्यांना दिशा मिळेल डॉ. गडाख

डॉ. शरदराव गडाख यांनी कांचनताईंनी नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात शेतीसाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले. स्कांचन गडकरी यांचे काम समाजाला आणि शेतकऱ्यांना दिशा दाखविणारे ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. गिरीश गांधी यांनी कांचनताई गडकरी या महिला आणि शेतक-यांसाठी प्रेरणादायी उदाहरण असून नागपूर आणि विदर्भाला त्यांचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार काढले. प्रास्ताविकातून ॲड. निलय नाईक यांनी नितीन गडकरी व कांचनताई गडकरी यांच्या कृषी क्षेत्रातील कायार्चा गौरव करताना या दाम्पत्याने वसंतराव नाईक साहेबांचा स्वप्नांची पूर्तता करण्याचे मोठे काम केल्याचे सांगितले.

डॉ. अजय पाटील यांनी कांचनताई गडकरी यांचा परिचय करून दिला. कांचनताईंनी हा पुरस्कार स्वीकारल्यामुळे या पुरस्काराचा मान वाढला असल्याचे ते म्हणाले.

* पुरस्कार राशी धापेवाडा येथील विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानला देणार

* वसंतराव नाईक प्रतिष्ठान व वनराई फाउंडेशनचे आयोजन



### शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी : डॉ. सी. डी. मायी

कृषी क्षेत्रामध्ये हायब्रिड सारखे नवे तंत्रज्ञानसारखे देशात आणणा-या वसंतराव नाईक यांच्या नावाने दिल्या जाणा-या पुरस्कारासाठी कांचनताईंची झालेली निवड अतिशय योग्य आहे. कांचनताईंनी धापेवाडा येथे केलेल्या प्रयोगांतून शेतक-यांनी प्रेरणा घेतली तर या पुरस्काराचे सार्थक होईल, असे डॉ. सी. डी. मायी म्हणाले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रगती पाटील यांनी केले तर आभार बाळ कुळकर्णी यांनी मानले. यावेळी कांचनताईंच्या मोतोश्री, मुलगी केतकी व सुना ऋतुजा व मधुरा यांच्यासह अनिरूद्ध पाटील, हेमंत गांधी, प्रकाश इटनकर, आत्माराम नाईक, डॉ. सुजाता नाईक, सुनील राठोड, शुभांकर पाटील, इसरेल सेठ, दिपाली जाधव, ॲड. वनिता पवार, जयप्रकाश गुप्ता, अनुराधा राठोड, अरुणा जाधव, माधुरी मुंधडा, रुपाली जयस्वाल, चेतना कांबळे, नलिनी पवार, जयश्री राठोड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## डॉ गणेश मुक्कावार यांच्या शेतजमिनीवर अनेकांचे खोटे करार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

डॉ. गणेश मुक्कावार, त्यांचा छोटा भाऊ विष्णुकांत मुक्कावार, मुलगा सुश्रुत मुक्कावार व मुलगी सारिका कोडगिरे नागपूर उमरेड रोडवर खरेदी केलेल्या शेतजमिनीवर पाच ते सहा जणांनी खोटे करारनामे करून त्यांची फसवणूक केली आहे. पोलिसात तक्रार देऊनही न्याय न मिळाल्याने गणेश मुक्कावार यांनी पत्रकार परिषदेत न्यायाची मागणी केली आहे.

मुक्कावार परिवाराने उमरेड नागपूर रोडवर शेतजमीन घेतली तेव्हाच त्यांच्या शेजारी युपकुमार मधुकर पंचबुधे यांचे बांबू संशोधन केंद्र होते. तेव्हाच त्यांनी बांबू लागवडीसाठी शेतजमीन मागितली पण मुक्कावार परिवाराने त्यांना नकार दिला. काही दिवसांनी त्यांच्या फार्म हाऊसवर पंचबुधे यांनी बांबू संशोधन केंद्राचे सामान न विचारता टाकले. या व्यक्तीने या जमिनीचा खोटा करारनामा केल्याची माहिती त्या करारनामाच्या दीड वर्षांनी मिळाली.

यानंतर स्नेहल विटनकर, सुरज ठाकरे, संदीप हर्षे यांनी खोटे करारनामे करून त्यांची फसवणूक केली. अशा प्रकारे मुक्कावार परिवाराची अनेकांनी फसवणूक केली असता त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली पण कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. पत्रकार परिषदेत डॉक्टर गणेश मुक्कावार व त्यांचे भाऊ विष्णुकांत मक्कावर यांनी न्यायाची मागणी केली आहे.

## गाडीचा कट लागल्यावरून घेतला जीव

### जरीपटका हत्याकांडात दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

जरीपटका ठाण्यांतर्गत नारा रोडवर सोमवारी रात्री गुन्हेगारांच्या टोळीने हैदोस घातला. एका हॉटेलमध्ये पार्टी करून मद्यधुंद अवस्थेत निघालेल्या या टोळीने रस्त्यावर दुचाकीचा कट लागल्यावरून एका तरुणाला जबर मारहाण केली. दगडाने मारून रक्तबंबाळ केले आणि फरार झाले. जखमीचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला. स्वप्निल लंकानाथ गोसावी (32) रा. हुडको कॉलनी, जरीपटका असे मृताचे नाव आहे.

पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे. भूपेश सुरेंद्र वंजारी (27) रा. बाराखोली, इंदोरा आणि रवी भोलानाथ बॅनर्जी (27) रा. ओमनगर, कोराडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मुख्य आरोपी सूजल उर्फ ऐमी राजेश म्हैसकर (22), अक्षित अंबादे, सूजल सिंधी आणि अभि सर्व रा. रिपब्लिकननगर, नवीन इंदोरा, हे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, स्वप्निल एका व्यावसायिकाच्या गोदामात सुपरवायझर होता. त्याला पत्नी आणि दोन लहान मुले आहेते. मुख्य आरोपी ऐमी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे आणि त्याच्यावर अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. गतवर्षी पोलिसांनी त्याला शस्त्रासह अटक केली होती. तीन दिवसांपूर्वीच तो कारागृहातून सुटला होता. सोमवारी रात्री ऐमी व त्याच्या साथीदारांनी जरीपटकाच्या सिंध मराठा हॉटेलमध्ये पार्टी केली. रात्री 10.45 वाजताच्या सुमारास मद्यधुंद होऊन आरोपी हॉटेलमधून निघाले. याच दरम्यान स्वप्निल आपले काम आटोपून दुचाकीने घरी जात होता. नारा रोडवर लखन चायनीजसमोर स्वप्निलच्या गाडीचा रवी बॅनर्जीच्या गाडीला कट लागला.

धावत्या वाहनावरच रवीने स्वप्निलच्या कानशिलात लगावली. यामुळे स्वप्निल चिडला. त्याने गाडी थांबवून रवीला मारहाण सुरू केली. इतर आरोपी रवीच्या मदतीला आले. मात्र ते सर्व मिळूनही स्वप्निलला आवरू शकले नाही. त्याच दरम्यान एका आरोपीने रस्त्यावर पडलेला दगड उचलून स्वप्निलला मारला. स्वप्निलचा तोल जाताच ऐमीने त्याच्या डोक्यावर दगडाने वार केले.

## एमपीएससीच्या सदस्यपदी आयजी भुजबळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी नागपूर क्षेत्राचे विशेष आयजी डॉ. दिलीप किसनराव पाटील-भुजबळ यांची लोकसेवा आयोग (एमपीएससी)च्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट सेवापुस्तकामुळे त्यांना एमपीएससी सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



जवळपास तीन वर्षांपर्यंत ग्राम विकास विभागाचे गट विकास अधिकारी म्हणून काम केल्यानंतर 1992 मध्ये भुजबळ यांची महाराष्ट्र पोलिस सेवेत निवड झाली. नाशिकच्या पोलिस अकॅडमीमध्ये प्रोबेशन पूर्ण केल्यानंतर त्यांना पहिली नियुक्ती धुळे येथे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून मिळाली. मुंबईमध्ये दोन वर्षांपर्यंत आरसीपीची प्रमुख राहिल्यानंतर, त्यांना सीआयडीमध्ये कायदा आणि तपास विभागात अधीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले.

भुजबळ हे पुणे आणि नागपूर येथे महामार्ग सुरक्षा विभागाचे प्रमुखही राहिले आहेत. गोंदिया, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यांचे अधीक्षक म्हणून काम केल्यानंतर त्यांना बढती देऊन सीआयडीमध्ये विशेष पोलिस महानिरीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली. जुलै 2024 पासून त्यांना नागपूर रेंजची जबाबदारी देण्यात आली. बीएस्सी ॲग्रीकल्चर पूर्ण केल्यानंतर त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले.

एलएलएम करण्यासोबतच त्यांनी कायद्यात पीएचडी देखील केली. याआधी त्यांना डीजी इन्सिग्निया, नक्षलग्रस्त भागात उत्कृष्ट सेवेसाठी विशेष सेवा पदक, केंद्रीय गृह मंत्रालयाचे अंतर्गत सुरक्षा सेवा पदक मिळाले आहे. ते नेमबाजीतही तज्ज्ञ आहेत.

31 व्या राज्य पोलिस क्रीडा स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदकही मिळवले आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये एसपी म्हणून काम करताना त्यांनी सामाजिक सलोखा राखण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या. त्यांच्या 33 वर्षांच्या निर्दोष सेवेमुळे आणि उत्कृष्ट कायार्मुळे त्यांना एमपीएससीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले.

## २ पिस्तूलांसह डीजेला अटक

**नागपूर** : कपिलनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर एका डिस्क जॉकी (डीजे) ला दोन पिस्तूलांसह अटक केली. चौकशीत तो एका गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मित्राने पिस्तूल त्याच्याकडे ठेवण्यासाठी दिल्याचे सांगत आहे, मात्र पोलिसांना त्याच्यावर विश्वास नाही. त्याचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. मात्र पोलिसांचा दावा आहे की, त्याची अनेक गुन्हेगारांशी मैत्री आहे आणि तो त्यापैकी कोणाला तरी पिस्तूल विकण्यासाठी परिसरात आला होता. राहुल मधुकर साखरकर (30) रा. तारकेश्वरनगर, नारी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. सोमवारी रात्री कपिलनगरचे ठाणेदार सतीश आडे पथकासह ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान उप्पलवाडीच्या सहारे लेआऊट परिसरात एक तरुण कोणाला तरी अग्निशस्त्र विकण्यासाठी आला असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाली.

## घरात घुसून मुलींचे लैंगिक शोषण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

एका मनोविकृत तरुणाने घरात घुसून दोन चिमुकल्या मुलींशी अश्लील चाळे केल्याचा संतापदायक प्रकार मानकापूर ठाण्यांतर्गत गोधनीच्या कोलतेनगर परिसरात घडला. एका घरात घुसताना पीडितेच्या आजीने आरोपीला पाहिल्याने हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला. जवळपास 5 दिवसांपर्यंत कसून शोध घेतल्यानंतर अखेर आरोपी पोलिसांच्या हाती लागला.

श्रवणकुमार शिवराम यादव (25) असे आरोपीचे नाव आहे. श्रवणकुमार हा मुळचा उत्तरप्रदेशातील रहिवासी आहे. तो नागपुरात कॅब चालकाचे काम करतो. गत 27 जूनच्या सकाळी 5 वाजताच्या सुमारास श्रवणने कोलते लेआऊटमध्ये दाराच्या फटीतून हात टाकत एका घराचे दार उघडले. फिर्यादी महिलेची 5 वर्षांची नात बेडरूममध्ये झोपलेली होती. आरोपीने चुपचाप तिला उचलून घराच्या हॉलमध्ये आणले आणि तिच्याशी अश्लील चाळे करू लागला.

मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकून फिर्यादीची झोप उघडली. तिने आरडा-ओरड केली असता आरोपी पळून गेला. आरडा-ओरड ऐकून कुटुंबीय आणि शेजारीही जागे झाले. काही वेळापूर्वी परिसरातीलच आणखी एका घरी असाच प्रकार घडल्याचे समोर आले. दोन्ही घटनांवरून नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. मानकापूर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

### ५५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली

आरोपीला पकडण्यासाठी दोन पथकांचे गठन करण्यात आले. जवळपास 55 ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासल्यानंतर एका फुटेजमध्ये आरोपी दिसला. मात्र फुटेज अस्पष्ट होती. पोलिसांनी आसपासच्या परिसरातील दुकान, घर आणि प्रत्येक गर्दीच्या परिसरांमध्ये आरोपीबाबत विचारपूस केली. एका व्यक्तीने त्याला ओळखले आणि पोलिसांनी त्याला अटक केली. तो गोधनी परिसरातच एका घरी भाड्याने राहतो. पोलिसांनी श्रवणचा मोबाईल तपासला असता घटनेच्या काही वेळापूर्वीच त्याने अश्लील व्हीडिओ पाहिल्याचा खुलासा झाला. पोलिसांनी सांगितले की, तो मनोविकृत आहे.

# देखभाल व दुरुस्तीसाठी काही भागात आज वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

बुधवार, २ जुलै रोजी शहरातील काही भागांमध्ये देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांमुळे वीजपुरवठा बंद राहणार आहे. महावितरणने नागरिकांना सहकार्य करण्याचे आणि गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

या कामांमुळे महाल भागात सकाळी ८:३० ते दुपारी १२ या वेळेत रेशीमबाग आणि सिरसपेठ परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे बंद राहील. येथे रिंग मेन युनिट दुरुस्ती, नियमित देखभालीची कामे आणि सक्करदरा चौकातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे केली जाणारी उपरी वाहिनी काढण्याचे काम केले जाईल. तर सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेतगणेशपेठ, गांधी सागर तलाव परिसर, टिळक पुतळा परिसर आणि गाडीखाना परिसरातील वीजपुरवठा बंद राहील. येथे उच्च दाब वहिनीच्या भूमिगत केबल जोडणीचे व रोहित्र लावण्याचे काम केले जाईल.

याशिवाय, काँग्रेस नगर विभागात सकाळी ८ ते सकाळी ११ या वेळेत ताजेश्वर नगर, चाणक्यपुरम, मानव मंदिर, आम्रपालीनगर, सौभाग्यनगर १ व २ या भागातील वीजपुरवठा बंद राहील. सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत बहादुरा गाव, बाबा ताज नगर, शारदा नगर, शारदा लेआउट, मिलन नगर, अंबिका नगर, राम नगर, मोहित नगर आणि संत गजानन नगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील सकाळी ७:३० ते सकाळी ११ या वेळेत अत्रे लेआउट, गणेश मंदिर, तात्या टोपे नगर, गोपाल भोवरे लेआउट या भागातील वीजपुरवठा बंद राहील. सकाळी ८:३० ते सकाळी ११:३० या वेळेत प्रियदर्शनी नगर, त्रिमूर्ती नगर, भामटी, गुडघे लेआउट, इंगळे लेआउट, राऊत वाडी, जयबद्रीनाथ सोसायटी, शिवशक्ती, सीजीएचएस कॉलनी, मनीष लेआउट, स्वागत सोसायटी, विजय कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्रज्ञा सोसायटी, वहाणे लेआउट, सोमलवाडा चौक, अपना भंडार, सावित्री विहार, श्रीराम नगर अट्टाचक्की, फडणवीस हॉस्पिटल, सोमलवाडा परिसर, जयप्रकाश नगर लेआउट क्रमांक १ ते ५, सीता नगर, राजीव नगर, तपोवन, राहुल नगर, आमराई, गणेश कॉलनी, रेल्वे कॉलनी, रामकृष्णनगर आणि शामनगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील. सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत टिळक नगर आणि धरमपेठच्या काही भागातील वीजपुरवठा बंद राहील. तर, सकाळी ८:३० ते सकाळी १०:३० या वेळेत बजाजनगर येथील वीजपुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत बांगलादेश, नाईक तलाव, तांडापेठ, बंगालीपंजा, पाचपावली आणि ठक्करग्राम येथील वीजपुरवठा बंद राहील. तर, सकाळी 8 ते 11 या वेळेत तेलीपुरा, विनोबा भावे नगर, गंगा बाग, जैन मंदिर रोड या भागातील वीजपुरवठा बंद राहील. नागरिकांनी या वेळेत विजेअभावी होणारी गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक तयारी करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# विकास ठाकरे यांनी घेतला पश्चिम नागपूरच्या ८४ झोपडपट्ट्यांचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

पश्चिम नागपूरचे आमदार तसेच नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. विकास ठाकरे यांनी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची भेट घेऊन पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील ८४ झोपडपट्ट्यांमधील पट्टे वाटपाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीत ठाकरे यांनी झोपडपट्टीवासीयांना हक्काचे पट्टे मिळावेत यासाठी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल विभाग, नागपूर महानगरपालिका (मनपा) आणि नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) यांना त्यांच्या मालकीच्या जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासीयांना तातडीने पट्टे वाटप करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत महसूल, मनपा आणि नासुप्रचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



अधिकृत आकडेवारीनुसार, पश्चिम नागपूरमध्ये एकूण ८४ झोपडपट्टया असून त्यापैकी ११ झोपडपट्ट्यांतील बहुतांश रहिवाशांकडे पट्टे आहेत.

उर्वरित ७३ झोपडपट्ट्यांचे मनपामार्फत सर्वेक्षण पूर्ण झाले असून बहुतेक ठिकाणी प्लेन टेबल सर्व्हे देखील पार पडले आहेत. आ. ठाकरे यांनी म्हटले आहे की, महसूल विभाग, मनपा व नासुप्रच्या मालकीच्या जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासीयांना लवकरच पट्टे देण्यात येतील. झुडपी जंगलातील झोपडपट्ट्यांची स्वतंत्र यादी राज्य सरकारकडे सादर करण्यात येणार असून, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे धोरण ठरविल्यानंतर पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल.

नासुप्रच्या मालकीच्या भूखंडांवरील झोपड्या आणि झुडपी जंगलातील भूभाग यांची अचूक सीमारेषा निश्चित करण्यासाठी नव्याने सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. अंबाझरी आणि पांढराबोडी येथील झोपडपट्ट्यांमध्ये हे सर्वेक्षण सध्या सुरू आहे. यावेळी आ. ठाकरे यांनी मानकापूर येथील राजनगर व सन्त सोसायटीमधील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन एसआरए (स्लम पुनर्विकास प्रकल्प) किंवा पीएमएवाय (प्रधानमंत्री आवास योजना) योजनेंतर्गत करण्याची मागणी केली. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी मनपा आणि नासुप्रला अशा योजनांसाठी आवश्यक जागा शोधण्याचे निर्देश दिले, जेणेकरून या झोपडपट्टीवासीयांसह पश्चिम नागपूरमधील इतर गरजू नागरिकांनाही घरे उपलब्ध करून देता येतील.

## धोबी समाजाला अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी

# एक दिवसीय धरणे आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १ :

काल दिनांक ३० जून २०२५ रोजी धोबी जातीला अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी महाराष्ट्र राज्य धोबी समाज क्रांती विकास मंच आणि धोबी समाजाच्या सर्व संघटनांनी एकत्रितपणे नागपूरच्या संविधान चौकात धोबी समाजाचे ज्येष्ठ नेते राकेश कनोजिया यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसाचे धरणे आंदोलन आयोजित केले होते, ज्यामध्ये महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

अनिता कनोजिया, कमला कनोजिया, नंदिनी सुनारकर, धोबी समाजातील अनेक महिलाचा मोठ्या उत्साहात समावेश होता. ज्येष्ठ समाजसेवक, तेजस संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक जगन्नाथ फाळे, तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील ढोले, कैलास कनोजिया, अनिल शिंदे, कमल कनोजिया, अशोक श्रीवतरी, महेश देशकर, नितिन बिहारी, घनश्याम कनोजिया, सुरेश कनोजे, संजय चौधरी, मुकेश कनोजिया, किशोर कनोजिया, बंडू टेंभेकर, हेमराज तिरपूरकर यांची उपस्थिती होती. महामानव डॉ.भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर नारे लावून. या आंदोलनाला प्रारंभ केला. धोबी समाजाचे शेकडो अनुयायी या धरणा आन्दोलनात उपस्थित होते. राकेश कनोजिया यांनी आपल्या भाषणात सांगितले की, १९६० पासून धोबी समाजाला अनुसूचित जाती मधून काढून ओबीसी (इतर मागासवर्गीय) श्रेणीत समाविष्ट करण्यात आले. धोबी समाजावर हा मोठा अन्याय झाला आणि आजही आमच्या धोबी समाज सरकारकडून आरक्षणासाठी लढत आहे. अनिल शिंदे यांनी पत्रकारांना सांगितले की, २०१२ मध्ये जेव्हा माननीय देवेंद्र फडणवीस साहेब चंद्रकांत हांडोरे यांच्याशी प्राथमिक स्वरूपात धोबी समाजावर झालेल्या अन्यायाबद्दल बोलत होते.

नंतर धोबी समाजासमोर येऊन सांगितले होते की राज्य सरकारकडे डॉ. भांडे समितीचा अहवाल आहे, मग त्यांनी बार्टी समितीचा अहवाल का मागितला, तेव्हा राज्य सरकार आरक्षण देऊ इच्छित नाही होती. आता सध्या मा. देवेंद्र फडणवीस साहेब मुख्यमंत्री आहेत, केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे, आता सरकारने धोबी समाजाला आरक्षण द्यावे. यानंतर धोबी समाजाचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचून देशाच्या पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने निवेदन दिले.

# कळमेश्वर पंचायत समिती येथे कृषीदिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. १ :

कै. मा.माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे जयंती निमित्त राज्यात दरवर्षी कृषी दिन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने आज१ जुलै रोजी पंचायत समिती कार्यालयातील सभागृहात कृषी विभाग पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिन साजरा करण्यात आला.

आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी अंशूजा गराटे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत राऊत मंडळ कृषी अधिकारी, सॉलिडरी डेट कंपनीचे सोलासे, प्रगतशील शेतकरी सुधाकर कुबडे, प्रशांत गुळदे, मिलिंद उमरे आदी सह तालुक्यातील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमादरम्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत राऊत, मंडळ कृषी अधिकारी यांनी केले. यावेळी प्रशांत राऊत यांनी तालुक्यात ८० टक्के पेरणी झाली असून सध्याचे वातावरण पेरणीसाठी अनुकूल असल्याचे सांगितले तसेच विविध योजने अंतर्गत तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली, बोगस बियाणे व खतांच्या विक्रीला आळा घालण्याच्या दृष्टीने तालुक्यात तक्रार सनियंत्रण समितीची स्थापना झाली असून शेतकऱ्यांसाठी खताचा साठा मुबलक असल्याचे राऊत यांनी यावेळी सांगितले. तालुक्यातील प्रगतशील शेतकरी यांनी आपापल्या शेतामध्ये करत असलेल्या नवीन नवीन प्रयोगा बाबतीत आपले मनोगत व्यक्त केले. सॉलिडरी डेड या कंपनीचे सोलासे यांनी नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय शेती या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले.

या दरम्यान पंचायत समिती कृषी अधिकारी विठ्ठल थूल, नंदकिशोर खंडाळ कृषी विस्तार अधिकारी, कृषी विभागाचे उप कृषी अधिकारी विनोद डहाट, युवराज शेवतकर, उज्वल डाखोळे, श्रीकांत मोरे आदीसह कृषी विभागातील सर्व सहायक कृषी अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमा दरम्यान अंशूजा गराटे गटविकास अधिकारी पंचायत समिती कळमेश्वर यांच्या कल्पनेतून आणि मार्गदर्शनातून पंचायत समिती इमारतीच्या सभोवताल परिसरात ऑक्सीजन पार्क निर्माण व्हावा या हेतूने कडुलिंबाचे जवळपास ७० ते ८० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले व त्याची जोपासना करण्याची जबाबदारी पंचायत समिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सोपविण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ कृषी अधिकारी प्रशांत राऊत यांनी तर कार्यक्रमाचे संचालन दीपक जंगले, कृषी विस्तार अधिकारी यांनी केले तर आभार विनोद डहाट उपकृषी अधिकारी यांनी मानले.

## आषाढी एकादशीनिमित्त धापेवाडा ते आदासा सहल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

आषाढी एकादशीनिमित्त मंगलमूर्ती बालउज्ञान मित्र परिवारातर्फे न्यू मनीष नगर येथून धापेवाडा आदासा सहल आयोजित करण्यात आली होती.

धापेवाडा हे विदभार्तील पंढरपूर म्हणून ओळखले जाते तेथील पुरातन मंदिरात प्रवेश केल्यावर साक्षात विठ्ठलाचे दर्शन झाल्याची भावना प्रत्येक भाविकांनी व्यक्त केलेली आहे.

या सहलीमध्ये ५० भक्तांना दीप प्रज्वलित करून महाआरती करण्याचा प्रसाद मिळाला हा क्षण आमच्यासाठी अतिशय अविस्मरणीय आहे अशी प्रत्येक भाविकाची भावना होती ही सहल यशस्वी करण्यासाठी उमेश पटेल धापेवाडा येथील सरपंच मंगला शेट्टी शाल महामंत्री शालिनी बुलवे बुल्ले यांनी प्रयत्न केले.

# बाबू हरीदास आवळे यांची जयंती उत्साहात साजरी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू आणि धम्मदीक्षा सोहळ्याची धुरा चोखपणे सांभाळणारे कर्मवीर बाबू हरीदास आवळे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. समूहघोष सामाजिक संस्थेच्या वतीने कमाल चौकातील हरीदास आवळे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या वतीने स्मृती परिसरात वॉटर कुलरचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. नितीन राऊत, भदंत नागदीपांकर महाथेरो, विनायक जामगडे, समूहघोष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष उमेश बोरकर, सुरेश पाटील, संजय सोमकुंवर, रवि पाटील, दर्शन सहारे, भगवान गजभिये, विलास नितनवरे, संजय फुलझेले, सुनील शेंडे, बुद्धीवान सुखदेवे, संपत वंजारी, ईश्वर सूर्यवंशी, बाळू कोसमकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये सौर उर्जा जनजागृती अभियान



■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १ :

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत सोलर सोसायटी ऑफ इंडिया आणि विवा कॉलेज, विरार यांच्या सहकार्याने ५५५५५ तरुणांना 'सौर ऊर्जा जनजागृती अभियान २०२५' प्रशिक्षण उपक्रम सार्वजनिकरीत्या ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने यशस्वीपणे राबविण्यात आला.

या अभियानात महाविद्यालयातील सर्व शाखांमधून एकूण २११२ शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या अभियानातून सौर उजेर्चे फायदे, विविध प्रकार, प्रकल्प, विश्वासाहर्ता, मुबलकता, उपलब्धता याबाबत ची सविस्तर माहिती द्दक्श्राव्य साधनाच्या माध्यमातून देण्यात आली.

करिअर कट्टाच्या वतीने प्राचार्या डॉ.दीपा पान्हेकर, सर्व शाखांचे उपप्राचार्य व विभागप्रमुख, करिअर संसद प्रतिनिधी, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग तसेच विद्यार्थ्यांच्या सहकायार्तून अभियान प्रत्यक्षपणे अमलात आले. करिअर कट्टा समन्वयक डॉ. विद्या चौरपगार व प्रा. विठ्ठल बोंदर, अभिषेक भुते, अंश भुते, तनुश्री चौरपगार, हर्ष गणवीर इत्यादींनी अभियान यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. या उपक्रमास परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती चे अध्यक्ष भन्ते नागार्जुन सुरई ससाई, सचिव सुधीर फुलझेले व मान्यवर सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रस्तुत अभियान राबविण्यासाठी यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र), किरण पाटील,प्राचार्या डॉ. शरयू तायवाडे (विभागीय प्राचार्य प्रवर्तक), प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे (प्राचार्य प्रवर्तक), प्रा. डॉ. नरेंद्र रघटाटे (विभागीय समन्वयक),प्रा.वर्षा वैद्य (सहविभागीय समन्वयक) एस डी. देशभ्रतार (विभागीय समन्वयक) डॉ. श्रीराम फरताडे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 2,511 वाहन चालकांवर कारवाई करून 4,40,800 रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 4 व एनडीपीएस अन्वये 1 अशा 5 प्रकरणात 5 आरोपींवर कारवाई करून 5,975 रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 3 प्रकरणात 12 जुगाऱ्यांना अटक करून 76,160 रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

# तडीपार गुंड सैफ अलीला अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. १ :

गुन्हे शाखा युनिट 3च्या पथकाने लकडगंज ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून एका तडीपार गुंडाला अटक केली. सैफ अली उर्फ शेखू अख्तर अली (24) रा. इतवारी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शेखू हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. परिसरात त्याची दहशत निर्माण होताना पाहून परिमंडळ क्र. 3च्या उपायुक्तांनी त्याला याच वर्षी मे महिन्यात एक वर्षासाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. सोमवारी सायंकाळी 4.30 वाजताच्या सुमारास युनिट 3 चे पथक लकडगंज ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. इतवारीच्या मालधक्का परिसरातील रॉयल अपार्टमेंटजवळ एक तरुण संशयास्पदरित्या आढळला. पोलिसांनी त्याला आवाज दिला असता त्याने पळ काढला. पथकाने पाठलाग करून त्याला पकडले. त्याला अटक करून त्याच्याविरुद्ध लकडगंज ठाण्यात मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला.

# भाऊ...रात्री बेरात्री विजेचा लपंडाव.. सांगा कसं करावे..?

## धानला परिसरात अनेक भाग अंधारात, विद्युत विभागाचे दुर्लक्ष



■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १ :

मौदा शहरासह ग्रामीण भागांत गेले काही दिवस रात्रभर वीज गायब राहण्याच्या घटना वाढल्या असून, त्यामुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. विशेषतः रात्री झोपताना विजेचा अडथळा निर्माण होण्यामुळे लहान मुलं, वृद्धआणि रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. यावर विद्युत विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागात दररोज वेळेच्या अवेळी कोणत्याही वेळेवर लाईट जाण्याचा प्रकार सुरू असून, अनेक भागांत ती पहाटेपर्यंत येत नाही. यामुळे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र शासकीय रुग्ण, वयोवृद्ध नागरिक, आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

धानला परिसरात अनेक दिवसांपासून कोणतेही कारण नसतांना किंवा कारण समोर करून कोणत्याही वेळेवर वीज गायब राहते. अनेक शेतकऱ्यांचे पाणीपुरवठा करणारे मोटारपंप ठप्प पडत आहेत, त्यामुळे शेतीचे नुकसानही वाढले आहे.

धानला परिसरात व तालुक्यात ग्रामीण भागांतील नागरी भागांमध्ये देखील दिवसा किंव्हा रात्रीच्या वेळी कधी कधी तर रात्रभर लाईट नसल्यामुळे कुटुंबातील सदस्यांनी उकाड्यात झोपणे अशक्य झाले आहे. काही भागांत विद्युत खांब व तारा मोडकळीस आल्याने तांत्रिक बिघाड कायम आहे. तालुक्यात ग्रामीण भागांत वीज विभागाचे कर्मचारी उशिरा प्रतिसाद देतात. एखाद्या वेळी रात्री वीज गेल्यास रात्र रात्र भर वीज येत नाही, किंव्हा दुसऱ्या दिवशीच दुरुस्ती होते, असे अनेक नागरिकांनी सांगितले. तालुक्यातील येथील स्थानिक रहिवासी यांनी सांगितले, 'आमच्या भागात दररोज रात्री लाईट जाते, पंखा, फ्रीज, सगळं बंद होते. मुलं झोपत नाही. वीज विभाग काहीच ऐकत नाही. सोबतच' परिसरातील शेतकरी बांधवांनी 'रात्रभर लाईट नसते, त्यामुळे सिंचन करणे अशक्य होते. पिके कोमेजत आहेत. प्रशासन काही करत नसल्याचेही ओरड आहे.

### वीज विभागाचे दुर्लक्ष ?

नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही वीज वितरण विभाग याकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाही. विद्युत यंत्रणा जुनाट असल्याचा आणि देखभाल वेळेवर न केल्याचा आरोप होत आहे. यावर वीज वितरण विभागाचे अधिकृत वक्तव्य अद्याप मिळालेले नाही. रात्रभर लाईट जाणे ही केवळ असुविधा नाही, तर सामान्य जनतेच्या आरोग्य, शिक्षण व शेतीशी संबंधित मोठा प्रश्न झाला आहे. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी तालुक्यातील ग्रामीण भागातून होत आहे.

## पिस्तुल बाळगणाऱ्या तरुणास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

पिस्तुल आणि देशी कट्टा घेऊन फिरणाऱ्या एका तरुणाला कपिलनगर पोलिसांनी अटक करून त्याच्या ताब्यातून दोन्ही अग्नीशस्त्र जप्त केले. राहुल मधुकर साखरकर (30) तारकेश्वरनगर, नारी असे आरोपीचे नाव आहे.

सोमवारी सायंकाळी कपिलनगर पोलिस पॅट्रोलिंग करीत होते. त्यावेळी राहुल हा सहारे ले आऊट येथील पेट्रोलपंपजवळील मोकळ्या जागेत अग्नीशस्त्र विकायला येत आहे अशी माहिती खबऱ्याने पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी सहारे ले आऊट येथे सापळा रचला. रात्री सव्वाअकराच्या सुमारास राहुल घटनास्थळी आला असता दबा धरून बसलेल्या पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहून राहुलने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ पिस्तुल आणि देशी कट्टा मिळून आला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून राहुल यास अटक केली.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ३४ प्रकरणांची नोंद




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता.01) मंगळवार रोजी शोध पथकाने 34 प्रकरणांची नोंद करून 43,300/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 24 प्रकरणांची नोंद करून 9,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 100/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 05 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 4,000/-रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 05 प्रकरणांची नोंद करून 13,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 08 प्रकरणांची नोंद करून 1,600/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

## बळजबरीने प्रिपेड मीटर लावणे बंद करा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

वीज ग्राहकांना पूर्वसूचना न देता महावितरण कंपनीद्वारे बळजबरीने स्मार्ट प्रिपेड मीटर लावल्या जात आहे. नागपूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना न्याय मिळावा,यासाठी विदर्भ राज्य आंदोलन समिती तर्फे व्हेरायटी चौकात नारे निदर्शने देण्यात आली. यावेळी विदर्भ राज्य आंदोलन समिती युवा आघाडीचे अध्यक्ष मुकेश गुलाबराव धांडे, अमूल साकुरे, गिरीश तितरमारे, हरिभाऊ पानबुडे, राहुल बनसोड, गणेश शर्मा, योगिता आगासे, अण्णाजी राजेधर, रवींद्र भामोडे, रामेश्वर मोहबे, चंद्रशेखर पुरी,संगीता उके, राजेंद्र सतई, युसूफ खान, तारेश दुरुगकर, संजय सूर्यवंशी, राज यादव, शाहिद अली, नीलकंठ अंभोरे, मधुकर बालपांडे यांच्यासह अनेक आंदोलक उपस्थित होते.

### जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री सुरेश वाघचौरे, तालुका दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी

रा.मा.क्रं. / जन्म-मृत्यु. नोंद/२०२४-२५
मौजा टेकाडी (को.ख), सा.क्रं.१४
ता. पारशिवनी, जि. नागपूर

मौजा- टेकाडी (को.ख), तह. पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार करण गंगाप्रसाद सिंह, राह. टेकाडी (को.ख), तह. पारशिवनी, जि. नागपूर यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे स्वःताचे नावे करण गंगाप्रसाद सिंह याचा जन्म दिनांक ०६/०६/२००७ रोजी मोजा टेकाडी (को.ख.) येथे झाली असून त्याची जन्माची नोद ग्रामपंचाय, टेकाडी (को.ख.) ता.पारशिवनी, जि. नागपूर येथे जन्माची नोंद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना त्यांच्या नावाची जन्माची नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी एक महिना पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक /०५/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

(सुरेश वाघचौरे)
तालुका दंडाधिकारी, पारशिवनी

### जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री सुरेश वाघचौरे, तालुका दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी

रा.मा.क्र. / जन्म-मृत्यू. नोंद/२०२४-२५
मौजा पारशिवनी, सा.क्रं.११
ता. पारशिवनी, जि. नागपूर

मौजा पारशिवनी, तह. पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री मधुकर दत्तुजी रायपुरकर, राह.पारशिवनी, तह. पारशिवनी, जि. नागपूर यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे स्वःताचे नावे मधुकर दत्तुजी रायपुरकर याचा जन्म दिनांक ०२/०४/१९६५ रोजी मौजा-पारशिवनी येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करून नगर पंचायत, पारशिवनी ता. पारशिवनी, जि. नागपूर येथे जन्माची नोंद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना त्यांच्या नावाची जन्माची नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी एक महिना पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

(सुरेश वाघचौरे)
तालुका दंडाधिकारी, पारशिवनी

### जाहिरनामा

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
प्र.क्र.२३/प्रस्तु-३/तह. नाग (शहर)/कावि - २७६/२०२५
दिनांक : ०६/०६/२०२५

वाचा :- १) सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २) मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५. ३) मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४) अर्जदार श्री/श्रीमती आयुष अनिलकुमार पांडे, वय १८ वर्षे राह. सुरेंद्र गड सुमीत किराना स्टोर्स गिट्टीखदान, नागपूर. यांचा अर्ज दिनांक १३/०५/२०२५

ज्याअर्थी अर्जदार आयुष अनिलकुमार पांडे, वय १८ वर्षे राह. सुरेंद्र गड सुमीत किराना स्टोर्स गिट्टीखदान, नागपूर, यांनी वडीलाचे जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदाराचे वडील नामे अनिलकुमार राजमणी पांडे यांचा जन्म दिनांक १०/०३/१९८४ रोजी घरी सुरेंद्र गड गिट्टीखदान नागपर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्म बाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता

### जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी जि. नागपुर

एम.जे.सी : ७६३/२०२५ पे. ता. २५/०७/२०२५
प्रोसेस नं. ७५७/२०२५ (२३/०६/२०२५)

Applicants : 1 Suresh So Deorao Chinchulkar, Aged 50 Years, Occu. Labour,
2. Ramesh s/o Deorao Chinchulkar, Aged 47 Years, Occu Labour,
3. Dinesh S/o Deorao Chinchulkar, Aged 43 Years, Occu. Labour,
4. Smt. Mangla w/o Ramuji Mojankar. Aged 39 Years, Occu Labour
5. Ganesh S/o Deorao Chinchulkar, Aged 38 Years, Occu. Labour,
All Warada, Tah. Parseoni, Distt.Nagpur
---- V/S ----
Non applicant : Nil

मयत - Late Deorao s/o Jangluji Chinchulkar,, मयत दि.०२/०२/२०२४, ठिकाण - वराडा Late Smt. Kamlabai w/o Deorao Chinchulkar, मयत दि.०७/१०/२०२१. ठिकाण - वराडा

सदरहू अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Deorao s/o Jangluji Chinchulkar, मयत दि.०२/०२/२०२४ Late Smt. Kamlabai w/o Deorao Chinchulkar, मयत दि ०७/१०/२०२१, यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. २५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकाना व आम जनतेस कळविण्यात येते की जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारांना Late Deorao s/o Jangluji Chinchulkar, and Late Smt. Kamlabai w/o Deorao Chinchulkar, याचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक / / २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

### जाहीरनामा (सायटेशन नोटीस)

कोर्ट विद्यमान श्री. सुरज जे. लाड साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, भिवापूर

एम. जे. केस कमांक : ०८/२०२५ पे. ता. १६/०६/२०२५

अर्जदार : १. श्री दिपक वामनराव गोजे-भाऊ वय - ६५ वर्षे, धंदा - रोजमजुरी,
रा. भिवापूर, त. भिवापूर, जि. नागपूर ह. मु. वार्ड नं. १, गजानन नगर, पिपरी वर्धा, तह जि. वर्धा.
२. श्री. अनिल वामनराव गोजे - भाऊ, वय - ६२ वर्षे, धंदा - रोजमंजुरी,
रा. इंद्रानगर, नरसाळा रोड, जुनघरे आटा चक्कीजवळ, नागपूर. त. जि. नागपूर ४४००३१
३. श्री. अविनाश वामनराव गोजे - भाऊ, वय ५० वर्षे, धंदा - रोजमजुरी,
४. श्री. शिरीष वामनराव गोजे - भाऊ, वय - ४८ वर्षे, धंदा - रोजमजुरी,
५. सौ. अल्का दिलीपराव निळे - बहीण, वय - ५७ वर्षे, बंदा - रोजमजुरी,
वरील ३, ४, ५ रा. वार्ड नं. ६, आझाद चौक, भिवापूर, त. भिवापूर, जि. नागपूर.
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मतदार : मयत- प्रमोद वामनराव गोजे, रा. वार्ड नं. ६, आजाद चौक, भिवापूर ता. भिवापूर जि. नागपूर

ज्यापेक्षा मयत - प्रमोद वामनराव गोजे, रा. वार्ड नं. ६, आजाद चौक, भिवापूर, तह भिवापुर, जि. नागपुर हे दिनांक २५/०२/२०२५ आशा हॉस्पीटल, कामठी, जि. नागपुर येथे मयत झाले आणि वरील अर्जदार यानी हया कोर्टास सदरहू मयत- प्रमोद वामनराव गोजे, याचे वारसान प्रमाणपत्र (Legal heirship Certificate ) मिळण्याकरीता मुंबई नियमन, १८२७ चे कलम २ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहू मयताचे वारसान नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पेशी तारखेवर त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकंती कळवाव्या आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पूरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत-प्रमोद वामनराव गोजे, यांचे वारसान प्रमाणपत्र (Legal heirship Certificate ) देईल

आज दिनांक ०३/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भिवापूर

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या पुढाकाराने स्टार बस लोकल सेवेचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १ :



वाडी शहरातील नागरिकांसाठी एक महत्त्वाची सुविधा म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघ वाडी शहराच्या पुढाकाराने स्टार बस लोकल सेवा सुरु करण्यात आली असून, तिचा उद्घाटन समारंभ मंगळवार १ जुलै रोजी दुपारी १२ वाजता रामकृष्ण सभागृह, दत्तवाडी येथे उत्साहात पार पडला.

ही लोकल बस सेवा सीताबर्डी ते संतोषी नगर या मार्गावर सुरु करण्यात आली आहे. बस थांबे सीताबर्डी, जोशी दवाखाना, शाहू ले-आऊट गार्डन, स्मृती ले-आऊट गार्डन, एंजल स्किट स्कूल, रामकृष्ण सभागृह, अभिजित नगर, चव्हाण पब्लिक स्कूल, महादेव नगर, सरोजिनी स्कूल, आणि शेवटचा थांबा संतोषी नगर असा राहील

या सेवेची पहिली प्रवासी म्हणून महादेव नगर येथील अंगणवाडी शिक्षिका लीला रमेश बागडे यांनी तिकीट काढून गौरव मिळविला. यावेळी पूजा हुसनापुरे, सुजाता गायकवाड, संगीता फ्रान्सिस, दुर्गा आवारे, शिल्पा कुरटकर, हर्षा वसुले, प्रिया मातुरकर, जयश्री मोहोळ, राखी रांगडाले, सविता सुरजुसे, सुरेंद्र मोरे उपस्थित होते.

या बस सेवेच्या उपलब्धतेसाठी विशेष प्रयत्न नागपूर तालुका अध्यक्ष अमित हुसनापुरे, कमल कनोजे, मोहन ठाकरे, जोसेफ फ्रान्सिस, विशाल जाधव, सागर वर्मा, अजय पाटणे, निकेश गायकवाड, रमेश धोटे, निळकंठ सावरकर, वासुदेव कुरटकर, चंद्रशेखर देशभ्रतार, शिवम राजे, अरुण तट्टे, राजेंद्र पवार, रवींद्र सुरजुसे, रोशन काकडे, निखिल गायकवाड, सुनील पाटील, अखिल गायकवाड, सौरभ गडीकर, पवन मिश्रा ,पंडित, कृष्णा ऊके, शशिकांत देशमुख, संदीप रायजादे, धनराज लांडगे, विक्रम तिजारे, बापू लिमकर, अमित गुप्ता, राजू विश्वकर्मा, प्रमोद विश्वकर्मा, अरुण गवळी, रामश्री यादव, मोहम्मद शाहीर, उमेश बुलबुले, प्रशांत माल्लेर, अशोक नांदणे, रामदास नांदणे, रघु भगत, तानसेन सोनवणे, लक्ष्मण जावळे यांचा मोलाचा वाटा आहे.

ही लोकल बस सेवा वाडीवासीयासाठी एक मोठा दिलासा ठरणार असून, विशेषतः वाडी परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी सोयीची आणि किफायतशीर सेवा उपलब्ध झाली आहे.

## ५ गोवंशांची तस्करी

**नागपूर** : कळमना पोलिसांनी गस्तीदरम्यान गोवंशांची कत्तलीसाठी तस्करी करणारे वाहन पकडले. दोन आरोपींना अटक करून 7 गोवंशांचे प्राण वाचवले. पंकज विनोद सिरसवार (37) आणि तुषार सुधीर फुलसुंगे (25) दोन्ही रा. गवळीपुरा, धरमपेठ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

सोमवारी सकाळी कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान पारडी-एचबी टाऊन पुलावर एमएच-31/ईएन-0319 क्रमाकांच्या मालवाहूत गोवंशांना डांबून तस्करी होत असल्याची माहिती नियंत्रण कक्षातून मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून वरील क्रमांकाचे वाहन थांबविले. झडतीमध्ये 7 गोवंश मिळाले. त्यांना निदर्यतेने कोंबण्यात आले होते. त्यांच्यासाठी चारा आणि पाण्याचीही व्यवस्था नव्हती. पोलिसांनी पंकज आणि सुधीरला गोवंशांची वाहतूक करण्यासाठी वैध कागदपत्र मागितले.

# निशा खडसे यांचा विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या वतीने सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १ :



कळमेश्वर पासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या धापेवाडा सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय जनता पार्टीच्या माजी तालुका महिला अध्यक्ष गेल्या पंधरा वषार्पासून सक्रियतेने सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्य करीत असतात मागील वर्षी त्या धापेवाडा ग्रामपंचायत सरपंच पदाकरता भारतीय जनता पक्षानेउभ्या केलेल्या उमेदवार परंतु त्यांचा पराभव झाला होता.

परंतु मनामध्ये जिद्द काम करण्याची तीव्र इच्छा लोकांसोबत दांडगा संपर्क त्यांचा दांडगा अनुभव त्यामुळे त्यांनी अनेक क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला अनेक धार्मिक सामाजिक व सांस्कृतिक संस्थेमध्ये संघटनेमध्ये त्यांनी कार्य केलेले आहे त्या प्रथम विदर्भ शाहीर कलाकार परिषद मध्ये त्या केंद्रीय सदस्य होत्या.

त्यानंतर अनेक संघटनेत त्यांनी कार्य केले हल्ली त्या ज्ञानगंगा या संस्थेच्या सचिव आहेत आणि त्या माध्यमातून संपूर्ण नागपूर जिल्ह्यामध्ये मेळाव्याच्या माध्यमातून कलावंताच्या मनामध्ये आपले नाव त्यांनी कमावलेला आहे. म्हणून म्हणून भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य डॉक्टर राजीव पोद्दार, दिलीप धोटे यांच्या माध्यमातून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत मानधन समितीवर त्यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

त्यामुळे विदर्भ शाहीर कलाकार परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष मनीजी भिवगडे, कार्याध्यक्ष अलंकार टेंभुर्णे, विदर्भ प्रचार प्रमुख युवराज, मेश्राम जिल्हा सरचिटणीस अरुण वाहने, जिल्हा प्रवक्ता गंगाधर नागपुरे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेवराव ठाकरे यांनी निशाताई खडसे व बाबा दुपारे यांचा सत्कार त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## शासकीय गोदामात सुविधा उपलब्ध व्हाव्यात भाजपाकडुन एसडीओंना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १ :

शासकीय धान्य गोदाम रेल्वे स्टेशन शितलवाडी येथे विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, याकरिता भाजप शिष्टमंडळाच्या वतीने उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने शासकीय धान्य गोदाम परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे, परिसरात विद्युत लाईट कंपाऊंड वॉल, हमाल कामगारांसाठी शौचालय, मुतारी बांधकाम करणे, अल्प दरात जेवणाची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्यासाठी बोरवेल व आरो मशीन लावण्यात यावे, कामगारांना विमा व इतर शासकीय सुविधा मिळाव्या, अशा विविध मागण्यांचे निवेदन पंचायत समितीचे माजी सभापती नरेंद्र बंधाटे, कामगार आघाडीचे अध्यक्ष मुलचंद यादव, इंजिनियर सेलचे जिल्हा अध्यक्ष विवेक तोतडे, भाजप नेते तेजपाल सोलंकी, लक्ष्मण केने, सागर गावंडे, अश्विन कावळे, माजी उपसरपंच आशिष भोगे, सुधाकर लेंडे यांनी यावेळी दिले.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे मंगळवार विनम्र अभिवादन करण्यात आले.

मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित कार्यक्रमात मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.

याप्रसंगी मनपाच्या उपायुक्त विजया बनकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, प्रजनन व बालकल्याण अधिकारी डॉ. सरला लाड, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे रोहिदास राठोड, अर्जुन मुडे, अविनाश जाधव, अनिल राठोड, गजानन जाधव अनिल चव्हाण धनंजय जाधव, विनोद राठोड विनोद डोंगरे, शैलेश जांभुळकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कृषी दिनानिमित्त रॅली व वृक्षारोपण



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १ :

नागपूर तालुक्यातील चिचोली येथे कृषी दिनानिमित्त कृषी महाविद्यालय, नागपूर येथील 'रावे' उपक्रमांतर्गत जनजागृती रॅली व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन सरपंच गुणवंत घोरमाडे यांच्या अध्यक्षतेखाली पोलिस पाटील नरेंद्र घोरमाडे, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक राऊत, देशभ्रतार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी गावात रॅली काढून शेतीविषयक माहिती व पर्यावरणाचे महत्त्व याबाबत जनजागृती केली. तसेच गावात विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

ग्रामस्थांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी कृषी विद्यालय नागपूरचे प्रा. डॉ. पुष्कर वानखेडे व डॉ. सीमा ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

## निधन

### भारती पितांबरे



■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १ :

ओगले रोड, महाल येथील रहिवारी भारती पितांबरे (टाकळखेडे) यांचे १ जुलै २०२५ रोजी हृदयविकाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी व बराच आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २ जुलै रोजी सकाळी ९.३० वा. मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### मधुकर इंगळे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

मधुकर टेटूजी इंगळे यांचे आजाराने मेडिकलमध्ये निधन झाले. लोककल्याण सोसायटी, नवीननगर, पारडी येथे ते रहात होते. गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार पार पडला.

## सामूहिक अभंग भजन स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :



आमदार सांस्कृतिक महोत्सव समिती मध्य नागपूर द्वारे आमदार प्रवीण दटके यांच्या संकल्पनेतून निर्मित मध्य नागपूरातील उत्साही भजनी मंडळांसाठी आषाढी एकादशीच्या शुभपर्वावर सामूहिक अभंग गायन स्पर्धेचे आयोजन ४ जुलै रोजी शिक्षक सहकारी बँक सभागृह, गांधीसागर महाल येथे सकाळी ८ ते रात्री ९ पर्यंत आयोजित असून स्पर्धेचे उद्घाटन भागवतभूषण सौ मोहिनी देवपुजारी यांचे हस्ते होणार आहे.

या स्पर्धेत जवळपास मध्य नागपुरातील १३७ भजनी मंडळांनी सहभाग घेतला असून त्यामधील ११ उत्तम विजेत्यां भजनी मंडळांची महाअंतिम फेरी शनिवार ५ जुलै रोजी दुपारी १ ते ४ पर्यंत होणार असून संध्या ५ वाजता बक्षीस वितरण ह. भ. प आदरणीय श्रीरामपंत जोशी महाराज आणि खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष अनिल सोले यांचे हस्ते तसेच मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके, भाजपा नागपूर महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, कबीर मठाचे महंत मुनिंद्रनाथ महाराज, महाराष्ट्र प्रदेश ओबीसी महामंत्री अर्चना डेहनकर, भाजयुमो प्रदेश महामंत्री शिवानी दाणी वखरे, तसेच मंडळ अध्यक्ष सुनीलजी बालपांडे, श्याम चांदेकर, अनिलजी मानापुरे आदी मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत संपन्न होईल.

या सामूहिक अभंग गायन स्पर्धेत भजनी मंडळांना विठ्ठलाचा एक अभंग आणि १ विठ्ठलाचे भक्तीगीत, गवळण किवा भारूड अशी २ गीत ८ मिनिटांच्या आत सादर करायची आहेत. सामूहिक अभंग गायन स्पर्धेत विजेत्या भजनी मंडळाना भव्य ११ रोख पुरस्कार व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येईल. या स्पधेर्ची संकल्पना आमदार प्रवीण दटके यांची आहे. स्पधेर्चे यशस्वितेसाठी आमदार सांस्कृतिक महोत्सव समिती तर्फे डॉ श्रीरंग वराडपांडे, रेखा निमजे, कविता इंगळे, श्वेता निकम भोसले, सारिका नांदूरकर, अनिता काशीकर, गीता पार्डीकर, निकिता पराये, दिपाली नंदनवार, रजनी जैन, कल्पना मानापुरे सविता उमाठे आणि समस्त पदाधिकारी कार्यरत असून नागरिकांनी आषाढी निमित्त होणाऱ्या विठ्ठल भक्तीच्या जागरात उपस्थित राहून भजनी मंडळांचा उत्साह वाढवावा.

# एमएसएमई महोत्सवाचे यशस्वी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :



एमएसएमईला वाढीसाठी एक मजबूत आणि चैतन्यशील परिसंस्थेची आवश्यकता आहे. एमएसएमई आणि स्टार्टअप्स समितीच्या अंतर्गत आयसीएआय नागपूर शाखेने (डब्ल्यूआयआरसी) धंतोली येथील आयसीएआय भवन येथे "एक दिन एमएसएमई के नाम" या थीमवर एमएसएमई महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात एमएसएमई आणि स्टार्टअप परिसंस्थेतील व्यावसायिक, उद्योजक आणि भागधारकांचा उत्साही सहभाग दिसून आला. अध्यक्ष सीए दिनेश राठी यांनी मान्यवरांचे स्वागत केले आणि समावेशक वाढ आणि रोजगाराचे इंजिन म्हणून एमएसएमईचे महत्त्व अधोरेखित केले. ज्ञान-वाटप उपक्रमांद्वारे एमएसएमई क्षेत्राला सक्षम बनवण्याच्या शाखेच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला. प्रमुख पाहुणे सीए जुल्फेश शाह, माजी उपाध्यक्ष, डब्ल्यूआयआरसी यांनी उद्योजकता आणि आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी आयसीएआयच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी एमएसएमई क्षेत्रातील चार्टर्ड अकाउंटंट्ससाठी वाढत्या संधी आणि जटिल नियामक आणि आर्थिक लँडस्केपमधून व्यवसायांना मार्गदर्शन करण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका यावर प्रकाश टाकला. मुख्य वक्ते महाराष्ट्र सरकारचे उद्योग सहसंचालक गजेंद्र भारती यांनी एमएसएमईसाठी मजबूत स्थानिकीकृत परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी लॉजिस्टिक्स धोरण, निर्यात प्रोत्साहन धोरण, संरक्षण उत्पादन जोर, स्क्रॅप रिसायकलिंग धोरण आणि आगामी महाराष्ट्र एमएसएमई धोरण यासारख्या प्रमुख सरकारी उपक्रमांची माहिती दिली.

अतिथी जय नारायण, झोनल मॅनेजर, बँक ऑफ इंडिया, नागपूर यांनी बँकिंग क्षेत्राकडून सतत पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. "आमच्याकडे नवीन उद्योजक आणा आणि आम्ही त्यांना वाढीसाठी आवश्यक असलेली मदत मिळवून देऊ," असे त्यांनी सांगितले. सीए सतीश सारडा यांनी एमएसएमई समाधान आणि विलंबित देयकांच्या वसुलीवर चर्चा केली. सीए यशवंत भोजवानी यांनी एमएसएमईसाठी सरकारी योजना सुलभ करण्यावर चर्चा केली.सीए नेहा कांदळकर यांनी बँकिंग वित्त धोरणे आणि कर्ज तयारी यावर चर्चा केली.कार्यक्रमाचे समन्वय सीए तृप्ती भट्टड, कोषाध्यक्ष यांनी केले. उपाध्यक्ष सीए स्वरूपा वाझलवार, विकासा अध्यक्ष सीए विनोद अग्रवाल, माजी अध्यक्ष सीए उमंग अग्रवाल आणि सदस्य सीए प्रतीक पालन, सीए आनंद खंडेलवाल, सीए राजेश काबरा उपस्थित होते.

## मार्गदर्शन शिबीर

**नागपूर** : नागपूर गार्डन क्लबतर्फे मूलभूत बागकाम कोर्स ०७/०७/२०२५ ते १३/०७/२०२५ या कालावधीत क्लबच्या परिसरात साय. ५:३० ते ७:३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये बागकामाची मूलतत्त्वे शिकवली जातील हंगाम व जागेनुसार झाडांची निवड,कुंड्यांची निवड कशी करावी हे यामध्ये समाविष्ट आहे.

# राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाद्वारे सांख्यिकी दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :




२९ जून २०२५ (रविवार) रोजी, भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर भारतातील आर्थिक नियोजन आणि सांख्यिकी विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल प्राध्यापक (दिवंगत) प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय स्तरावर सांख्यिकी दिन साजरा केला. मुख्यालयाच्या निर्देशानुसार, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांनी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, घरगुती सर्वेक्षण युनिट (एचएसयू), नागपूर यांच्या सहकार्याने संयुक्तपणे सकाळी १०:०० वाजता प्रशिक्षण सभागृह, इंडियन ब्युरो ऑफ माइन्स, इंदिरा भवन, तिसरा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे मोठ्या उत्साहात सांख्यिकी दिन साजरा केला.

माजी महासंचालक शालिनी भोयर आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे माजी अपर महासंचालक टी. के. बसू यांनी प्राध्यापक (दिवंगत) पी. सी. महालनोबिस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि औपचारिक दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

आपल्या स्वागत भाषणात, नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयातील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (फील्ड ऑपरेशन्स डिव्हिजन) चे संचालक रंगा श्रीनिवासुलु यांनी सांगितले की, २९ जून २००७ पासून सांख्यिकी दिन हा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून साजरा केला जात आहे. १९ व्या सांख्यिकी दिनाची थीम "राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणांची ७५ वर्षे" होती. त्यांनी प्राध्यापक महालनोबिस यांचे भारतीय सांख्यिकीमधील महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित केले आणि उपस्थित विद्यार्थ्यांना सांख्यिकीमध्ये करिअर करण्याचा विचार करण्याचे आणि देशासाठी, विशेषतः आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधा यासारख्या क्षेत्रात योगदान देण्याचे आवाहन केले.

प्रगतीचे निरीक्षण करण्यात, ट्रेंड आणि असमानता ओळखण्यात आणि भविष्यातील गरजांचा अंदाज घेण्यासाठी मॉडेल विकसित करण्यात डेटा महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो यावरही त्यांनी भर दिला. एनएसओच्या घरगुती सर्वेक्षण युनिट (एचएसयू) चे संचालक ए. एस. एन. एम. राव यांनी माहिती दिली की, भारत सरकारने आर्थिक नियोजन आणि सांख्यिकी विकासात प्राध्यापक महालनोबिस यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ दरवर्षी "सांख्यिकी दिन" साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या समवयस्कांमध्ये आणि देशातील तरुणांमध्ये एनएसएसओबद्दल जागरूकता निर्माण करण्यास प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे आणि एनएसओचे माजी अपर महासंचालक टी. के. बसू यांनी सांगितले की, एनएसएस (नॅशनल सॅम्पल सर्व्हे) १९५० मध्ये अस्तित्वात आला आणि कोणीही कल्पनाही केली नव्हती की ते इतके दिवस भारतीय जनते सेवा करत राहील. ते म्हणाले की एनएसएस आता भारतात आणि परदेशातही एक ओळखला जाणारा ब्रँड बनला आहे आणि कालांतराने तो लक्षणीयरीत्या विकसित झाला आहे.

पहिल्या प्रमुख पाहुण्या, एनएसओच्या माजी महासंचालक शालिनी भोयर यांनी मोठ्या प्रमाणात नमुना सर्वेक्षण, नमुना पद्धती आणि नमुना डिझाइनमध्ये प्राध्यापक महालनोबिस यांच्या योगदानाबद्दल बोलले. त्या म्हणाल्या की एनएसएसओ एनएसओपेक्षा अधिक प्रसिद्ध आहे आणि सर्वेक्षण अहवालांचे प्रकाशन आता पूर्वीपेक्षा खूप जलद झाले आहे - या कामगिरीबद्दल एनएसओचे कौतुक केले. त्यांनी असेही नमूद केले की जरी अनेक एजन्सी भारतात सर्वेक्षण करतात, तरी त्यांचा डेटा अनेकदा अविश्वसनीय असतो, तर एनएसओ डेटा फील्ड स्टाफला नियमित प्रशिक्षण दिल्यामुळे वैज्ञानिक आणि विश्वासार्ह असतो.

नागपूरच्या झोनल ऑफिसचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पला यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात माजी आय.एस.एस. अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# ताजुद्दीन बाबा यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सच्या संदर्भात बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :




उमरेड रोड, बडा ताजबाग येथे असलेला हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांचा १०३ वा वार्षिक उर्स १८ जुलै ते २९ जुलै २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल. वार्षिक उर्सला येणाऱ्या भाविकांसाठी ताजबागमध्ये ३ लाख चौरस फूट जागेत भव्य घुमट तंबू बांधले जात आहेत. अनेक घुमट तयार करण्यात आले आहेत. दर्गा संकुलाव्यतिरिक्त, हे घुमट बहार गेटजवळ, मेळा मैदानासह विविध संकुलांमध्ये बांधले जात आहेत. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान आणि सचिव ताज अहमद राजा यांच्या नेतृत्वाखाली सर्व आवश्यक व्यवस्थांवर भर दिला जात आहे.

वार्षिक उर्स संदर्भात ट्रस्टची एक महत्त्वाची बैठक हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयात झाली. या बैठकीला ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकर, सदस्य मुस्तफाभाई टोपीवाला, हाजी इम्रान खान ताजी, फारुखभाई बावला उपस्थित होते.

ताजबाग ट्रस्टचे सचिव ताज अहमद राजा म्हणाले की, जत्रेच्या मैदानावर उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही घटनेमुळे भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी विशेष लक्ष देण्यात आले आहे. स्थानिक प्रशासनाकडूनही सहकार्य मिळत आहे. लवकरच प्रशासनासोबत बैठकही घेण्यात येईल. पार्किंग, शौचालये, निवास व्यवस्था, घुमट, पाणी, वाहतूक, सुरक्षा व्यवस्था याकडेही लक्ष दिले जात आहे. उर्सवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवले जाईल. १८ तारखेला बाबांचा ध्वज उंच फड-केल. हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांचा पुढील वार्षिक उर्स १८ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वा. ध्वजारोहणाने होणार आहे. त्यानंतर २९ जुलैपर्यंत दररोज धार्मिक कार्यक्रम होतील. उर्स दरम्यान एक भव्य मेळावा देखील आयोजित केला जाईल.

# करदात्यांची ऑनलाईन मालमत्ता कर भरणा करण्यास पसंती

* आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ८८ कोटी रुपयांची वसुली
* ३० जूनला एकाच दिवशी ५ कोटी ८८ लाख जमा
* गेल्या वर्षाच्या तुलनेत २० टक्क्यांनी कर वसुलीत वाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :** नागपूर महानगरपालिकेतर्फे ऑनलाईन कर भरणा करण्यासाठी मनपा वेबसाईट, माय नागपूर मोबाईल ॲप आणि व्हॉटसअपवरील माय नागपूर एनएमसी चॅटबॉट या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांमुळे नागरिकांमध्ये मालमत्ता कर भरण्याबाबत जनजागृती चांगली वाढली असून गेल्या तीन महिन्यात ऑनलाईन कर भरणामध्ये नागपूरकरांनी चांगलीच आघाडी घेतली आहे. १ एप्रिल २०२५ ते ३० जून २०२५ पर्यंत नागपूर शहरातील १ लाख ९२ हजार ३२४ मालमत्ता धारकांनी ८८ कोटी ८५ लाख रुपयांचा मालमत्ता कराचा भरणा केला. ऑनलाईन पद्धतीने ९६ हजार ९९३ करदात्यांनी ४९ कोटी ९२ लाख रुपयांचा कर जमा केला. तर ९५ हजार ३३१ मालमत्ता धारकांनी मनपा कार्यालयात जाऊन ऑफलाईन पद्धतीने एकुन ३५ कोटी ९७ लाखाचा कर भरणा केला.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी करदात्यांसाठी कर सवलतीची योजना घोषित केली होती. ३० जूनपर्यंत ऑनलाईन कर भरणा करणाऱ्या करदात्यांना १५ टक्के सवलत तर




कार्यालयात जाऊन ऑफलाईन पद्धतीने कर भरणाऱ्या १० टक्के सवलत देण्यात आली. याकरीता नागरिकांनी मनपा कार्यालयात न जाता अधिकाधिक ऑनलाईन पद्धतीने कर भरणा करावा यासाठी नागपूर महानगरपालिकेने करदात्यांना अधिकाअधिक प्रोत्साहन देण्यात आले आहे.

मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सुद्धा मालमत्ता कर वसुली अधिक वाढावी, व योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने करण्यासाठी कर विभागाची आढावा बैठक घेतली होती. याशिवाय अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., यांनी सुद्धा झोननिहाय बैठका घेत तसेच काही मालमता धारकांच्या ठिकाणाही भेट देत ही योजना यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. मनपाच्या कर विभागातर्फे उपायुक्त मिलिंद मेश्राम यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक झोन कार्यालय, काही उद्यानात, शाळांमध्ये, तर विविध वस्त्या मालमत्ता कर वसुलीचे विशेष शिबीरे आयोजित करण्यात आली होती.

याशिवाय महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर, माय नागपूर ॲप, तसेच माय नागपूर एनएमसी चॅटबॉट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मनपाच्या कर भरणा सेवावर यूपीन टाकून नागरीकांना आपली मालमत्ता कराची माहिती जाणून घेता येते. शिवाय ऑनलाईन पद्धतीने कर भरता येते.

त्यामुळे मनपा कार्यालयात न जाता कर भरता येते. गर्दीपासून सुटका सुद्धा मिळते. अशा सहज आणि सोप्या सुविधामुळे मालमत्ता कर धारक मोठ्या प्रमाणात ऑनलाईन पेमेंटकडे आकर्षित झाले आहेत.

### लक्ष्मीनगर झोन अव्वल

गेल्या तीन महिन्यात कर वसूल करण्यात लक्ष्मीनगर झोनने आघाडी घेतली आहे. या झोनमध्ये गेल्या तीन महिन्यात १३ कोटी ९० लाख रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला. त्या खालोखाल हनुमाननगर झोन ११ कोटी ३७ लाख तर तिसऱ्या क्रमांकावर मंगळवारी झोन १० कोटी ८१ लाख रुपयांचा कर वसूल केला.

महानगरपालिकेने मालमत्ता कराचा भराणा करून सवलतीचा लाभ घ्याचा म्हणून शोले सिनेमातील गब्बर सिंग, खट्टा मिट्ठामधील टिचकूलेचा आधार घेतला होता. समाज माध्यम, तसचे विविध झोन कार्यालय, विविध चौकात कर भरण्याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती वाढावा याकरीता बॅनर सुद्धा लावण्यात आले होते.

त्याचबरोबर वस्त्यावस्त्यांमध्ये फिरत्या वाहनांच्या माध्यमातून जनजागृती केली होती. तर कर भरणारा मी जबाबदार नागरीक अशी मोहिम समाज माध्यमातून चालविली होती. अशा जनजागती अभियानमुळे नागरीकांमध्ये मालमत्ता कर भरण्याबाबत अधिक जनजागृती पसरली आहे.

**गेल्या वर्षाच्या तुलनेत अधिक वसुली**

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मालमत्ता कर वसुलीत जवळपास २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्यावर्षी ३० जून २०२४ पर्यंत तीन महिन्यात ७३ कोटी १३ लाख रुपयांचा कर जमा झाला होता. यावर्षी मात्र यात २० टक्क्यांनी वाढ झाल्याने ८७ कोटी रुपयांचा पल्ला आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यात गाठला आहे.

महापालिकेतर्फे देण्यात आलेल्या सवलतीचा फायदा घेण्यासाठी करदात्यांनी अखेरच्या दिवशी अधिकाधिक फायदा घेतला. सवलतीच्या अखेरच्या दिवशी म्हणजे ३० जून २०२५ ला एकाच दिवशी महापालिकेच्या तिजोरीत ५ कोटी ८८ लाख ४९ हजार ३३३ रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला. अखेरच्या दिवशी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने कर भरण्यासाठी करदात्यांनी मुख्यालय व झोनल कार्यालयांमध्ये गर्दी केली होती. काही ठिकाणी ३० जून रोजी रात्री उशिरापर्यंत नागरिक कर भरत होते.

# तीन महिन्यांत १२० वेळा तोडली वीजवाहिनी

**महावितरणचे कोट्यवधींचे नुकसान**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १ :** रस्ते रुंदीकरण, ड्रेनेज लाईन टाकणे अशा विविध कामांमुळे नागपूर शहरात गेल्या तीन महिन्यांत तब्बल 120 वेळा भूमिगत वीजवाहिन्या तोडण्यात आल्याने वीजपुरवठ्यात व्यत्यय येत आहेत. यापैकी 82.5 टक्के घटनांना सरकारी संस्था जबाबदार आहेत., यामुळे महावितरणला कोट्यवधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे. शिवाय, वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या रोषाला महावितरणला सामोरे जावे लागत आहे.

महावितरणने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते जून 2025 या तीन महिन्यांत शहरात वीज खंडित होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले. याच काळात विविध पायाभूत सुविधांच्या कामांमुळे वीजवाहिन्या 120 वेळा बाधित झाल्या. एप्रिलमध्ये 28, मे महिन्यात 49 आणि जूनमध्ये 43 वेळा वीज वाहिन्यांना हानी पोहोचली. यापैकी तब्बल 99 म्हणजेच 82.5 टक्के नुकसान सरकारी संस्थांमुळे झाले आहे, तर केवळ 12 वेळा खाजगी संस्थांमुळे वीजवाहिन्या तुटल्या. विशेषतः, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासने महावितरणच्या भूमिगत वाहिन्यांचे 57 वेळा नुकसान केले आहे.

सरकारी संस्था अनेकदा कामाची पूर्वकल्पना न देता खोदकाम सुरू करतात, ज्यामुळे भूमिगत वीजवाहिन्या तुटतात. लहानसहान दुरुस्त्या लगेच करता येतात, परंतु मोठ्या नुकसानीमुळे दुरुस्तीला वेळ लागतो आणि वीजपुरवठा जास्त काळ खंडित राहतो.

नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासने 57 वेळा वीजवाहिन्यांचे नुकसान केले, तर त्यापाठोपाठ महारेल (13 वेळा), मेट्रो (5 वेळा), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (7 वेळा), ऑरेंज सिटी वॉटर (11 वेळा), सार्वजनिक बांधकाम आणि जागतिक बँक विभाग (5 वेळा) आणि रेल्वेने (1 वेळा) वीजवाहिन्या तोडल्या आहेत.

शहरातील महाल विभागात उड्डाणपुलांसह इतर विकासकामांमुळे सर्वाधिक म्हणजेच 40 ठिकाणी वीजवाहिन्यांचे नुकसान झाले आहे. याशिवाय, काँग्रेस नगर विभाग (30), सिव्हिल लाईन्स (20) आणि बुटीबोरी (18) येथेही वीजवाहिन्या मोठ्या प्रमाणात क्षतीग्रस्त झाल्या आहेत.

29 जून रोजी जयदुर्गा येथील 11 केव्ही उच्चदाबाची वीजवाहिनी तोडल्याने मनीषनगर येथील सुमारे 3,500 ग्राहकांना वीजपुरवठा करणा?या 16 रोहित्रांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. यापूर्वी 25 जून रोजी बेसा येथे, तर प्रजापतीनगर मेट्रो स्टेशनजवळ 33 केव्ही पारडी वीजवाहिनी खोदकामात तुटली होती.

18 जून रोजी 11 केव्ही नंदनवन आणि 11 केव्ही बीएसएनएल वीजवाहिनीही रस्ते आणि पाणीपुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या कंत्राटदारांकडून तोडण्यात आली होती. अशा घटनांमध्ये महावितरणला पर्यायी व्यवस्थेद्वारे वीजपुरवठा सुरळीत करावा लागतो, ज्यामुळे दुरुस्तीचा खर्च वाढतो आणि वीजविक्रीमध्येही आर्थिक नुकसान होते.

महावितरणने सर्व संबंधित सरकारी आणि खाजगी संस्थांना आवाहन केले आहे की, रस्ते खोदकाम करण्यापूर्वी महावितरणला पूर्वसूचना दिल्यास असे प्रकार टाळता येतील आणि नागरिकांची गैरसोयही टळेल. नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय साधणे अत्यंत आवश्यक आहे.

# राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त

## आयुर्वेदाचार्य डॉ. संतोष पुसदकर यांचा सन्मान

■ **महासागर प्रतिनिधी वाडी, दि. १ :** १ जुलै रोजी संपूर्ण देशभर राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी समाजासाठी अविरत सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान केला जातो. अशा या दिवसाचे औचित्य साधत आयुर्वेदाचार्य डॉ. संतोष सुर्यकांत पुसदकर सन्मान करण्यात आला



डॉ. पुसदकर हे नागपूर येथील दत्ता मेघे आयुर्वेद कॉलेजमध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, ते विश्वकुंभ आयुर्वेद चिकित्सालयाचे संस्थापक व प्रमुख सुद्धा आहेत. त्यांनी आयुर्वेदातील पारंपरिक उपचार पद्धतीला आधुनिक वैद्यकीय दृष्टिकोनाची सांगड घालत कर्करोग (कॅन्सर), एचआयव्ही/एड्स, तसेच मधुमेह (डायबेटिस) यांसारख्या गंभीर आजारांवर प्रभावी पूरक उपचारांची दिशा निर्माण केली आहे. यांचे कार्य केवळ नागपूरपुरते मर्यादित नसून, मुंबई, ठाणे, नाशिक तसेच संपूर्ण विदर्भातील ग्रामीण भागातही त्यांनी वैद्यकीय सेवा पोहोचवली आहे. त्यांच्या कायार्ची शास्त्रीय पातळीवरही दखल घेतली गेली असून राष्ट्रीय संशोधन प्रकाशनांमध्ये त्यांचे विविध शोध प्रबंध प्रकाशित झाले आहेत.

याशिवाय, ज्योतिष प्रबोधिनी तर्फे त्यांना ज्योतिष विशारद आणि रत्न विशारद ही सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल ज्योतिष प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रदीप पंडित ,आमदार समीर मेघे यांनी विशेष अभिनंदन व्यक्त केले आहे.

डॉ. संतोष पुसदकर यांचे कार्य हे परंपरा आणि विज्ञान यांची समन्वयात्मक जोड दर्शवते. त्यांनी आजवर हजारो रुग्णांना आयुवेर्दाच्या माध्यमातून नवा आरोग्याचा मार्ग दाखवला आहे. राष्ट्रीय डॉक्टर्स डे च्या निमित्ताने अशा समर्पित डॉक्टरांचा गौरव करणे ही समाजाची कृतज्ञता व्यक्त करण्याची एक छोटीशी पावती ठरते.

# महावितरणकडून लोकनेते वसंतराव नाईक यांना अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :** महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे जनक, दूरदृष्टीचे कल्याणकारी लोकनेता, आणि शेतकरी व दिनदुबळ्यांचे कैवारी असलेले वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महावितरणने त्यांना विनम्र अभिवादन केले. जनसेवा हाच धर्म मानणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आदराने त्यांना अभिवादन केले.

आज नागपूरमधील काटोल मार्गावरील विद्युत भवन कार्यालयात आयोजित जयंती कार्यक्रमात महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे कार्यकारी अभियंता विजय तिवारी यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले व समिधा लोहरे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर, व्यवस्थापक (मानव संसाधन) शिल्पा बारापात्रे यांच्यासह महावितरण आणि महानिर्मितीचे अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अमृत काळ, अतुलनीय सेवा, सुशासन, गरिबांचे कल्याण....

# भाजप कामगार मोर्चाकडून कार्यक्रमाचे आयोजन



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर , दि. १ :** भाजप कामगार मोर्चाने मध्य नागपुरातील गांधीबाग गार्डन येथे आमदार प्रवीण दटके, भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली भारताचा अमृत काळ, अतुलनीय सेवा, सुशासन, गरिबांचे कल्याण या शीर्षकाचा कार्यक्रम आयोजित केला.

प्रारंभी महापुरुषाच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. प्रास्ताविक भास्कर पराते यांनी केले. आमदार प्रवीण दटके, शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. या ११ वर्षांचा विकास प्रवास हा एक सुवर्ण अध्याय आहे, देशाने नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. प्रत्येक गावात रस्ते पोहोचले, प्रत्येक गरिबाचे स्वप्न साकार झाले. आणि ते म्हणाले की, वैद्यकीय सुविधा प्रत्येक गावात पोहोचल्या आहेत, डिजिटल क्रांतीने प्रत्येक हातात मोबाईल आणि इंटरनेट आणले आहे, प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे प्रत्येक गरिबाला छप्पर मिळाले आहे. उज्ज्वला योजनेअंतर्गत, गॅस सिलिंडरने चुलीच्या धुरावर मात केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महामार्ग, द्रुतगती महामार्ग आणि गावातील रस्त्यांवर मजबूत रस्ते बांधले. पाकिस्तानला धडा शिकवण्यात आला आणि हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्व आणि अढळ संकल्पामुळे शक्य झाल्याचे यावेळी सांगण्यात आले .

यावेळी, एडीआयपी आणि वयोश्री प्रधानमंत्री दिव्यशा केंद्र नागपूर यांच्याकडून मध्य नागपूरमधील ज्येष्ठ आणि अपंग नागरिकांना वस्तूंचे वाटप करण्यात आले. सर्वांनी मन की बात कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमात रामभाऊ अंबुलकर, डॉ. विनोद जयस्वाल, डॉ. सुभाष राऊत, माजी अध्यक्ष श्रीकांत आगलावे, विनोद गुप्ता, मधुसूदन सारडा, हेमंत बर्डे, अनिल मानपुरे, किशोर पालांदूरकर, भूषण दडवे, कल्पना मानपुरे, दीपाली नंदनवार, आकाश ठवकर, दिलीप धकाते, कैलाश हेडाऊ, रेखा निमजे आणि डॉ. आकाश यादव (क्लिनिकल प्रोस्थेटिस्ट आणि ऑर्थोटिस्ट), प्रधानमंत्री दिव्यशा केंद्र नागपूर, रुद्र चोप्रा तसेच पीएमईजीपी, सीएमईजीपी, अण्णासाहेब साठे आर्थिक विकास महामंडळाचे प्रमुख उपस्थित होते.

विविध योजनांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये सरकारच्या उद्योग करण्याच्या योजनेची माहिती देण्यात आली. या विकास प्रवासात सहभागी होवून देशाला नवीन उंचीवर नेण्याचे आवाहन कार्यक्रम समन्वयक भास्कर पराते यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनीष मनोसमारे, राजेश बोकडे, यश पांडे, श्रीकांत ठाकरे, नितीन मांडवकर, गिरधारी निमजे, जयकिसन हेडाऊ, मंगेश कामडी, विठ्ठल बागडे, सुभाष निमजे, रमेश भदाडे, बाळू मस्कर, प्रवीण शिरपूरकर, प्रवीण शिरपूरकर, पानठेले, प्रवीण बोकडे, जयकिसन हेडाळ आदींनी परिश्रम घेतले. सोनकुसरे, अनिल खोलगोणे, कांचन मेश्राम, सुनीता सेलोटकर, रुपाली भानारकर, भारती गोसेवाडे, घनशाम निखारे, पंकज तळेकर, शिंदू पराते आदिंनी सहकार्य केले.

# महासागर प्रभाग वार्ता

## नळातून घाण पाण्याचा पुरवठा



बादलीत भरलेले हे दुर्गंधीयुक्त घाण पाणी

● **प्रभू गजभिये नागपूर, दि. १:** प्रभाग क्र. २ रिपब्लिकननगर येथील लाईन नं. १० येथे नळाला घाण पाणी येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मागील काही दिवसांपासून या परिसरातील नळांना घाण पाणी येत आहे. पिवळसर फेसाळ दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने लोकांना गाळून किंवा उकळून पाण्याचा वापर करावा लागतो. या घाण पाण्यामुळे पोटदुखी आणि काविळ रोग पसरण्याची शक्यता आहे. या घाण पाण्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी बुद्धनगर येथील ओसीडब्ल्यू कार्यालयात केली. सुपरवायझर सचिन बावणे यांनी वस्तीत येऊन पाण्याची पाहणी केली.

परंतु, पुढे काहीच कारवाई केली नाही. आजही नळाद्वारे घाण पाण्याचा पुरवठा केल्या जातो. लोकांचे आरोग्य धोक्यात येण्यापूर्वीच ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी ही समस्या दूर करावी अशी मागणी प्रवीण बागडे, कविता गणवीर, पुष्पा काळे, आम्रपाली सिरसाट, प्रमिला चोखांद्रे, रमा गायकवाड, राजेश एलमवार यांनी केली आहे.

## शिवछत्रपती युवा संघटनेची बैठक



बैठकीत सहभागी झालेले युवा संघटनेचे पदाधिकारी

● **किरण मेश्राम नागपूर, दि. १:** आगामी महापालिकेची निवडणूक लक्षात घेता शिवछत्रपती युवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक प्रभाग क्र. २ येथील नारी मार्गावरील कार्यालयात घेण्यात आली.

बैठकीत मनपा निवडणूक संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे निर्देश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. सोबतच शिवछत्रपती युवा संघटनेचे नगरसेवक जास्तीत जास्त कसे निवडून येतील यावर सुद्धा विचार मंथन करण्यात आले. सोबतच संघटनेचे कार्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे निर्देश देखील देण्यात आले.

## पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटवा



पादचारी मार्गावर दुकानदारांनी अशी आपली दुकाने थाटली

● **किरण बेलुरकर नागपूर, दि. १** प्रभाग क्र. ३५ मनिषनगर परिसरातील मनिषनगर ते अंडर ग्राऊंड पूल मार्गावर असलेल्या पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटविण्याची मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे. या मार्गाने सकाळ आणि संध्याकाळी ज्येष्ठ नागरिक फिरायला जात असतात. पादचारी मार्गावर अनेक दुकानदारांनी आपली दुकाने थाटून अतिक्रमण केल्याने ज्येष्ठ नागरिकांना मुख्य रस्त्याने वाटचाल करावी लागते. मुख्य रस्त्याने अनेक वाहनचालक सुसाट वेगाने वाहन चालवित असल्याने ज्येष्ठांना बराच त्रास सहन करावा लागतो. या मार्गावर भाजीपाल्याचे दुकाने, पान टपऱ्या, नास्ता सेंटर आणि प्रॉपर्टी डिलर यांनी अतिक्रमण केले आहे. त्यातच या दुकानांमध्ये येणारे ग्राहक चक्क रस्त्यावर आपली वाहने उभी करीत असतात. रस्त्यावर खड्डे आणि पाणी साचत असल्याने अनेक ज्येष्ठ नागरिक पादचारी मार्गाचा वापर करतात. परंतु, पादचारी मार्गावरील अतिक्रमण ज्येष्ठांसाठी डोकेदुखी ठरत आहे. संबंधित विभागाकडे अनेकदा तक्रारी करून सुद्धा ढिम्म अधिकारी लक्ष देत नसल्याने ज्येष्ठांमध्ये नाराजी पसरली आहे.

शताब्दी चौक ते बेलतरोडीकडे जाणाऱ्या मार्गावर चक्क चिकन सेंटर आणि भंगाराची दुकाने आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यातच रस्त्यावर खड्डे, रस्त्याचे खोदकाम, खड्डयात जमा होणाऱ्या पाण्यामुळे आणखी डोकेदुखी वाढली आहे. पादचारी मार्गावर कुणाच्या आशीर्वादाने अतिक्रमण करण्यात आले हेच कळत नसल्याची व्यथा या परिसरातील ज्येष्ठांनी व्यक्त केली.

या पादचारी मार्गावरील अनधिकृत अतिक्रमण त्वरित हटवून हा मार्ग ज्येष्ठांसाठी मोकळा करून द्यावा अशीही मागणी ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे.

## नारा पार्कसाठी मंत्र्यांना निवेदन



सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांच्यासोबत

● शिष्टमंडळातील कार्यकर्ते

**जयश्री सोमकुंवर नागपूर, दि. १:** नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने नारा येथील आरक्षित जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क तयार करण्यात यावे या मागणीसाठी एका शिष्टमंडळाने सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

१९९६ साली नागपूर सुधार प्रन्यासने नारा येथील १३० एकर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क तयार करण्यासाठी ही जागा आरक्षित केली होती. जागा हस्तांतरीत करण्याची प्रकिया सुरू असताना काही भूमाफियांच्या दबावाखाली येऊन नासुप्रच्या अधिकाऱ्यांनी काहीच काम केले नाही. आरक्षित जागेवर पार्क तयार करण्यात यावा यासाठी मागील २५ वर्षांपासून या परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत. परंतु, उदासिन लोक प्रतिनिधींमुळे पार्कचे काम सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क समितीचे अध्यक्ष चंदू पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून हा प्रकार उजेडात आणला. ही बाब लक्षात घेता परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आणि महिला २७२ दिवसांपासून आंदोलन करीत आहेत.

या पार्कसाठी या एका शिष्टमंडळाने सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. याप्रकरणी लवकरच संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन पार्कची समस्या निकाली काढण्यात येईल असे आश्वासन सिरसाट यांनी दिले. ही मागणी पूर्ण न झाल्यास लवकरच बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा चंदू पाटील यांनी दिला. शिष्टमंडळात चंदू पाटील, गजानन जांगडे, राजेश पाटील, अजय खोब्रागडे, रवी चव्हाण, प्रुफल्ल खोब्रागडे, शंकर सोमकुंवर, विलास शेवाळे, यमुना रामटेके, भारती वानखेडे, वत्सला बेले, जीजा रामटेके, अलका रक्षित, शशिकला चालखुरे, विजया पाटील, वनिता वालदे, वंदना सहारे, आशा डहाट, सुनीता सांगोळे आदींचा सहभाग होता.

## भाजप कामगार मोर्चाची सभा



आमदार प्रवीण दटके यांचा सत्कार करताना भास्कर पराते

● **भास्कर पराते नागपूर, दि. १:** मध्य नागपुरातील भाजप कामगार मोर्चाची सभा नुकतीच गांधीबाग उद्यानात घेण्यात आली.

कार्यक्रमाला आमदार प्रवीण दटके आणि भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी दटके आणि तिवारी यांनी आपल्या भाषणातून केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. अकरा वर्षाचा विकास प्रवास हा एक सुवर्ण अध्याय आहे. ज्यांच्या नेतृत्वाखाली देशाने नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. प्रत्येक गावात रस्ते पोहचले, गरीबांचे स्वप्न साकार झाले. वैद्यकीय सुविधा प्रत्येक गावात पोहचल्या आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे अनेकांना छप्पर मिळाले आहे असे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

याप्रसंगी ज्येष्ठ आणि दिव्यांग व्यक्तींना साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला रामभाऊ आंबुलकर, डॉ. विनोद जैस्वाल, डॉ. सुभाष राऊत, विनोद गुप्ता, मधुसूदन सारडा, हेमंत बर्डे, अनिल मानापुरे, किशोर पालांदूरकर, भूषण दडवे, कल्पना मानापुरे, दीपाली नंदनवार आदी उपस्थित होते.